सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. २७ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक २६ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## राष्ट्राच्या प्रगतीचा आणि यशाचा पाया तरुणाईच्या कामगिरीवर उभा - पंतप्रधान


नवी दिल्ली, २६ एप्रिल : कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा आणि यशाचा पाया त्या देशाच्या तरुणाईच्या कामगिरीवर उभा असतो, जेव्हा तरुण राष्ट्र उभारणीत सक्रियपणे सहभागी होतात तेव्हा राष्ट्राचा वेगाने विकास होत असतो आणि ते राष्ट्र जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करते, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. विविध सरकारी विभाग आणि संघटनांमध्ये नवनियुक्त ५१,००० हून अधिक तरुणांना नियुक्ती पत्रांचे वितरण आज करण्यात आले. या रोजगार मेळाव्याला दूरदृश्य प्रणालीमार्फत पंतप्रधानांनी मार्गदर्शन केले. आज भारत सरकारच्या विविध विभागांमध्ये या तरुणांच्या कारकिर्दीतील नवीन जबाबदाऱ्यांची सुरुवात होते आहे, असे पंतप्रधानांनी आजच्या मेळाव्याला मार्गदर्शन करताना सांगितले. देशाची आर्थिक चौकट मजबूत करणे, अंतर्गत सुरक्षा मजबूत करणे, आधुनिक पायाभूत सुविधांच्या निर्मितीमध्ये योगदान देणे आणि कामगारांच्या जीवनात परिवर्तनकारी बदल घडवणे, अशी आवश्यक कर्तव्ये पार पाडण्याचे काम या तरुणांना करावयाचे आहे, असेही पंतप्रधान म्हणाले. तरुण ज्या प्रामाणिकतेने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडतील त्याचा भारताच्या विकसित राष्ट्र बनण्याच्या प्रवासावर सकारात्मक परिणाम होईल, असे पंतप्रधानांनी अधोरेखित कले. नव्याने कामावर रूजू होणारे तरुण अत्यंत समर्पण भावाने त्यांची कर्तव्ये पार पाडतील, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

# सर्व राज्यांतल्या पाकिस्तानी नागरिकांना शोधा आणि परत पाठवा : अमित शाहा

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधत एक महत्त्वाचा आदेश दिला आहे. देशात असलेले पाकिस्तानी नागरिक ओळखून त्यांना परत पाठवा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या आहेत.

पहलगाम (जम्मू-कश्मीर) येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानविरोधात कडक भूमिका घेतली आहे. सर्व पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले असून, अधिकृत कागदपत्र असलेल्यांना १ मे पर्यंत आणि सार्क व्हिसाधारकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश दिले गेले आहेत.

वक्फ कायद्यात बदल गरजेचाच; केंद्र



सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केले प्रतिज्ञापत्र

या पार्श्वभूमीवर अमित शाह यांनी शुक्रवारी सर्व मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे सूचित करत राज्यातील पाक नागरिकांची यादी तयार करून तात्काळ परत पाठवण्याच्या सूचना दिल्या.

उत्तर प्रदेशातील बरेलीमध्येही या कारवाईचे पडसाद दिसू लागले. येथे ३४ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास असून, त्यापैकी शहनाज बेगम ही एक महिला विशेष व्हिसावर भारतात आल्या आहेत. पण आता त्या ४८ तासांत भारत सोडणार आहेत.

गृहमंत्रालयाच्या या आदेशानंतर देशभरात पाकिस्तानी नागरिकांविरोधात मोठ्या प्रमाणात हालचाली सुरू झाल्या आहेत.

## पर्यटकांचा बचाव करताना जीव गमावलेल्या आदिलच्या कुटुंबाला एकनाथ शिंदेकडून आर्थिक मदत, घर देखील बांधून देणार

### उपमुख्यमंत्री शिंदे जम्मू-काश्मीरकडे रवाना

मुंबई: जम्मू काश्मीरमधील पहलगामयेथे पर्यटकांवर हल्ला होत असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता पर्यटकांच्या बचावासाठी धावून जाणारा काश्मिरी तरुण सय्यद आदिल हुसैन शाहचा देखील दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला. अवघ्या २० वर्षाच्या या तरुणाने ज्या प्रकारे दहशतवाद्यांना सामोरे जात आपला जीव गमावला, त्याची दखल घेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वैयक्तिकरित्या सय्यदच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे.

पहलगाम येथे मदतीसाठी गेलेले शिवसेना कार्यकर्ते आणि सरहद संस्थेचे पदाधिकारी यांच्या माध्यमातून आज सय्यदच्या कुटुंबीयांना एकनाथ शिंदे यांकडून धनादेश देण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सय्यदच्या कुटुंबीयांशी संवाद साधून त्यांना धीर देखील दिला.

आदिलच्या धाडसाचे शिंदेंकडून कौतुक

या हल्ल्यातून बचावलेल्या पर्यटकांनी सय्यद आदिलने दाखवलेल्या धाडसाबाबतचा अनुभव उपमुख्यमंत्र्यांना सांगितला. त्याची दखल घेत शिंदे यांनी सय्यद आदिलच्या कुटुबीयांना तात्काळ मदत देण्याचा निर्णय घेतला. सय्यद आदिल पहलगाममध्ये पर्यटकांना घोड्यावरुन फिरवण्याचं काम करायचा.

## रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात 'दीनदयाल उपाध्याय अध्यासन' स्थापन करण्यात येणार

### राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची घोषणा



मुंबई, दि. २६ : पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी साम्यवाद व भांडवलशाही यांचा सुवर्णमध्य साधत एकात्म मानवतावादाचा सिद्धांत मांडला होता. दीनदयाल उपाध्याय यांचे विचार युवकांमध्ये पोहोचवण्यासाठी रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात 'दीनदयाल उपाध्याय अध्यासन' स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी पी राधाकृष्णन यांनी केली.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी मुंबईतील रुईया महाविद्यालयात दिनांक २२ ते २५ एप्रिल १९६५ या कालावधीत 'एकात्म मानवतावाद' या विषयावर व्याख्याने दिली होती. या व्याख्यानमालेच्या हीरक महोत्सवानिमित्त रुईया महाविद्यालय येथे आयोजित चर्चासत्राला राज्यपाल श्री.राधाकृष्णन यांनी संबोधित केले. कार्यक्रमाला केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियुष गोयल, कौशल्य व रोजगार मंत्री मंगल प्रभात लोढा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सुरेश सोनी, दीनदयाल शोध संस्थेचे सरचिटणीस अतुल जैन, विविध विद्यापीठांचे कुलगुरु उपस्थित होते.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले, साधी राहणी व उच्च विचारसरणी असलेल्या उपाध्याय यांच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीत आणण्याचे कार्य माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी केले. तसेच सध्याच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील या कार्याला पुढे घेऊन जात आहेत. ग्रामीण भागात रस्ते, गरिबांना गॅस कनेक्शन, पेयजल या योजना त्याचाच परिपाक आहेत. कोरोना काळात पाश्चात्य देशांनी लस शोधली असती तर तिची किंमत जनतेच्या आवाक्यात राहिली नसती. मात्र, भारताने संपूर्ण देशवासियांना मोफत कोरोना प्रतिबंधक लस दिली आणि त्यापलीकडे जाऊन अनेक देशांना मोफत लस उपलब्ध करुन दिली. हा सर्वसमावेशक विचार पंतप्रधान श्री. मोदी यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्याकडूनच अंगिकारला आहे, असे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

वास्तवाचे भान ठेवून अन्न वाया जाऊ देऊ नये, प्रत्येकाने धन अर्जन करावे परंतु अनावश्यक खर्च करू नये तसेच स्वतःसाठी न जगता इतरांसाठीही जगावे हा दीनदयाल उपाध्याय यांचा विचार स्वीकारला पाहिजे, असेही राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी सांगितले.

## पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या पदांची भरती; २९ एप्रिलपासून अर्ज

मुंबई, दि.२६ : राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागात 'पशुधन विकास अधिकारी' या संवर्गाची २७९५ पदे भरली जाणार आहेत. या पदांसाठी उमेदवारांना २९ एप्रिल २०२५ पासून १९ मे २०२५ पर्यंत आपला अर्ज सादर करता येणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे देण्यात आली आहे.

राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागणीवरून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (चझडउ) पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा, गट-अ या संवर्गातील पदभरतीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याअंतर्गत पशुसंवर्धन विभागात 'पशुधन विकास अधिकारी' या संवर्गाची २७९५ पदे भरली जाणार आहेत. सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा तपशील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी अर्ज करताना आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करणे बंधनकारक आहे.

## राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत मुंबई 'वायएमसीए'चा १५० वा वर्धापन दिन साजरा



मुंबई, दि.२६ : सर्व धर्म-पंथातील लोकांसाठी खुल्या असणाऱ्या आणि देश, भाषा, धर्म, वर्ण यांच्या पलिकडे जाऊन कार्य करणाऱ्या यंग मेन्स ख्रिश्चन असोसिएसन (वायएमसीए) या धर्मनिरपेक्ष संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे. आपल्या दीडशे वर्षांच्या प्रवासात या संस्थने चारित्र्यसंपन्न नागरिक, नैपूण्यपूर्ण खेळाडू आणि सामाजिक जाणिवा असलेली व्यक्तिमत्त्वे घडविली, असे गौरवोद्गार राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी काढले.

राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत 'वायएमसीए' या संस्थेचा १५० वा वर्धापन दिन सोहळा शुक्रवारी (२५ एप्रिल) एनसीपीए सभागृह मुंबई येथे पार पडला. यावेळी संस्थेचे राष्ट्रीय महासचिव एन. व्ही. एल्डो, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उपसचिव एस. राममूर्ती आणि बॉम्बे वायएमसीएचे सदस्य, आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन म्हणाले, वायएमसीए हॉस्टेलच्या माध्यमातून निवास व भोजनाची सुविधा निर्माण करुन दिल्यामुळे व्यापारी-उद्योजकांच्या जीवनात या संस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली. 'वायएमसीए'ने गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे तसेच क्रीडा क्षेत्राला चालना देण्याचे कार्य यापुढेही सुरु ठेवावे. मुंबईच्या लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात 'वायएमसीए'ने देखील आपले कार्यक्षेत्र आणि सेवा वाढवणे गरजेचे असल्याचे राज्यपालांनी सांगितले. राज्यपालांच्या हस्ते यावेळी बॉम्बे वायएमसीएच्या 'हाऊ मच कॅन वी डू फॉर अदर्स' या कॉफीटेबल पुस्तकाचे तसेच स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

## मुंबईच्या वेव्हज् परिषदेत नवकल्पनेसोबत तंत्रज्ञानाचा महासागर

मुंबई, दि. २४ : केंद्र सरकारच्यावतीने जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता 'वेव्हज् २०२५ परिषद' मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहेत. दि. १ ते ४ मे २०२५ या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

वेव्हज् परिषदेत जगभरातून १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, निमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचे आयोजन होत असून या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहे. या परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन' आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार (चजण) करण्यात येणार आहे. त्याचबरोबर क्रिएटोस्पिअरचे उद्घाटन आणि 'वेव्हज बझार', वेव्हज एक्सलेटर इत्यादींचा प्रारंभ होणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक मीडिया संवाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद तसेच क्रिएट इन इंडिया चॅलेन्जेसची अंतिम फेरी होणार आहे.

## जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीला ८ कोटी ४२ लाखांचा ढोबळ नफा

### सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याची संचालक मंडळाची शिफारस

अहिल्यानगर - जिल्हापरिषद कर्मचारी सोसायटीला सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये ८ कोटी ४२ लाखांचा ढोबळ नफा झालेला असून आवश्यक त्या तरतुदी रक्कम रुपये ४ कोटी ४६ लाख वजा करून संस्थेस ३ कोटी ९६ लाख निव्वळ नफा झाला असल्याची माहिती संस्थेचे चेअरमन कल्याण मुटकुळे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले, संस्थेची सभासद कर्ज मर्यादा १८ लाख असून सभासदांच्या मुदत ठेवीवर ८ टक्के व्याजदर दिल्यामुळे संस्थेच्या ठेवीत वाढ झालेली आहे. संचालक मंडळाने खर्चात काटकसर करून आणि आवश्यक त्या तरतुदी करून सभासदांना १२ टक्के लाभांश देण्याची शिफारस केलेली आहे. तसेच सभासदांच्या कायम ठेवीवर ९ टक्के व्याज दिले आहे. नुकत्याच झालेल्या मासिक सभेमध्ये दि. ७ जून २०२५ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचा मानस आहे. असे चर्चाअंती ठरले असल्याचे चेअरमन मुटकुळे यांनी सांगितले.

मार्च २०२५ अखेर सभासद संख्या २५७२ असून संस्थेचे वसूल भाग भांडवल २५ कोटी ८१ लाख, फंड्स १९ कोटी १६ लाख, ठेवी १७४ कोटी ८२ लाख, सभासदांना कर्ज वाटप १६६ कोटी २१ लाख असून अहवाल सालात सभासद कल्याण निधी मधून विवाह भेट योजने अंतर्गत ९४ सभासदांच्या पाल्यास संस्थेने धनादेशाव्दारे प्रत्येकी ५ हजार विवाह भेट योजनेचा लाभ देण्यात आला असून एकूण ४ लाख ७० हजार रुपयांचे वाटप करण्यात आले. तसेच नव्याने सुरु करण्यात आलेल्या सभासद कुटूंब आधार विमा योजने अंतर्गत १३ मयत सभासदांचे वारसास रुपये १५ लाख प्रमाणे १ कोटी ९५ लाख रुपये इतका सभासद कुटूंब आधार विमा योजनेचा लाभ देण्यात आला. अपघात विमा पॉलीसी १ मयत सभासदांच्या वारसांना १० लाख व एक अवयव कायमचा निकामी झाल्यामुळे ४ लाख रुपये रक्कम एका सभासदास विमा कंपनी कडून देण्यात आली आहे. संस्थेच्या सभासदांसाठी सन २०२५-२०२६ या साला करीता वार्षिक १० लाखाची अपघात विमा पॉलीसी घेतलेली आहे. या अहवाल सालामध्ये अपघात विम्या मधून सभासदाच्या वारसास दहा लाख रुपये मदत देण्यात येणार आहे. सभासदांचे डिव्हिडंड व व्याजाची रक्कम सभेच्या दुसऱ्या दिवशी सभासदांच्या बँक खात्यावर जमा करणार असल्याचे व्हा.चेअरमन मनिषा साळवे यांनी सांगितले आहे.

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विशेष गुणवत्ता प्राप्त सभासदांच्या मुला-मुलीना पारितोषिक व सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात येणार आहे. अशी माहिती पॅनल प्रमुख संचालक संजय कडूस यांनी दिली. यावेळी संस्थेचे संचालक प्रशांत मोरे, विक्रम ससे, विलास शेळके, अरुण जोर्वेकर, भाऊसाहेब चांदणे, राजू दिघे, दिलीप डांगे, चंद्रकांत संसारे, ऋषिकेश बनकर, स्वप्नील शिंदे, श्रीमती ज्योती पवार, सुधीर खेडकर, श्रीकांत देशमाने, काशिनाथ नरोडे, कैलास डावरे, योगेंद्र पालवे, अर्जुन मंडलिक, श्रीमती सुरेखा महारनूर, प्रशांत निमसे, संभाजी आव्हाड, व्यवस्थापक राजेंद्र पवार, उप व्यवस्थापक प्रशांत लोखंडे, कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# कोकणात पार पडला कोण होतीस तू, काय झालीस तू मालिकेचा दमदार लॉन्च सोहळा







दशावतराचा खेळ आणि गा-हाणं घालून कलाकारांनी केला मालिकेचा शुभारंभ

'बा लक्ष्मीनारायणा आणि रवळनाथा तू मागणं घेण्यास राजी हस तसोच ह्यो मायबाप प्रेक्षक मागणं घेण्यास राजी हा... तर देवा महाराजा आमच्या नव्या मालिकेसाठी आणि प्रेक्षकांच्या करमणुकीसाठी आम्ही कलाकारांनी जो काय घाट घातलेला हा, जी काय मेहनत घेतलेली असा ती मेहनत फळाक येवोन सगळ्यांच्या पसंतीस उतरान दे रे म्हाराजा.' लोकप्रिय अभिनेते वैभव मांगले यांनी घातलेल्या गाहाण्याचा नाद संपूर्ण वालावल नगरीत दुमदुमला. निमित होतं ते कोण होतीस तू, काय झालीस तू मालिकेच्या लॉन्च सोहळ्याचं. या मालिकेचं बरचसं शूटिंग कोकणातल्या कुडाळमध्ये होणार आहे. वालावल मंदिर, निवतीचा समुद्र किनारा अशी निसर्ग सौंदर्याने नटलेली बरीचशी प्रेक्षणीय स्थळं मालिकेत पाहायला मिळणार आहेत. मालिकेची गोष्ट कोकणात घडत असल्यामुळे शूटिंगचा श्रीगणेशा आणि लॉन्चिंग सोहळा देखिल या देवभूमीत करण्यात आला. याप्रसंगी सुकन्या कुलकर्णी, वैभव मांगले, मंदार जाधव, गिरीजा प्रभू, अमृता माळवदकर, अमित खेडेकर, संजय शेजवळ आणि स्टार प्रवाहचे व्यवसाय प्रमुख सतीश राजवाडे उपस्थित होते.

अलोट जनसमुदायाच्या साक्षीने वालावल मंदिरात लक्ष्मीनारायणाच्या आशीर्वादाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली. कोकण म्हण्टलं की आपसुकच डोळ्यासमोर येतो तो दशावताराचा खेळ. त्यामुळेच कोण होतीस तू, काय झालीस तू च्या लॉन्च सोहळ्यातील संयुक्त दशावतराच्या खेळाला भरभरुन प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचं प्रमुख आकर्षण ठरलं ते या मालिकेतील कावेरी म्हणजेच अभिनेत्री गिरीजा प्रभूने सादर केलेला लाठीकाठीचा खेळ. दोन महिन्यांपासूनची गिरीजाची ही मेहनत एक वेगळीच ऊर्जा देऊन गेली.

याप्रसंगी सुकन्या कुलकर्णी म्हणाल्या, 'मी अतिशय भाराऊन गेली आहे. नाटक आणि सिनेमा पहाण्यासाठी हमखास गर्दी होतेच. पण मालिकेच्या लॉन्च सोहळ्याला ३००० पेक्षा जास्त चाहते उपस्थित होते हे पाहून खूप छान वाटलं. कोकणातली माणसं फणसासारखी असतात. वरुन काटेरी मात्र आतून तितकीच गोड. या मालिकेत मी साकारात असलेली सुलक्षणा धर्माधिकारी देखिल अशीच फणसासारखी असणार आहे. आजवर माझं हे रुप प्रेक्षकांनी पाहिलेलं नाहीय. त्यामुळे मला हे पात्र साकारताना मज्जा येतेय.'

या मालिकेतल्या प्रत्येक कलाकाराची कोकणाशी नाळ जोडलेली आहे. मालिकेच्या कथानकाविषयी देखिल उत्कंठा दिवसेंदिवस वाढतेय. तेव्हा पाहायला विसरु नका नवी मालिका कोण होतीस तू, काय झालीस तू सोमवार २८ एप्रिल पासून रात्री ८ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.

# दुधना, करपरा व कसुरा नद्यांचे पुनर्रजीवन करा

## सेलू तालुका दबाव गटाची मागणी : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी**:-तालुक्यातील दुधना, करपरा व कसुरा नद्यांचे पुनर्रजीवन, खोलीकरण करावे, अशी मागणी सेलू तालुका दबाव गटाने राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

सेलू तालुक्यात दुधना, कसूरा व करपरा या महत्वाच्या नद्या आहेत. ज्यामध्ये केवळ पावसाळ्यातच पाणी असते. दुधना नदीवर लोअर दुधना धरण बांधण्यात आलेले आहे. उपरोक्त तीनही नद्यांचे लाभ क्षेत्रात साधारणतः २० ते २५ गावांचा सेलू तालुक्यातील समावेश आहे. गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने कमी होणारा पाऊस व बेसुमार वाळू उपसा यामुळे तीनही नद्यांचे पात्र हे असमान झालेले आहे. यातील करपरा नदीचे पात्र काही ठिकाणी आपोआप बदलले असून सर्व नद्यांचे पात्र हे अत्यंत उथळ झालेले आहे. त्यामुळे पावसाळ्यात देखील या तीन नद्यांमध्ये पाणीसाठा होऊच शकत नाही. त्या सातत्याने अतिवृष्टी झाली की लगतच्या शेतीचे प्रचंड नुकसान होते. शेतकरी वर्ग, अत्यंत परेशान होतो. नाहक नुकसान झाल्याने प्रचंड प्रमाणात या नद्यांचे परिसरातील शेतक-यांचे आर्थिक नुकसान होते.त्यामुळे या तीन ही नद्यांचे खोलीकरण करणे गरजेचे व आवश्यक आहे, असे या निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले.

या नद्यांचे खोलीकरण केल्यास जवळील गावांना निश्चितच लाभ होणार आहे. जमिनीतील पाण्याची पातळीवर वाढण्यास मदत होईल. खोलीकरणासोबत सर्वेक्षण करून बंधारे करण्यात यावे. यासाठी तातडीने पाऊले उचलणे गरजेचे आहे.

ज्यामुळे तालुक्यातील दुधना, कर्परा व कसुरा या नद्यांचे क्षेत्रात येणाऱ्या जवळपास ६० ते ७० गावातील शेतकऱ्यांना भेट फायदा होईल. आपण या प्रकरणी तात्काळ सकारात्मक निर्णय करून जनतेस न्याय द्यावा, अशीही मागणी सेलू तालुका दबाव गटाने मंत्री विखे पाटील यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनावर ॲड. श्रीकांत वाईकर, ओमप्रकाश चव्हाळ, विकास गादेवार, गुलाब पौळ, योगेश सुर्यवंशी, लिबाजी कलाल, गणेश सोळंके, दिलीप मगर, देवराव दळवे, इसाक पटेल, सतिश काकडे, मुकुंद टेकाळे, दिलीप अगर, परमेश्वर काढे, दत्ताराव कांगणे, रामचंद्र झाधाव, भारत खंदळे, ॲड. उमेश काष्टे, नारायण पवार, उध्दव सोळंके, दिलीप शेवाळे, अजित मंडालीक, राजेंद्र केवारे, राजाभाऊ मोगल, लक्ष्मण प्रधान, गणपत मिटकरी, गणेश मुंढे, चंद्रकांत चौधरी, रऊफ भाई, सुभाष काकडे, आबासाहेब भुजबळ आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.







परभणी- परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विविध विकास संदर्भात आयोजित असलेल्या आढावा बैठकीतून उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी पालकमंत्री मेघना साकोरे, खा.संजय जाधव, आ.रत्नाकर गुट्टे, आ.राजेश विटेकर, आ.राहुल पाटील, जिल्हाधिकारी गावडे यांच्यासह अन्य पदाधिकारी दिसत आहेत.

## संक्षिप्त वृत्त...

### पहलगाम हत्याकांडाच्या निषेधार्थ जिंतूरात कडकडीत बंद



**जिंतूर,/प्रतिनिधी :** जम्मू काश्मिर मधील पहलगाम येथील पर्यटकांवर अतिरेक्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा जिंतूर येथील सकल हिंदू समाजाने तीव्र शब्दात निषेध व्यक्त करीत दिवसभर बंद पाळला.

संपूर्ण शहरासह तालुक्यात ठिकठिकाणी पुकारलेल्या बंद आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर छोट्या मोठ्या विक्रेत्यांसह व्यावसायिकांनी व व्यापाऱ्यांनी आपआपली दुकाने पूर्णतः बंद ठेवून त्या घटनेचा निषेध नोंदविला. सकाळपासून सायंकाळी उशीरापर्यंत संपूर्ण प्रमुख चौक व प्रमुख रस्ते सूनसान होते. तूरळक प्रमाणातच वाहतुक सुरु होती. सर्वसामान्य नागरीकांनी या बंदच्या आंदोलनाचे जोरदार समर्थन करीत तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. डॉ. पंडीत दराडे, गोविंद थिटे, संदीप शर्मा, रमन तोष्णीवाल, विलास भंडारे, रमेश सडाळ, गोविंद थिटे, रमन तोष्णीवाल, बाबा जोशी, रामकिशन रोकडे, बालाजी सांगळे, केदार सोनी, रमेश गुजर, विठ्ठल संगेवार आदी सहभागी होते. या संतप्त नागरीकांनी तालुका प्रशासनास निवेदन सादर करीत त्या घटनेचा तीव्र शब्दात निषेध नोंदविला.

### वीज वितरण कंपनीच्या गलथान कारामुळे अर्धे मानवत शह पूर्णेत अंधारातच...



**मानवत,/प्रतिनिधी :** रोहित्र जळाल्याने वीज पुरवठा खंडित मानवत शहरात आलेल्या एका रोहित्र मधेय बिघाड झाल्याने मानवत शहर मुख्यरस्ता व जुना मानवत चा काही भाग मंगळवारी अंधकारमय झाला होता. २३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता खंडित झालेला वीजपुरवठा सुरळीत २४ एप्रिल चे सायंकाळी ५ वाजेपर्यंत देखील झाला नव्हता .

मानवत शहरातील विद्युत रोहित्र जळाले असल्या कारणाने मानवत शहर मुख्य रास्ता व जुना मानवत चा काही भाग बुधवारी अंधकारमय झाला होता. सायंकाळी ७ वाजता खंडित झालेला वीजपुरवठा सुरळीत होण्यास गुरुवारी सायनकाळी ५ वाजले तरीही अजून देखील विद्युत पुरवठा सुरळीत झाले नसलेचे कळले .

गेले काही दिवसपासून मानवत शहरात असलेल्या तांत्रिक बिघाड असून ते दुरुस्त करावे अशी मागणी होऊ लागली होती . पण मानवत शहरातील महावितरण चे अधिकारी हे परभणी या जिह्याच्या ठिकाणावरून आपला कारभार चालत आहेत . व महावितरण चे कंत्राटी कर्मचारीही यांचे भरवशावर सर्व कामकाज केले जाते अशी परिस्थिती असल्याकारणाने त्या रोहित्र कडे अधिकाऱ्यांनी लक्ष दिले नाही परिणामी बुधवार २३ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता त्या रोहित्र मधून मोठा आवाज निघाला व रोहित्र जळल्याची माहिती मिळाली . अधिकरी परभणी येथून कारभार चालवत असल्याने शहरातील बऱ्याच व्यापाऱ्यांनी त्यांना कॅल केला कारण मुख्य रस्त्याचीच प्रामुख्याने लाईट गेली होती . याच रस्त्यावर बहुतांश औषधी दुकान , हॉस्पिटल असून तात्यांचेकडे असलेले औषधी हे विद्युत पुरवठा खंडित झाल्याने त्याचे तापमान नियंत्रित ठेवण्यास अडचणी येत होत्या. अशी परिस्थिती उद्भवली असली तरी बुधवारी रात्री कोणत्याच परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत झाला नाही .

गुरुवार २४ एप्रिल मानवत बंद असले तरी अत्यावश्यक सेवा म्हणून औषधी दुकाने व वैद्यकीय सेवा देणारे हॉस्पिटल सुरु होते पण बहुतांश दुकाने व हॉस्पिटल याना वीजपुरवठा नव्हता त्यात २४ एप्रिल रोजी तापमान ४३ चे वर गेले पण महावितरण चे अधिकारी याना कोणत्याच प्रकारे घेणे देणे नसल्यासारखे अभियंता मानवत शहरात नेमके काय झालं हे बघायला देखील आले नाहीत .

## पेडगावात पाण्यासाठी नागरिकांची भटकंती




**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी तालुक्यातील पेडगाव या गावी तीव्र पाणी टंचाई उद्भवली असून सर्वसामान्य ग्रामस्थ पिण्याच्या पाण्याकरीता मोठी भटकंती करीत आहेत, त्यामुळे पेडगाववासीयांचा पाणी पुरवठा सुरळीत रहावा यासाठी टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा, अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे गणेश देशमुख पेडगांवकर यांनी केली आहे.

कडाक्याच्या उन्हाळ्यामध्ये ग्रामस्थ आता पाण्यासाठी हवालदिल झाले आहेत. भटकंती करुन सुध्दा हंडाभर पाणी मिळत नाही, हंडाभर पाण्याकरीता पैसे मोजावे लागत आहेत. त्यामुळे ग्रामस्थांच्या तोंडचे पाणी पळाले आहे, असे मत गणेश देशमुख पेडगांवकर यांनी व्यक्त केले.

## सर्वधर्मीय गुरूंच्या हस्ते 'युगप्रवर्तक अभिवादन महोत्सव' मंचाचे भूमिपूजन

### ३० एप्रिलला परभणीत युगप्रवर्तक अभिवादन महोत्सव व भीमगीत संगीत रजनीचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त व संविधानाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने ३० एप्रिल रोजी शहरातील विष्णू जिनिंग मैदानावर युगप्रवर्तक अभिवादन सोहळा व भीमगीत संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी (दि. २५) या युगप्रवर्तक सोहळ्याच्या मंचाचे भूमिपुजन सर्वधर्मीय गुरूंच्या हस्ते करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबीरे यांच्याद्वारे मागील २१ वर्षापासून युगप्रवर्तक अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही या महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले असून शुक्रवारी या महोत्सवाच्या मंचाचे भूमीपूजन हभप अच्युत महाराज दस्तापुरकर, अब्दुल रहमान कादरी, भंते मुदितानंद, भंते मोगलायन, भंते संघमित्र यांच्या हस्ते करण्यात आले.

**संगीत रजनीच्या माध्यमातून विचारांची जनजागृती....**

**संगीत रजनीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जनजागृती केली जाते. तसेच भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवाचे निमित्ताने यंदाचा भीम गीत संगीत रजनी गायक आनंद शिंदे व मिलिंद शिंदे यांच्या आवाजात संपन्न होणार आहे. या सोहळ्यास सर्व बौद्ध उपासक-उपासिका व संविधान प्रेमी नागरिकांनी उपस्थित उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजक डॉ. सिद्धार्थ हत्तीआंबिरे यांनी केले आहे.**

याप्रसंगी गौतम मुंडे, डॉ. प्रकाश डाके, डॉ. बी. टी. धुतमल, भगवान जगताप, गणपत भिसे, आकाश लहाने, सुधीर कांबळे, डॉ. सुनील तुरुकमाने, प्रा. राजेश रणखांब, राहुल साळवे, मिलिंद घुसळे, गौतम भराडे, अमोल गायकवाड, राहुल कांबळे, मिलिंद खिल्लारे, अक्षय जगताप, अशोक उबाळे, उत्तम गायकवाड, अजय रसाळ, राहुल मकासरे, अमित काळे, बुद्धभूषण हत्तीअंबीरे, अमोल धाडवे, संजय बगाटे, चंद्रकांत जोंधळे, चंद्रकांत लहाने, सुधाकर वाघमारे, सखाराम टेकुळे, बबलू घागरमाळे, मंचक खंदारे, दिलीप मालसमिंदर यांची उपस्थिती होती. सुत्रसंचालन डॉ. सुनील तुरुकमाने यांनी केले. तर आभार प्रा. राजेश रणखांब यांनी मानले.

## आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी जिंतूरात पाचजणांविरुध्द गुन्हा

**जिंतूर,/प्रतिनिधी :** हुंड्याचे राहीलेले ६० हजार रुपये माहेराहून घेऊन ये म्हणत सतत मानसिक व शारिरीक छळ करून विवाहितेस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी जिंतुर तालुक्यातील सावरगाव येथील सासरच्या मंडळीकडील पाच जणांविरुद्ध चारठाणा पोलीस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिंतुर तालुक्यातील सावरगाव येथील विवाहित महिला निर्मला गणेश साबळे (वय २१ वर्ष) ही मंगळवारी रात्री दोन वाजता सावरगाव येथील घरातून बेपत्ता झाली होती. यासंदर्भात चारठाणा पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार नोंदविण्यात आली होती, परंतु बुधवारी (दि.२३) दुपारी तिचे प्रेत गावाशेजारील एका विहीरीत तरंगताना आढळून आल्यानंतर चारठाणा पोलीसांनी या घटनेचा पंचनामा करून शवविच्छेदन करण्यासाठी जिंतुर येथे पाठविला. याप्रकरणी विवाहित महिलेचे वडील अंबादास गुहाळे (रा.दरेगाव ता.औंढा जि.हिंगोली) यांनी चारठाणा पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल सासरच्या मंडळीविरुध्द गुरुवारी दिलेल्या फिर्यादीवरून मयत विवाहितेचा पती गणेश साबळे, सासरा महादेव साबळे, सासु मंगलबाई महादेव साबळे, दिर विनोद साबळे व आजी सासु व्दारकाबाई तुकाराम साबळे या पाच जणांविरुद्ध चारठाणा पोलीस ठाण्याते गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वाढत्या उन्हामुळे शहरातील रसवंतीगृहे झाली हाऊसपूल्ल

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील रसवंतीगृहे गेल्या काही दिवसापासून चांगलीच भरगच्च भरलेली दिसून येत आहे.

परभणी शहरात उन्हाचा पारा गेल्या एक महिन्यापासून चांगलाच वाढलेला दिसून येत आहे. त्यातच उन्हामुळे नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होत आहे. सध्या जिल्हयाच उन्हाचा पारा हा ४० अंशावर आहे. त्यामुळे नागरिकांना या उन्हाचे चांगलेच चटके बसत आहेत. या उन्हामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरातील संपूर्ण रस्ते पूर्णतः कोलमडून गेलेले दिसून येत आहे. या उन्हापासून काहीसा बचाव व्हावा म्हणून नागरिक, बालके, वयोवृध्द नागरिक, महिला , मुली ऊसाचा रस, मोसंबी, पायनापल, मिक्स ज्युस, आईसक्रीम, कोल्ड्रींक या शीतपेयांचा आधार घेत आहेत. या वाढत्या उन्हामुळे देखील या पेयांच्या किंमतीत यावर्षी काही प्रमाणात वाढ झालेली दिसून येत आहे. त्यामुळे या शहरात भरगच्च अशी रसवंतीगृहे दिसून येत आहे.

## मधमाशी शेतीसाठी आवश्यक - डॉ. अनंत लाड

### सेलूत पुस्तक दिनी 'एक दिवस एक पुस्तक'उपक्रम

**सेलू,/प्रतिनिधी :** शेतकरी आणि शेतीसाठी मधमाशी पालन एक उत्तम पुरक उद्योग आहे. यातून शेतकऱ्यांना एक चांगला जोडधंदा उपलब्ध होतो. मधमाशी या शेतीसाठी आवश्यक आहेत. शेतकऱ्यांनी आपली मित्र असलेल्या मधमाशीचे महत्त्व ओळखले पाहिजे, असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या किटक शास्त्र विभागातील प्रा. डॉ. अनंत लाड यांनी केले.


स्वामी रामानंद तीर्थ हिंदी-मराठी ग्रंथालयाच्या वतीने 'मधमाशी पालन : एक प्रमुख उद्योग' या पुस्तकावर बुधवार ( दि. २२ ) रोजी जागतिक पुस्तक दिनी आयोजित मासिक 'एक दिवस एक पुस्तक' उपक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साई बाबा नागरी सहकारी बँकचे अध्यक्ष प्रगतीशील शेतकरी हेंमतराव आडळकर हे होते. तर 'मधमाशी पालन : एक प्रमुख उद्योग' या पुस्तकाचे लेखक तथा वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या किटक शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. पुरूषोत्तम नेहरकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. अनंत लाड यांनी मधमाशीचे शेतीसाठीचे महत्त्व जाणायला हवे. रासायनिक किटक नाशकांनी मधमाशी मरणार नाही याची काळजी घ्यावी. शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाचे तंत्र शुध्द प्रशिक्षण घ्यायला हवे, असे म्हटले. याप्रसंगी डॉ. पुरूषोत्तम नेहरकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. महेंद्र वाटुरे, सोमेश्वर गिराम, ईश्वर घोडके, भगवान कुलकर्णी यांनी मधमाशी पालन संदर्भात डॉ. अनंत लाड यांना प्रश्न विचारले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अनंत मोगल यांनी केले. सुत्रसंचलन लक्ष्मण गाडेकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन अजित मंडलिक यांनी केले. कार्यक्रमास ग्रंथालयाचे सचिव चंद्रशेखर मुळावेकर, शशीकांत कुलकर्णी, डॉ. शरद ठाकर, डॉ. सतीश मगर, डॉ. सुरेश हिवाळे, प्रा. प्रभाकर रावते, नारायण सोळंके, रामराव बोबडे, माधव गव्हाणे, किर्ती राऊत, संध्या फुलपगार यांची उपस्थिती होती.

## जनतेने जनतेसाठी उभारले नेटवर्क; पोलिस अधिक्षकांची अभिनव संकल्पना

**परभणी,/प्रतिनिधी-** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवस कामकाज सात कलमी कृती कार्यक्रम अभियानातून अपेक्षित केलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमात या जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी सक्रिय सहभाग नोंदवून 'जनतेने जनतेसाठी उभारले नेटवर्क' या अभिनव संकल्पनेतून मागील १०० दिवसात जिल्ह्यातील ३६९ गावात १ हजार ५३६ सीसीटीव्ही कॅमेरे बसविले.

ग्रामीण भागातील शेतीची अवजारे, पशूधन, धान्य किंवा अन्य चोरीच्या घटना तसेच भांडण-तंटे वगैरे, महिला व मुलींच्या सुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलिस अधिक्षक परदेशी यांनी ग्रामीण भागातसुध्दा सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रभावी यंत्रणा उभारण्याचा संकल्प केला. १०० दिवस कामकाज सात कलमी कृती कार्यक्रम अभियानांतर्गत या नाविण्यपूर्ण उपक्रमातून त्या दृष्टीने अंमलबजावणीसही प्रारंभ केला. त्यासाठी त्या त्या गावातील पोलीस पाटलांबरोबर संवाद साधला. या उपक्रमामागील उद्देश व जबाबदारी याचे महत्व विशद करीत पोलीस पाटील यांच्याकडून स्वयंस्फूर्तीने, स्वेच्छेने, सामाजिक संस्था, जिल्हा परिषद कार्यालय, ग्राम पंचायत कार्यालय, लोकसहभाग या माध्यमातून ग्रामीण भागातील जास्तीत जास्त गावात महत्वाच्या ठिकाणांवर १ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे उद्दिष्ठ ठरविल्या गेले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नतिशा माथूर यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. पोलीस पाटील यांनी या उपक्रमात महत्वपूर्ण भूमिका बजावून प्रयत्न सुरु केले. जिल्हा परिषदेकडून या अभियानात १४ गावात ५६ सीसीटीव्ही कॅमेरे एनव्हीआरसहीत बसविल्या गेले. तर सेवाभावी कार्यकर्ते, सामाजिक संस्था तसेच जागरुक ग्रामस्थांच्या लोकसहभागातून ग्रामीण भागात मागील १०० दिवसात अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्या गेले.



**१६ पोलीस ठाण्यांतर्गत ३६९ गावात १ हजार ५३६ कॅमेरे..**

परभणी ग्रामीण पोलीस ठाण्यात हद्दीत ३१ गावात २१४, ताडकळस २४ गावात ८२, दैठणा ३१ गावात ११७, पूर्णा ८ गावात ४०, पालम १७ गावात ७०, चुडावा १८ गावात ३४, गंगाखेड २६ गावात ९६, सोनपेठ ५४ गावात १२९, पिंपळदरी २२ गावात ६३, सेलू १० गावात ६४, पाथरी ३४ गावात २४४, मानवत ३० गावात ७१, जिंतूर १७ गावात ८०, चारठाणा ९ गावात २३, बामणी १६ गावात ३५ बोरी ठाणे अंतर्गत २२ गावात १७४ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले.

**लोकसहभागातून उपक्रम यशस्वी...**

पोलीस पाटील यांच्याकडून स्वयंस्फूर्तीने स्व खर्चातून २८५, समाजसेवी संस्था यांच्याकडून १०१, ग्रामपंचायत कार्यालयाकडून ५९०, जिल्हा परिषदेकडून ५६ व लोकसहभागातून ५०४ कॅमेरे बसविण्यात आले आहेत. बसविल्या गेलेले सीसीटीव्ही कॅमेरे वायरलेस, जास्तीत जास्त सौर उर्जे वर आधारित असलेले आहेत. ज्या ठिकाणी विद्युत कनेक्शनचे कॅमेरे इन्व्हरटरसह बसविण्यात आले असून संबंधित कॅमेऱ्यांची देखभाव, व्यवस्था व जबाबदारी कॅमेरे बसविणारे घटक करणार आहेत.

**महत्वपूर्ण ठिकाणांवर कॅमेऱ्यांद्वारे लक्ष...**

जिल्ह्यातील ३६९ गावांमध्ये हे कॅमेरे प्राधान्याने महापुरुषांचे पुतळे, धार्मिक स्थळे, गावाचे प्रवेशद्वार, महत्वाचे चौक व रस्ते इत्यादी भागांमध्ये बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांची दैनंदिन पाहणी व त्याचा डाटा साठवणूकीची जबाबदारी संबंधित जबाबदार व्यक्तींसोबत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व बीट अंमलदार यांच्याकडे असणार आहे.

**सीसीटीव्ही कॅरेकऱ्याची उपयुक्तता सिध्द होणार...**

पोलिस अधिक्षकांच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गावाची सुरक्षितता सोबत चोरीच्या घटना व अन्य सुरक्षिततेच्या विषयात मोठ्या प्रमाणात सुधारणा होण्यास मदत होणार आहे, अनेक चुकीच्या गोष्टींना पायबंद बसणार असून किरकोळ वाद, भांडणतंटेही कमी झाली आहेत. दरम्यान, या उपक्रमात सहाय्यक पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, पोलिस अंमलदार गणेश कौटकर, दिपक आल्हाट यांनी सहकार्य केले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी–विक्री–प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## जागो इंडिया जागो फिटनेस कॅम्पेन

पुणे – सुमेन्स वर्कआउट (नो मशीन झोन), एक प्रसिद्ध फिटनेस आणि स्लिमिंग सेंटर, त्यांच्या देशव्यापी उपक्रमाचा, जागो इंडिया जागो फिटनेस कॅम्पेन चा पहिला वर्धापन दिन अभिमानाने साजरा करत आहे. १ मार्च २०२४ रोजी सुरू झालेली ही मोहीम देशातील वाढत्या लठ्ठपणाच्या संकटाला तोंड देताना भारतीयांना निरोगी आणि अधिक सक्रिय जीवनशैली स्वीकारण्यास प्रेरित करण्यासाठी डिझाइन करण्यात आली होती. त्याच्या चालू मोहिमेचा एक भाग म्हणून, ही मोहीम पुण्यात २५, २६, २७ आणि २८ एप्रिल रोजी शहरातील कोरागाव पार्क, शिवाजी पार्क, जॉगर्स पार्क, ओसोआश्रम पार्क येथे आयोजित ४ दिवसांच्या फिटनेस एक्स्ट्राव्हॅगांझा साठी सज्ज झाली.

## क्राफ्टन इंडिया 'बीजीएमआय रायझिंग स्टार्सचा पहिला गट (२०२५)' सादर

कोलकाता – भारतीय ई-स्पोर्ट्ससाठी एका ऐतिहासिक क्षणी, क्राफ्टन इंडिया ई-स्पोर्ट्सने आज बीजीएमआय रायझिंग स्टार्स २०२५ कार्यक्रमाच्या पहिल्या गटाचे अनावरण केले. यात देशातील गेमिंग आयकॉनच्या पुढील पिढीची ओळख पटवणे आणि त्यांचे पालनपोषण करणे हा एक प्रमुख उपक्रम आहे. कोलकाता येथे बीजीआयएस ग्रँड लॅन फायनल्स २०२५ च्या उद्घाटन दिवशी ही घोषणा करण्यात आली, जो भारतीय स्पर्धात्मक गेमिंगमधील सर्वात भव्य टप्प्यांपैकी एक आहे. येथे देशातील १६ सर्वोत्तम संघ तब्बल ३.२ कोटी रुपयांच्या बक्षीस रक्कमेसाठी झुंजत आहेत.

## बायो-इंटिग्रेटेड क्लॅडिंग सोल्यूशनने क्रिएटिव्ह्ज फॉर अवर फ्युचर युरो 20,000 कार्यक्रम जिंकला

मुंबई – मुंबईतील २९ वर्षीय भारतीय वास्तुविशारदाचा एक नाविन्यपूर्ण उपाय असलेल्या हिरव्यागार शहरांसाठी बायो-इंटिग्रेटेड क्लॅडिंगने २०२५ स्वारोवस्की फाउंडेशनच्या क्रिएटिव्ह्ज फॉर अवर फ्युचर प्रोग्राममध्ये विजय मिळवला आहे, जो संयुक्त राष्ट्रांच्या भागीदारी कार्यालयाच्या भागीदारीत एक उपक्रम आहे. मंगेश कुरुंद हा २०२५ स्वारोवस्की फाउंडेशनच्या क्रिएटिव्ह्ज फॉर अवर फ्युचर प्रोग्राममध्ये विजय मिळवणारा एकमेव भारतीय आहे. नायजेरियातील निर्वासित छावण्यांसाठी पर्यावरणपूरक गृहनिर्माण उपाय, स्थानिक मच्छिमारांनी इजिप्तमधील समुद्राच्या कचऱ्यापासून बनवलेले कापड आणि इंडोनेशियातील कर्णबधिर समुदायासाठी संगीत अधिक सुलभ बनवणारे उपकरण हे इतर विजयी उपक्रम आहेत. क्रिएटिव्ह्ज फॉर अवर फ्युचर प्रोग्रामच्या पाठिंब्याने, मंगेशला त्याच्या संकल्पनेला एका स्केलेबल, प्रभावी आणि व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य प्रणालीमध्ये रूपांतरित करण्याची आशा आहे, विविध वास्तविक परिस्थितींमध्ये चाचणी करता येणारे कार्यात्मक प्रोटोटाइप विकसित करणे.

## भारताच्या कालातीत वारसाला उजाळा दिला!

आंतरराष्ट्रीय स्मारक व स्थळ दिन म्हणून देखील ओळखला जाणारा जागतिक वारसा दिन दरवर्षी १८ एप्रिल रोजी साजरा केला जातो, जेथे संपन्न सांस्कृतिक वारसाबाबत, तसेच भावी पिढ्यांसाठी या वारसाचे जतन करण्याकरिताच्या त्वरित गरजेबाबत जागरूकतेचा प्रसार केला जातो. या दिनानिमित्त एण्ड टीव्ही कलाकार भारतातील काही प्रतिष्ठित वारसा स्थळांना दिलेल्या त्यांच्या संस्मरणीय भेटींना उजाळा देत आहेत. हे कलाकार आहेत नीता मोहिंद्रा (कैलाशा बुआ, 'भीमा'), योगेश त्रिपाठी (दरोगा हप्पू सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'भीमा'मधील नीता मोहिंद्रा ऊर्फ कैलाशा बुआ म्हणाल्या, ''भारताचे सांस्कृतिक सौंदर्य त्याच्या वैविध्यपूर्ण इतिहासामध्ये खोलवर सामावलेले आहे आणि भारतातील वारसायुक्त शहरांमधून ते प्रकर्षाने दिसून येते.

## या आठवड्यात एण्ड टीव्हीवर ड्रामा व कॉमेडीचे मनोरंजन!

या आठवड्यात एण्ड टीव्हीवर प्रखर ड्रामा आणि हसवून-हसवून लोटपोट करणाऱ्या मनोरंजनासाठी सज्ज राहा. मालिका 'भीमा'मध्ये पारंपारिक विधीमुळे भावनिक अशांतता आणि धक्कादायक गोंधळ निर्माण होतो. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये रोमांचक वळण पाहायला मिळणार आहे, जेथे सिक्रेट चेम्बर प्रँक विनोदी स्वरूपात चुकीचे ठरतो. दरम्यान मालिका 'भाबीजी घर पर है' भयावह पण धमाल मनोरंजन देणार आहे, जेथे विभुतीची योजना रहस्यमय महिलेच्या आगमनासह उलटते. ॲक्शन, कॉमेडी आणि सरप्राइजेजने भरलेल्या मनोरंजनाचा आनंद घेण्यास चुकवू नका!

## दैनंदिन जीवनाला चालना देणाऱ्या पर्यावरणपूरक सवयींबाबत!

निसर्गाचे संवर्धन आणि उज्ज्वल भविष्यासाठी पर्यावरण आरोग्यदायी ठेवण्याच्या महत्त्वाबाबत जागरूकतेचा प्रसार करण्यासाठी दरवर्षी २२ एप्रिल रोजी जागतिक वसुंधरा दिन साजरा केला जातो. एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री स्मिता साबळे (धनिया, 'भीमा'), हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है') आपले पर्यावरण व त्यामधील संसाधनांचे संरक्षण करण्यासाठी मार्ग व टिप्स सांगत आहेत. मालिका 'भीमा'मधील स्मिता साबळे ऊर्फ धनिया म्हणाल्या, माझा नेहमी साधे व शाश्वत जीवन जगण्यावर विश्वास आहे.

## कलाकारांनी सांगितले त्यांच्या फिटनेस नित्यक्रमाबाबत!

उन्हाळ्यामधील उष्ण तापमानामध्ये सक्रिय राहणे अनेकदा आव्हानात्मक होऊन जाते, पण योग्य फिटनेस निवडींसह आरोग्यदायी व उत्साही राहणे शक्य आहे. उत्साहवर्धक वर्कआऊट्सपासून स्मार्ट व्यायाम टाइमिंग्जपर्यंत ऋतूमानानुसार नित्यक्रमामध्ये बदल केल्यास फरक दिसून येऊ शकतो. एण्ड टीव्ही कलाकार उन्हाळ्यादरम्यान तंदुरूस्त, कूल आणि प्रेरित राहण्यासाठी त्यांच्या आवडत्या पद्धतींबाबत सांगत आहेत. हे कलाकार आहेत विक्रम द्विवेदी (विशंभर सिंग, 'भीमा'), सपना सिकरवार (बिमलेश, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है'). मालिका 'भीमा'मध्ये विशंभर सिंगची भूमिका साकारणारे विक्रम द्विवेदी म्हणाले, ''मी उन्हाळ्यामध्ये कोणतीही कारणे न देता त्यामधून प्रेरणा घेतो.

## अभिनय करिअर सुरू करण्यामागील कारण

नुकतेच उर्मिला शर्मा यांनी एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये दरोगा हप्पू सिंगची (योगेश त्रिपाठी) सासू अवदेशियाच्या भूमिकेत प्रवेश केला. त्या टेलिव्हिजनवरी एक प्रतिभावान चेहरा आहेत, तसेच त्यांच्या मालिकेमधील या प्रवेशामधून विश्वास सार्थ ठरतो की आपली स्वप्ने साकारताना वयाचे कोणतेच बंधन नसते.

# जागतिक नृत्य दिना निमित्त एमजीम महागामी गुरुकुल तर्फे 'विविधा' नृत्य सादरीकरणाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : महागामी गुरुकुल १९९७ पासून दरवर्षी जागतिक नृत्य दिन साजरा करण्यासाठी माहितीपूर्ण सत्रे आणि कार्यक्रमांचे आयोजन करत आहोत. युनेस्कोने नृत्य वारशाबद्दल समाजाशी कलात्मक संवाद स्थापित करण्यासाठी हा दिवस राखून ठेवला आहे. महागामी गुरुकुल येथील जागतिक नृत्य महोत्सवाचे हे २८वे वर्ष आहे. मागील वर्षांमध्ये चिन्हांकित केलेल्या समृद्ध आणि वैविध्यपूर्ण विषयांसह, या वर्षीचा विषय नृत्य प्रकारांचे विविध सामंजस्य आहे.

'विविधा' नृत्य सादरीकरण २७ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५:०० वाजता रुक्मिणी सभागृह, एमजीएम कॅम्पस येथे कथक आणि उड़ीसी नृत्य रचनांवर आधारित सादरीकरण केले



जाईल. हा कार्यक्रम सर्वांसाठी निःशुल्क आहे. महोत्सवात सादरीकरणासाठी सर्जनशील अर्पण परंपरेचे प्रतिनिधित्व करत, गुरूंच्या कलात्मक निर्मिती आणि गुरु पार्वती दत्ता यांच्या सर्जनशील कृतीतून रचना निवडल्या आहेत. हा कार्यक्रम महागामी गुरुकुल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्सच्या (एमजीएम विद्यापीठ) विद्यार्थ्यांद्वारे सादर केला जाईल

'प्रेक्षा' नृत्य वारसा आणि नृत्य दृश्यांवर आधारित प्रदर्शन 'प्रेक्षा' २७ ते २९ एप्रिल २०२५ दरम्यान रुक्मिणी सभागृहात पाहण्यासाठी खुले असेल. या प्रदर्शनात दृश्य कलांद्वारे नृत्याची संकल्पना सादर केली जाईल, ज्यामध्ये बालनृत्य विद्यार्थ्यांनी तयार केलेली चित्रे, नृत्याचे दृश्य स्वरूप आणि दृश्य कलांनी प्रेरित झालेल्या जुन्या नृत्य सादरीकरणांच्या प्रतिमांचा समावेश असेल. अग्रदीप' – या प्रसंगी नृत्य वारशावर आधारित अग्रदीप या विशेष पत्रिकाचे प्रकाशन केले जाईल. हे पत्रिका महागमीच्या विद्यार्थ्यांनी संकलित केले आहे, तसेच एमजीएम कॉलेज ऑफ जर्नलिझमच्या काही विद्यार्थ्यांच्या तांत्रिक सहकार्याने ते तयार केले आहे. शिक्षण क्षेत्रात आंतरविद्याशाखीय अभ्यास आणि विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी हा एक अनोखा उपक्रम आहे.

हा कार्यक्रम आणि प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे आणि भारतीय नृत्य वारशाच्या या अनोख्या उत्सवात सहभागी होण्यासाठी रसिकांचे स्वागत आहे.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (१०२) संघसमर्थक

त्रेतायुगात श्रीराम- द्वापार युगात श्रीकृष्ण तसेच कलियुगात संघटित सजग समाजच भगवंताचे रूप आहे. संघशक्ति कलियुगै संपूर्ण हिंदुस्थान म्हणजे १४० करोडच्या प्रजेनी संघटित होणे, पुनश्च येणाऱ्या गुलामगिरीतून हिंदुस्थानला/ भारतमातेला वाचवण्यासाठी आवश्यक गरज आहे. आज पर्यंतचे सर्वच प्रमुख सरसंघचालक कित्येकदा मुसलमानांना खास भेटत होते. राष्ट्रीय स्वाहा। इदं न मम् ।। अशी धार्मिक शिकवण तुम्ही पण मुसलमानांना द्या. ही आपल्या राष्ट्राची गरज आहे असे सांगत होते. यावर राष्ट्रपती डॉक्टर झाकीर हुसेन म्हणायचे

परस्परप्रेम- सौहार्द - संघटनेची देशहितासाठी केलेली वैचारिक बांधणी- कशी असावी हे मुसलमानाने संघाकडून शिकावे राष्ट्र सर्वोपरी ह्या संघाच्या शिकवणीचे मी समर्थन करतो.

महात्मा गांधी म्हणायचे RSS च्या सामाजिक कार्यात राष्ट्र हे सर्वो परी असते असा मला अनुभव येत आहे. नेताजी सुभाषचंद्र म्हणायचे समाज को संघटित करनेमे संघ का बताया हुआ मार्ग सही है।

मदन मोहन मालवीयजी तर अभिमानाने व कौतुकाने संघासाठी निधी गोळा करण्यात नेहमीच तत्परतेनी साथ देत असत. डॉक्टर भीमरावजी आंबेडकर म्हणायचे संघ स्वयंसेवकांचा बंधुभाव जातपात विरहित आहे. असा अनुभव मी संघाच्या शिबिरात प्रत्यक्ष उपस्थित राहून घेतला आहे. दलाई लामा म्हणतात मी संघाचा समर्थक आहे अनुशासन देशभक्ती आणि समाजसेवा ही त्यांची शिकवण समर्थनीय आहे. अशा अनेक महापुरुषांनी संघाबद्दल आपले मत मांडले आहे.


क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# नाचू कीर्तनाचे रंगी – आता थांबायचं नाय या भागात भरत जाधव आणि ह. भ. प. इंदुरीकर महाराज यांचा अनोखा संगम!

छत्रपती संभाजीनगर : मराठी संस्कृतीचा आत्मा म्हणजे कीर्तन – आणि मराठी मनोरंजनविश्वातील एक मान्यवर चेहरा म्हणजे भरत जाधव. आता हे दोन वेगळ्या क्षेत्रातील प्रभावी व्यक्तिमत्त्वं झी टॉकीजच्या विशेष सादरीकरणात एकत्र येत आहेत.

नाचू कीर्तनाचे रंगी – आता थांबायचं नाय या भागात पहिल्यांदाच भरत जाधव टीव्हीवर कीर्तनावर आधारित कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहेत. रंगभूमी, चित्रपट आणि प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या भरत जाधव यांचं हे सूत्रसंचालन त्यांच्याच खास शैलीत पाहायला मिळणार आहे.



या भागात त्यांच्यासोबत असतील प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. इंदुरीकर महाराज, जे आपल्या कीर्तनातून अध्यात्म, समाजप्रबोधन आणि समकालीन विषयांवर प्रभावी भाष्य करत असतात. त्यांच्या भाषाशैलीतला समतोल आणि भावना प्रेक्षकांना विचार करायला लावतो. ही प्रस्तुती विशेष ठरणार आहे, कारण या भागामध्ये भरत जाधव आणि झी स्टुडिओज् प्रस्तुत, चॉक अँड चीज फिल्म्स आणि फिल्म जॅझ निर्मित आता थांबायचं नाय या आगामी चित्रपटाच्या सर्जनशील आणि भावविश्वाशी जुळणारं नातं उलगडले आहे. या चित्रपटाच्या आशयाशी सुसंगत असलेला कीर्तनाचा हा अनुभव प्रेक्षकांच्या मनात निश्चितच एक वेगळी छाप सोडणारा ठरेल. हा मनोरंजनात्मक, विचारप्रवर्तक आणि अध्यात्मिक अनुभव देणारा विशेष भाग प्रेक्षकांनी रविवार, २७ एप्रिल रोजी, संध्याकाळी ६ वाजता फक्त झी टॉकीजवर जरूर पाहावा. दिग्गज अभिनेते भरत जाधव आणि ह. भ. प. इंदुरीकर महाराज यांची ही जोडी – अध्यात्म आणि मराठी मनोरंजनाचा एक अद्वितीय संगम ठरणार आहे.

## ज्येष्ठ अभिनेता सचिन पिळगांवकर बनणार 'शिरडी वाले साईं बाबा' मालिकेचा सूत्रधार

छत्रपती संभाजीनगर – सोनी एन्टरटेन्मेंट टेलिव्हिजनवर नुकतीच सुरू झालेली मालिका 'शिरडी वाले साईं बाबा' प्रेक्षकांना

श्रद्धा आणि परिवर्तनाच्या प्रवासाला घेऊन जाण्याची हमी देते. साई बाबांची शिकवण देणाऱ्या या मालिकेला सचिन पिळगांवकर या ज्येष्ठ अभिनेता आणि अप्रतिम परफॉर्मरच्या उपस्थितीमुळे एक नवीनच झळाळी मिळणार आहे. सचिन या मालिकेचा सूत्रधार आणि मार्गदर्शक आवाज असेल.

सूत्रधार या नात्याने सचिन पिळगांवकर प्रत्येक एपिसोडमध्ये प्रेक्षकांना मार्गदर्शन देईल आणि साई बाबांचा साधा संदेश देखील किती दमदार आणि अर्थपूर्ण आहे, आजच्या जीवनाशी सुसंगत आहे हे प्रेक्षकांना समजावून सांगेल. आपल्या आकर्षक आवाजात तो कथेचे मर्म सांगेल आणि त्यातील करुणा आणि आशा या मूल्यांची जाणीव करून देईल. भारतीय सिनेमा आणि टेलिव्हिजनला अष्टपैलूत्वाचा एक मोठा वारसा देणारा सचिन पिळगांवकर आपल्या निवेदनातून या मालिकेला एक गांभीर्य आणि भावनिक गहनता प्रदान करेल. साई बाबांच्या चरणी असलेली त्याची निष्ठा सूत्रधार म्हणून त्याच्या भूमिकेला एक भावनिक जोड देईल.

सचिन पिळगांवकर म्हणतो, हा माझ्यासाठी काही एखादा व्यावसायिक टप्पा नाही, तर याचा भक्तीशी संबंध आहे. मी पहिल्यापासून साई बाबांचा भक्त आहे. त्यांची शिकवण हा माझ्या जीवनातील शक्ती आणि मार्गदर्शनाचा कायमी स्रोत आहे. त्यामुळे जेव्हा या मालिकेत सूत्रधाराची भूमिका बजावण्याचा प्रस्ताव माझ्यासमोर आला, तेव्हा मी त्याकडे केवळ माझ्या व्यावसायिकतेचा एक भाग म्हणून पाहिले नाही, तर माझ्या श्रद्धेला जणू ही माझी आदरांजलीच असेल, असे मला वाटले.

मी आशा करतो की माझ्या निवेदानातून मी साधेपणा, गहनता आणि बाबांच्या सुजाणतेचा कालातीत संबंध मी प्रेक्षकांपर्यंत पोहोचवू शकेन आणि लोकांना हे स्मरण देऊ शकेन की त्यांच्या प्रेम, करुणा आणि विनम्रता या मूल्यांची आज समाजाला खूप जास्त गरज आहे.

# पहेलगाम आतंकवादी हल्ल्याचा गंगापूरात निषेध

### छत्रपती शिवाजी महाराज चौकात मेणबत्या लावून वाहिली श्रद्धांजली

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२६ : काश्मीरमधील पहेलगाम भागात अतिरेकी हल्ल्यात अनेक निष्पाप पर्यटकांचे प्राण गेले असून या भीषण घटनेचा गंगापुर शहरात दि.२४ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात निषेध व्यक्त करत मेणबत्या लावून शांततेच्या मार्गाने निषेध नोंदवण्यात आला.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये २१ एप्रिल रोजी




झालेल्या या हल्ल्यात भारतीय तसेच परदेशी पर्यटकांवर गोळीबार करण्यात आला होता.या हल्ल्यात २६ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.या घटनेत काही जण जखमी झाले आहेत.या हल्ल्यानंतर देशभर संतापाची लाट पाहायला मिळत आहे.दरम्यान,पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याबद्दल शोक व निषेध व्यक्त करण्यासाठी गंगापुर शहरातील महिला पुरुष नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थिती दर्शवत हाताला काळ्या फिती बांधून मेणबत्या लावून शांततेच्या मार्गाने निषेध नोंदवला व दोन मिनिटे मौन पाळून मृतांना श्रद्धांजली अर्पण केली.या प्रसंगी शहरातील महिला पुरुष नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## राहाता येथे सिंहस्थ कुंभमेळा पार्श्वभूमीवर २९ एप्रिल रोजी घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा

शिर्डी, दि. २६ – आगामी नाशिक सिंहस्थ कुंभमेळा (सन २०२६-२८) दरम्यान शिर्डी व शनि शिंगणापूर येथे मोठ्या प्रमाणावर भाविकांचे आगमन अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील स्वच्छतेविषयी आवश्यक उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी राहाता पंचायत समितीच्या सभागृहात २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत संगमनेर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे सादरीकरणाच्या माध्यमातून मार्गदर्शन करणार आहेत. कुंभमेळ्याच्या काळात शिर्डी व शनि शिंगणापूर परिसरात भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता असल्याने स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाच्या दृष्टीने तातडीने प्रभावी उपाययोजना राबविण्याचे उद्दिष्ट या कार्यशाळेमध्ये आहे. कार्यशाळेस शिर्डी लगतच्या ग्रामपंचायतीतील सरपंच, सदस्य, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, पोलीस पाटील, स्वस्त धान्य दुकानदार, कचरा संकलन करणारे कर्मचारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, ग्रामसेवक व तलाठी तसेच राहाता पंचायत समिती कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनीही कार्यशाळेस उपस्थित राहावे, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी दिले आहेत.

# मंथन परीक्षेत आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिराचे यश

तभा वृत्तसेवा

पैठण दि २६ :- स्पर्धा परीक्षेतील अखंड यशाची परंपरा आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिराने कायम ठेवत याही वर्षी मंथन जनरल नॉलेज एक्झाम मध्ये एकूण १३ विद्यार्थ्यांनी केंद्र पातळीवर बाजी मारली.

यामध्ये यशस्वी झालेला तनुज उबाळे(१ली) , माधव गवाड, स्वरा धायतडक ,साईराज धोकटे(२री),अथर्व दूधभाते ,तेजस्विनी उबाळे(३री),सार्थक फटांगडे, शिवेंद्र काकडे ,ओम नवले



(५वी),सोहम देशपांडे ,अमान सय्यद( ६वी),समर्थ मिसाळ, समर्थ वाघमारे(७वी) असे या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे,मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचेअभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, डॉ. जयंत जोशी,विजयराव चाटुपळे, डॉ. पद्मकुमार कासलीवाल, जुगलकिशोर लोहिया, शिवाजी मारवाडी, नंदकिशोर मालाणी, डॉ. राम लोंढे, मनोज शुक्ल,किशोर भाकरे,संजय पापडीवाल,रविंद्र साळजोशी,प्रा.विद्यालयाचे मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी,माध्य.विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योती जोशी व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

# राज्यस्तरीय ऑल मार्शल आर्टस् कराटे व तायक्वांदो स्पर्धेत २५५ विद्यार्थ्यांचा सहभाग

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २६ एप्रिल दि २० एप्रिल आयोजित -या स्पर्धा मिशन मार्शल आर्टस् अँड वुशु कुंग- फु स्पोर्ट्स कराटे असोसिएशन इंडिया च्या वतीने रामचंद्र हॉल छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित केल्या होत्या या स्पर्धेत ऐकून २५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला, या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर, जालना, जळगाव बीड, अहिल्यादेवी नगर, परभणी, हिंगोली,अमरावती

८ जिल्यातील विद्यार्थी सहभागी झाले या स्पर्धेत प्रथम पारितोषिक विजेता संघ छत्रपती संभाजीनगर मिशन मार्शल आर्टस् अकॅडमी.प्रविण घुगे द्वितीय पारितोषिक पैठण संघ शाम बुधवंत तृतीय पारितोषिक हिंगोली जिल्हा नवनाथ बांगर सरयांनी मिळविला.सुवर्ण, रोप्य, व कास्य पदक विजेयी विद्यार्थ्यांचे खालीलप्रमाणे नावे.

मुली – कु. तनुश्री घुगे ( २ सुवर्ण पदक) धनश्री वाघ( २ सुवर्ण पदक ) स्पंदन कामे ( सुवर्ण ) सान्वी कबले ( २ सुवर्ण पदक ) आश्लेषा रीडलॉन (२ सुवर्ण पदक) झोहा सय्यद( २ सुवर्ण पदक ) अनुश्री घुगे




(सुवर्ण व रोप्य पदक) मोक्षदा पाटील (सुवर्ण व कास्य पदक) सॉची लहाने (सुवर्ण व रोप्य पदक ) प्रिशा राठोड (सुवर्ण व रोप्य पदक ) गौरी घुगे (सुवर्ण व रोप्य पदक ) आर. अरुंधती( सुवर्ण व कास्य पदक )समिका काळे( सुवर्ण व कास्य पदक ) प्रीक्षा पदमावर ( रोप्य कास्य ) मानसी क्षीरसागर ( सुवर्ण व रोप्य पदक) ओवी पाटील (सुवर्ण व कास्य पदक) श्राव्या यावले (सुवर्ण व कास्य पदक) नव्या दरगड (सुवर्ण व रोप्य पदक) अर्णवी जंगले ( सुवर्ण व कास्य पदक) शाम्भवी रंजन ( सुवर्ण व कास्य पदक) अनुष्का भारती (सुवर्ण पदक) स्वनिका जैन ( सुवर्ण व कास्य पदक) भक्ती शहा ( सुवर्ण पदक ) ऋतुजा दुतोंडे ( सुवर्ण पदक ) सान्वी साखळकर ( सुवर्ण व कास्य पदक ) कोमल फतपुरे ( सुवर्ण पदक ) रुचिका मिस्त्री ( सुवर्ण पदक ) देवांशी भांजा ( सुवर्ण व कास्य पदक ) शार्वी करमाळकर ( सुवर्ण पदक) अनुष्का डोईजड ( सुवर्ण पदक) ओजस्वी करांडे ( सुवर्ण पदक ) ऋतुजा दुतोंडे ( सुवर्ण व कास्य पदक ) कोमल फतपुरे ( सुवर्ण व कास्य पदक ) रुचिका मिस्त्री ( सुवर्ण व कास्य पदक ) देवांशी भांजा ( सुवर्ण व कास्य पदक ) शार्वी करमाळकर ( सुवर्ण पदक) अनुष्का डोईजड ( सुवर्ण पदक) ओजस्वी करांडे ( सुवर्ण व कास्य पदक). गार्गी पांचाळ रोप्य पदक ) प्रांजल यादव ( रोप्य व कास्य पदक) अन्वी पल्ले (कास्य पदक ) पलक पवार ( रोप्य व कास्य पदक ) शिवण्या बोराळे ( कास्य पदक ) गौरी मानकर ( २ कास्य पदक ) अनुश्री तर्टे ( रोप्य व कास्य पदक ) सानिका पागोरे ( रोप्य व कास्य पदक ) श्रावणी मोतेवाल ( कास्य पदक ) अक्षदा पवार ( कास्य पदक ) दिव्या वडगावकर ( रोप्य व कास्य पदक ) अनुप्रिया सुपेकर ( २ रोप्य पदक ) जिया श्रीवास्तव ( रोप्य पदक) श्रुष्टी पदमे ( कास्य पदक ) रुचा खरात ( रोप्य पदक ) लावण्या नेहे ( रोप्य पदक ) सान्वी मगर ( कास्य पदक ) तनुश्री राठोड ( २ कास्य पदक) प्राप्ती भिंगारे ( रोप्य पदक).मुले – शास्वत लहाने ( सुवर्ण व रोप्य पदक ) मनीष पवार ( सुवर्ण व रोप्य पदक ) रिषीद वरुडकर ( सुवर्ण व कास्य पदक ) अगस्त्या अबोटी ( कास्य व रोप्य,पदक ) जय वर्धन अचलिया( रोप्य व कास्य) अथर्व त्रिपाठी ( सुवर्ण व कास्य पदक ) साई माने (सुवर्ण पदक ) शिवांश डहाळे ( सुवर्ण पदक ) पार्थ राणे (रोप्य पदक ) मयूर चव्हाण ( सुवर्ण पदक ) श्रेयश बेडके ( सुवर्ण पदक ) स्वरूप बनकर ( सुवर्ण व कास्य पदक ) आद्रीयन बॅनर्जी ( सुवर्ण व कास्य पदक) यशोधन घुगे ( सुवर्ण व रोप्य पदक ) जय पाटील ( सुवर्ण पदक ) अर्णव रीडलॉन ( सुवर्ण व रोप्य पदक ) गजराज चावरिया ( सुवर्ण व कास्य पदक ) स्वराज नाईकनवरे ( सुवर्ण पदक) विहान शरद (सुवर्ण व रोप्य पदक ) व तसेच मार्शल आर्ट मध्ये महत्त्वाची मानली जाणारी ब्लॅकबेल्ट डिग्री तीन विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली.

या सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे स्नेहा कोकणे .नंदा घुगे, ,राधा घुगे, प्रविण घुगे डॉ. सुरेश जंगले निलेश पाटील राजपुरे सुधीर लोखंडे प्रजय इंगोले अंकुश नरवडे, पवन घुगे ( संस्थापक अध्यक्ष मिशन मार्शल आर्टस् अकॅडमी ) यांचा हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पदक वितरण करण्यात आले. व तसेच कोमल राठोड, ऋतुजा रणवळकर,ऋतुजा भालेराव, अनुश्री घुगे, धनश्री सिदवाडकर , राम चौरे, गौरव टोकटे, श्याम बुधवंत, यशोधन घुगे, नवनाथ बांगर,कुणाल पाटील, उमेश मोवाळे,फिरोज खान यांनी कार्यक्रम यशस्वीरिता पार पडला

## अग्रलेख...

# आता निर्णायक कृती होणारच!

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे पाकसमर्थित दहशतवाद्यांनी निरपराध पर्यटकांच्या केलेल्या हत्याकांडानंतर देशभर उसळलेल्या जनक्षोभाच्या पृष्ठभूमीवर देशातील विरोधी पक्षांना शहाणपण आल्याचे दिसते आहे. राजधानी दिल्लीत गुरुवारी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत सरकारच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची भूमिका काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी घेतली आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचे राजकारण न करता विरोधी पक्षांनी गेल्या अनेक वर्षांत पहिल्यांदाच देशहिताची भूमिका घेतली, याबद्दल त्यांचे कौतुक करायलाही हरकत नाही. २०१४ मध्ये मोदी सरकार पहिल्यांदा सत्तेवर आल्यानंतर काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी सरकारने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाला विरोध केला होता. विशेष म्हणजे समाजहिताच्या तसेच देशहिताच्या निर्णयालाही विरोध केला होता. 'नाव' विरोधी पक्ष असल्यामुळे सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोधी पक्षांनी विरोध केलाच पाहिजे, असे नाही. सरकार चुकत असेल, लोकविरोधी निर्णय घेत असेल तर विरोधी पक्षांनी सरकारवर टीका करणे, त्याला धारेवर धरणे समजण्यासारखे आहे. पण सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करत काँग्रेसने आपल्या अकलेचे दिवाळे निघाले असल्याचे दाखवून दिले. काँग्रेस पक्षातील बहुसंख्य अकलेचा कांदा याला जबाबदार आहे, असे म्हणायला हरकत नाही.

देशांतर्गत मुद्यावर विरोधी पक्षांनी सरकारला विरोध करणे समजण्यासारखे आहे. विरोधी पक्ष म्हणून त्यांचे ते कर्तव्यही आहे. पण जेव्हा व्यापक देशहिताचा मुद्दा येतो, शत्रू जेव्हा देशावर आक्रमण करतो, तेव्हा विरोधी पक्षांनी सरकारच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहायचे असते, सरकारच्या प्रत्येक निर्णयाला पाठिंबा द्यायचा असतो. कारण सरकारपेक्षा देश महत्त्वाचा असतो, देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी आपसातील राजकीय मतभेद बाजूला ठेवायचे असतात. कौरव आणि पांडवांमध्ये अनेक मुद्यांवर मतभेद होते. कौरवांनी पांडवांना न्याय्य हक्कही नाकारला होता. सुईच्या अग्रावर मावेल एवढी भूमी देण्यासही नकार दिला होता. एवढेच नाही तर पांडवांना वनवासातही पाठवले होते. पण एक दिवस दुर्योधन आणि त्याचे बंधू वनात फिरत असताना गंधर्वांच्या हद्दीत गेले होते. त्यावेळी गंधर्वांनी त्यांना बांधून ठेवले, ही माहिती समजताच युधिष्ठिराने अर्जुन आणि भीम यांना त्यांना सोडवून आणण्यास पाठवले होते. त्यावेळी अर्जुनाने विरोध केला असता युधिष्ठिराने त्याची समजूत घातली होती. आपले आपसात कितीही मतभेद असले तरी जेव्हा बाहेरचा शत्रू आपल्यावर चालून येतो, तेव्हा आपण एक व्हायचे असते. शंभर अधिक पाच असे एकत्रितपणे व्हायचे असते, असा बहुमोल सल्ला दिला होता. युधिष्ठिराचा हा सल्ला देशातील विरोधी पक्षांनी नेहमीसाठी लक्षात ठेवला पाहिजे. भाजप विरोधी पक्षात असताना त्याने याचे पालन केले होते. भाजप विरोधी पक्षात असताना राष्ट्रीय हिताच्या अनेक मुद्यांवर त्याने सरकारला पाठिंबा दिला होता. राष्ट्रीय संकटाच्या या प्रसंगी कोण चुकले, कोणाचे चुकले, याचा कीस पाडण्यापेक्षा या संकटातून आपण देशाला कसे बाहेर काढू, याचा विचार करण्याची गरज आहे.

पहलगाम येथे पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी निरपराध पर्यटकांची गोळ्या घालून निर्घृण हत्या केली. दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार करून ही हत्या केली नाही तर त्यांनी आधी प्रत्येकाला त्याचे नाव आणि धर्म विचारला आणि समोरची व्यक्ती हिंदू आहे, हे समजताच त्याला गोळ्या घातल्या, ही अतिशय संतापजनक बाब आहे. गोळ्या घालणारे सर्व अतिरेकी मुस्लिम होते. अतिरेक्यांनी ठरवून हे कृत्य केले, यात शंका नाही. या देशात धर्माच्या आधारावर त्यांना पुन्हा एकदा फूट पाडायची आहे, असे दिसते. हिंदू आणि मुस्लिमांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण करायचे आहे. अतिरेक्यांना कोणताही धर्म नसतो, असे देशातील तथाकथित धर्मनिरपेक्ष नेते म्हणत असतात. पण अतिरेक्यांना धर्म असतो, आणि धर्माच्या आधारावरच ते अतिरेकी कारवाया करत असतात. तसे नसते, तर पहलगाम येथे फक्त त्यांनी हिंदू नागरिकांना गोळ्या घातल्या नसत्या. सर्व मुस्लिम अतिरेकी नाहीत हे जसे खरे आहे, तसेच सर्व अतिरेकी मुस्लिमच आहे, हे आम्हाला विसरता येणार नाही. त्यामुळे पहलगामच्या या हत्याकांडानंतर देशभर जनक्षोभ उसळला, जातपात भाषा हे सगळे भेद विसरत फक्त हिंदू म्हणून लोक एकत्र आले. आताही आपण एक झालो नाही तर आपले कठीण आहे, आपले भवितव्य धोक्यात आहे, याची जाणीव देशातील सगळ्यांना झाली, ही मोठी उपलब्धी म्हणायला पाहिजे.

या पृष्ठभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी मुंबई येथील एका कार्यक्रमात केलेले भाष्य महत्त्वाचे म्हणायला पाहिजे. दहशतवादी हल्ला झाल्यानंतर सर्व जण जातपात आणि धर्म विसरून देशासाठी एकवटले आहेत. परंतु हे प्रसंगाने झाले आहे. देशासाठी एकत्र येणे हा स्वभाव झाला पाहिजे आणि असा स्वभाव झाल्यानंतर देशाकडे डोळे वाकडे करून पाहण्याची कोणाची हिंमत होणार नाही. जो अशी हिंमत करेल, त्याचे डोळे फुटल्याशिवाय राहणार नाही, असे डॉ. भागवत यांनी म्हटले. डॉ. भागवत यांनी जे म्हटले, ते लाखमोलाचे पाथेय आहे. संकट आल्यानंतर एकत्र येण्यापेक्षा आम्ही आधीपासून जातपात, भाषा आणि धर्म विसरत एकत्र आलो तर देशावर असे संकटच येणार नाही. मोळीतील लाकूड जेव्हा वेगवेगळे असते, तेव्हा ते कोणीही सहज मोडू शकते. पण जेव्हा सर्व लाकडांची मोळी बनते, तेव्हा ती कोणी तोडू शकत नाही. देशातील मुस्लिमांनीही देशासमोरचे हे संकट लक्षात घेतले पाहिजे. आपण भारतात राहतो. त्यामुळे भारत हीच आपली फक्त कर्मभूमी नाही तर मायभूमी आहे, अशी आपली वागणूक ठेवली पाहिजे. या देशात राहणाऱ्या मुस्लिमांनी भारत मातेचा जयजयकार केला पाहिजे, तिरंगा फडकवला पाहिजे, राष्ट्रगीत आणि वंदे मातरम् म्हटले पाहिजे. या देशात राहणाऱ्या मुस्लिमांनी राष्ट्रवादी भूमिका घेण्याची वेळ आली आहे.

पहलगाम येथील पर्यटकांच्या हत्याकांडानंतर काश्मीर खोऱ्यात उमटलेली प्रतिक्रिया दिलासा देणारी आहे. या हत्याकांडाविरोधात तेथील मुस्लिमही रस्त्यावर उतरले आणि आम्ही 'हिंदुस्थानी' म्हणून त्यांनी घोषणा देत मोर्चे काढले. काश्मीर खोऱ्यात असे कधी झाले नव्हते. ३७० कलम मोदी सरकारने रद्द केल्यानंतरची ही मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. पहलगाम हत्याकांडानंतर मोदी सरकारने अतिशय धाडसी निर्णय घेतले आहेत. पाकिस्तान आता कितीही वल्गना करत असला तरी तो हादरला आहे. भारताने सिंधू पाणी करार स्थगित केला, अटारी आणि वाघा सीमा बंद केली, पाकिस्तानी नागरिकांचा व्हिसा रद्द केला, त्यांना तातडीने देश सोडण्याचा आदेश दिला. पाकिस्तानी दूतावासातील सर्व लष्करी राजनयिकांना देश सोडण्यास सांगितले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, स्वप्नातही कल्पना केली नसेल असा धडा पाकिस्तानला शिकवण्याचा इशारा दिला आहे. मोदी जे बोलतात ते करतात, अशी त्यांची प्रतिमा आहे. पहलगाम हत्याकांडाची परिणती कशात होणार हे आज कोणीच सांगू शकत नसले तरी येत्या काही दिवसांत मोदी सरकार जे घडवेल, ते न भूतो न भविष्यति असेल, यात शंका नाही. कारण पहलगाम येथे निर्दोष पर्यटकांचे हत्याकांड घडवत पाकिस्तानने भारताच्या आत्म्यावर हल्ला चढवला आहे. पाकिस्तानने हे लक्षात ठेवले पाहिजे की, भारताचे आत्मतत्त्व कधीही संपू शकत नाही. त्यामुळेच मतभेद बाजूला ठेवून विरोधक सरकारच्या पाठीशी उभे राहिले आहेत. आता निर्णायक 'कृती' होणार आणि पाकिस्तानचे सर्वार्थाने कंबरडे मोडेल, यातही शंका नाही.

# सुवर्ण मेघ

इस्रायलच्या मोसाद या जगप्रसिद्ध गुप्तहेर संस्थेने अदाणी आणि भारता विरुद्धचे उघडे पाडलेले धागेदोरे आणि त्यांची कार्ये.

इस्रायलच्या 'मोसाद' या गुप्तचर संघटनेने भारताला कशी मदत केली आणि 'डीप स्टेट'चे कारस्थान कसे हाणून पाडले याची ही रसभरीत कहाणी. भारतातील LIC, स्टेटबँक यासारख्या मोठ्या वित्तीय संस्थांना हानी पोचविण्याचे हे मोठे कारस्थान होते. भारतातील काही राजकारणी, मीडिया हाऊसेस आणि NGOS या कटात सामील झाल्या होत्या.

**ऑपरेशन झेपेलिन :**

ऑपरेशन झेपेलिन हे नाव पहिल्या महायुद्धातील जर्मन हवाई जहाजांच्या नावावरून ठेवण्यात आले होते, ज्यांचा उपयोग टेहळणी आणि बॉम्बफेकसाठी केला जात असे. हिंडेनबर्ग रिसर्चच्या अदानी समूहावरील अहवालाला प्रत्युत्तर देण्यासाठी हे ऑपरेशन सुरू करण्यात आले होते.

**ऑपरेशन झेपेलिनची सुरुवात आणि उद्दिष्ट्ये:**

* जानेवारी २०२३ मध्ये, फॉरेन्सिक फायनान्शियल फर्म हिंडेनबर्ग रिसर्चने अदानी समूहाला लक्ष्य करत स्टॉक मॅनिपुलेशन आणि अकाउंटिंग फ्रॉडचे आरोप असलेला एक अहवाल प्रकाशित केला. यामुळे अदानीच्या शेअरच्या किमतीत मोठी घसरण झाली, बाजार मूल्याचे १५० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान झाले आणि समूहाचा सर्वात मोठा सार्वजनिक ऑफर रद्द करावा लागला.

*हा अहवाल गौतम अदानींच्या इस्रायल भेटीच्या अवघ्या एका आठवड्यापूर्वी आला, जिथे ते हैफा बंदराच्या १.२ अब्ज डॉलर्सच्या अधिग्रहणाच्या कराराला अंतिम स्वरूप देत होते.

*हैफा पोर्टचे खाजगीकरण हे इस्रायलचे २०20 दशकातील सर्वात मोठे आणि महत्त्वाकांक्षी इन्फ्रास्ट्रक्चर आणि वित्तीय उपक्रम होते. अनेक आंतरराष्ट्रीय बोलीदारांमधून, अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेडने बहुमत हिस्सा असलेल्या संयुक्त उद्यमाने ती बोली जिंकली. इस्रायलसाठी हा करार रणनीतिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा होता, कारण तो भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडोरसाठी आधारस्तंभ मानला जात होता, जो क्षेत्रातील वाढत्या चिनी प्रभावाला तोंड देणार होता.

*हैफा पोर्ट कराराच्या वेळी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू उपस्थित होते. त्यांनी अदानींशी अहवालाच्या आरोपांवर थेट चिंता व्यक्त केली, ज्याला अदानींनी 'पूर्णपणे खोटे' असल्याचे सांगितले. नेतन्याहूंनी याला इस्रायली हितांवर 'अप्रत्यक्ष हल्ला' मानले आणि मदतीचे आश्वासन दिले.

*स्रोत आणि अहवालांनुसार, याच काळात इस्रायली गुप्तचर संस्था मोसादने नेतन्याहूंच्या निर्देशानुसार एक गुप्त टेहळणी मोहीम सुरू केली, ज्याला 'ऑपरेशन झेपेलिन' असे नाव देण्यात आले. या ऑपरेशनचा उद्देश हिंडेनबर्ग रिसर्चचे अंतर्गत कामकाज आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्यांचा पर्दाफाश करणे होता.

**तपास आणि निष्कर्षांचे स्वरूप:**

* ऑपरेशन झेपेलिन अंतर्गत, मोसादच्या त्झोमेट (मानवी गुप्तचर) आणि केशेट (सायबर ऑपरेशन्स) या विशेष युनिट्सना हिंडेनबर्ग रिसर्चचे संस्थापक नॅथन 'नेट' अँडरसन आणि त्यांच्या न्यूयॉर्क कार्यालयावर पाळत ठेवण्याचे काम दिले गेले. या मोहिमेला एका महत्त्वपूर्ण भारत-इस्रायल युतीवरील भू-आर्थिक हल्ला मानले गेले.

*या तपासामुळे कार्यकर्ते वकील, पत्रकार, हेज फंड आणि राजकीय व्यक्तींच्या एका जटिल नेटवर्कचा उलगडा झाला. काही लोक कथितरित्या चिनी हितसंबंधांशी जोडलेले होते, तर काही वॉशिंग्टन पॉवर ब्रोकर्सशी.




*सूत्रांनुसार, गुप्तहेरांनी शिकागोच्या बाहेर असलेल्या इलिनॉयमधील ओकब्रुक टेरेस या उपनगरीय परिसरातील एका जागेतही प्रवेश केला. यातून खासगी मालकीच्या पर्यायी मालमत्ता व्यवस्थापन कंपन्या आणि भारत, अमेरिका, युरोप, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियामधील कार्यकर्त्यांमधील कूटबद्ध (शपलीूशिव) संवाद उघडकीस आले.

* विभिन्न स्रोतांनी या ऑपरेशनला भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे प्रमुख सॅम पित्रोदा यांच्याशी जोडले आहे. दावा केला जातो की मोसादने पित्रोदांच्या अमेरिकेतील घरगुती सर्व्हर्समधून कूटबद्ध डेटा काढला, ज्यातून त्यांचे हिंडेनबर्ग आणि त्यांच्या जागतिक समर्थकांशी कथित गुप्त संवाद उघड झाले.

*मोसादच्या अंतर्गत फाइल्समध्ये राहुल गांधींना 'बिटर डायनॅस्ट' म्हटले गेले असून, त्यांनी अदानी आणि मोदी सरकारची प्रतिष्ठा खराब करण्यासाठी हिंडेनबर्गच्या नेटवर्कशी सक्रियपणे समन्वय साधल्याचा आरोप आहे. राहुल गांधींनी मे २०२३ मध्ये पालो अल्टो, कॅलिफोर्नियामध्ये हिंडेनबर्ग ऑपरेशनशी संबंधित व्यक्तींची भेट घेतल्याचेही म्हटले जाते.

*या आरोपांनुसार, कथित 'डीप स्टेट' आणि जॉर्ज सोरोस यांनी भारतातील अर्थव्यवस्था अस्थिर करण्यासाठी आणि राष्ट्रीय हितसंबंधांना कम जोर करण्यासाठी हिंडेनबर्ग अहवालाचा लाभ घेतला. रशियन मीडिया स्पुतनिक इंडियाने दावा केला आहे की हे ङइख आणि ङखउ सारख्या प्रमुख भारतीय वित्तीय संस्थांना अस्थिर करण्याचा कट होता.

*विजय पटेल नावाच्या व्यक्तीने 'ओन्ली फॅक्ट' नावाच्या वेबसाइटद्वारे मोसादच्या अहवालांवर आधारित एक षड्यंत्र उघड केले, ज्यामध्ये ओकब्रुक टेरेस येथील जागा इंडियन ओव्हरसीज काँग्रेसच्या कार्यालयाशी संबंधित असल्याचे दर्शविले.

* जानेवारी २०२४ मध्ये स्वित्झर्लंडमधील एका गोपनीय बैठकीत अदानींना या गुप्त ऑपरेशनची माहिती इस्रायली गुप्तचर यंत्रणेद्वारे देण्यात आली. ऑक्टोबर २०२४ पर्यंत, अदानींविरुद्धच्या सहयोगी नेटवर्कवरील 'झेपेलिन डॉसियर' ३५३ पानांपर्यंत वाढला होता. नंतर त्याच वर्षी, लीक झालेल्या कागदपत्रांमधून अमेरिकन एजन्सी आणि अदानी-विरोधी कथा पसरवणाऱ्या मीडिया प्लॅटफॉर्मम धील संबंध कथितरित्या दिसून आले. मोसादने नोव्हेंबर २०२४ मध्ये डॉसियरचे काही अंश रॉयटर्स, ब्लूमबर्ग आणि द गार्डियन सारख्या मोठ्या वृत्तसंस्थांसोबत शेअर केले.

**अदानी समूहाचे प्रत्युत्तर आणि परिणाम:**

*अदानी समूहाने कर्जाची परतफेड करून, संस्थापक-गहाण ठेवलेले शेअर्स कमी करून, प्रवर्तक आणि महत्त्वाचे गुंतवणूकदार इक्विटी आणून आणि समूहाच्या मुख्य व्यवसायांवर लक्ष केंद्रित करून या संकटातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.

*त्यांनी अमेरिकेत पाळत ठेवणाऱ्या टीमच्या सोबत काम करण्यासाठी वकील आणि गुप्तचर सल्लागारांची एक टीम तयार केली. त्यांनी प्रशासनातील प्रभावशाली व्यक्तींना या प्रकरणाची माहिती दिली. अहमदाबादमध्ये त्यांनी सायबर तज्ज्ञ आणि विश्लेषकांसह एक उच्च-तंत्रज्ञान नियंत्रण कक्ष स्थापन केला आणि त्यांच्या कायदेशीर टीम्सने आंतरराष्ट्रीय स्तरावर काम केले.

*अदानी समूहाने हिंडेनबर्ग रिसर्च आणि नॅथन अँडरसन यांच्या विरोधात न्यूयॉर्कच्या दक्षिण जिल्ह्यात कायदेशीर कारवाईची तयारी केली. अँडरसनच्या कार्यालयात सात पानांचा मसुदा कायदेशीर संक्षिप्त माहिती पाठवण्यात आला.

*जानेवारी १५, २०२५ रोजी, हिंडेनबर्ग रिसर्चने अधिकृतपणे आपले कामकाज बंद करण्याची घोषणा केली.

* ऑपरेशन झेपेलिन हे व्यापार, मुत्सद्देगिरी आणि सायबर रणनीती यांचे संयोजन करणारी एक आधुनिक प्रति-आक्रमण रणनीती होती, जी कॉर्पोरेट जगातील सर्वात धाडसी पुनरागमन रणनीती मानली जाईल.

ऑपरेशन झेपेलिनची संपूर्ण माहिती कदाचित कधीही पूर्णपणे ज्ञात होणार नाही, परंतु या स्रोतांनुसार हे अदानी समूहाने हिंडेनबर्गच्या अहवालाला दिलेले एक सुनियोजित आणि बहुआयामी प्रत्युत्तर होते, ज्यामध्ये इस्रायली गुप्तचर संस्थेची मदत सामील होती आणि ज्याने विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रसिद्ध व्यक्तींमधील जटिल संबंध उघडकीस आणले.

## वेध

अनिल फेकरीकर

# हल्ला झाल्यावर भाडेवाढ देशद्रोहच!

व्यवसाय प्रत्येकाने करायलाच हवा. नफाही कमावण्याचा निसर्गदत्त अधिकार मानवाला मिळाला आहे. आपला आणि कुटुंबीयांचा उदरनिर्वाह करायचा अधिकार सर्वांना असला तरी त्याचेही काही नियम ठरविण्यात आले आहेत. परंतु प्रत्यक्षात त्या सर्व नियमांना तिलांजली देत विमान कंपन्यांना संकटकाळात लूटमारच कशी सुचते हाच मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. पृथ्वीवरील नंदनवन म्हणून जम्मू-काश्मीर ओळखले जाते. प्रत्यक्षात आज तिथे रक्ताचे पाट वाहत आहेत. यामुळे नंदनवन म्हणणे थोडे धाडसाचेच होणार आहे. तरीही या काश्मीरला पाहण्यासाठी बहुतांश मंडळी जातात. अशाच पर्यटकांवर दहशतवाद्यांनी मंगळवार, २२ एप्रिल २०२५ रोजी हल्ला करीत २७ लोकांचा जीव घेतला. यामुळे सर्वत्र गोंधळ उडाला असून, दहशतही वाढली आहे. या स्थितीत प्रत्येक जण काश्मीर सोडून आपल्या शहरात परतण्यासाठी धडपड करीत आहे. मग काय अशा महत्त्वपूर्ण संधीचे सोने करणार नाही त्या विमान कंपन्या कसल्या? त्यांनीही आता वाहत्या गंगेत हात धुवायचे म्हणून अचानक भाडेवाढ केली. संपूर्ण देश पहलगाम येथील हल्ल्यामुळे रडत आहे, त्या स्थितीत लोकांच्या दु:खात सहभागी होण्याची अपेक्षा असताना विमान कंपन्यांनी भाडेवाढ करीत झालेल्या जखमांवर मीठ चोळण्याचे काम केले आहे.

पूर्वी विमान प्रवास म्हणजे मौजमजेचा मामला ठरायचा. आज विमान प्रवास जागतिक गरज बनली आहे. याचा अर्थ जीवनावश्यक गरजेच्या कायद्यात त्याचा लोकांनीच समावेश केला आहे. आता जिथे लोकाश्रय मिळतो, तिथे राजाश्रय मिळायला वेळ लागत नाही. या स्थितीत विमान कंपन्यांनी तुघलकी कारभार का म्हणून करावा, याचा विचार भारत सरकारने करावाच. भारतात इंग्रजांनी त्यांची ईस्ट इंडिया कंपनी लूटमार करण्यासाठीच पाठवली होती. ते व्यापारी म्हणून आले अन् राज्यकर्ते बनले. त्यांचा राज्यकर्ते बनण्याचा छुपा अजेंडा होताच. पण वर्तमानातील विमान कंपन्या किंवा खाजगी बसेस चालविणाऱ्या कंपन्यांची भाडेवाढीची मक्तेदारी का वाढावी यावर चिंतन होणे गरजेचे आहे. लोक संकटात असताना या कंपन्यांनी मदतीचा हात दिला नाही तरी चालेल पण त्याच संकटग्रस्तांकडून अधिक रक्कम वसूल करणे हा माझ्या मताने लोकद्रोह, देशद्रोह आणि राजद्रोह म्हणावा लागेल. दिवाळी, दसरा, हिवाळी-पावसाळी अधिवेशन, मोठ्या घटना घडताच देशातील विमान कंपन्या, खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्या आपली अघोषित भाडेवाढ करतात. जेव्हा ग्राहक प्रत्यक्ष तिकीट काढायला जातो किंवा ऑनलाईन तिकीट नोंदणी करतो तेव्हाच त्याला त्याचे दर माहीत होतात. अनेकांना महत्त्वाचे काम असल्याने ते नाईलाजाने विमान कंपनीच्या नावाने दोन-चार खडे फोडून तिकीट खरेदी करतात. पण पीडित लोकांचे काय? विमान आणि खाजगी ट्रॅव्हल्स बस कंपन्यांच्या सामाजिक बांधिलकीचे काय? सामाजिक बांधिलकी फक्त सरकारी पक्षाने पार पाडायची का? खाजगी उद्योजकांनी केवळ मजा मारायची. भारतीय रेल्वे आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने जी सेवा दिली, त्याला तोड नाही. संपूर्ण बसमध्ये एकच प्रवासी असला तरी ती फेरी पूर्ण केली जाते. प्रवासी नाहीत असे म्हणत एसटीने कधीही कुठलीही फेरी बंद केली किंवा अचानक स्थगित केली नाही. त्यांनी सातत्याने सामाजिक बांधिलकी जोपासली. मग संपूर्ण देश संकटात असताना विमान कंपन्यांना भाडेवाढ करण्याचे सुचतेच कसे? समजा विमान कंपन्यांना कमी भाड्यात सेवा देणे परवडत नाही, तर त्यांनी तातडीने आपली कंपनी बंद करावी अन् हिमालयात जावे. लोकांना ते संकटात असताना लुटण्याचा अधिकार या कंपन्यांना कुणी दिला? जम्मू-काश्मीरला लोक फिरायला जातात अन् स्थानिक लोकांच्या पोटाचा प्रश्न मिटवतात. पर्यटक गेले तरच तेथील लोकांच्या घरची चूल पेटते. याचा अर्थ देशातील पर्यटक एक प्रकारची लोकसेवा करीत आहेत. मग अशा लोकसेवा करणाऱ्या पर्यटकांकडून विमान कंपन्यांनी ओरबाडून पैसा घ्यावा, ही बाब नीतीला धरून नाही. भविष्यात असे प्रकार घडायलाच नको म्हणून भारत सरकारने आता विमानासह खाजगी बस चालविणाऱ्या कंपन्यांसाठी एखादी एसओपी अमलात आणायला हवी. जी कंपनी याचे उल्लंघन करेल त्यांचा परवाना तातडीने रद्द करावा किंवा दहा पट दंड आकारावा. जेव्हा प्रत्यक्षात एखाद्या विमान कंपनीला दंडित केले जाईल, त्या दिवशी ते सुतासारखे सरळ होतील. एखाद्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र लुटले तर फौजदारी गुन्हा दाखल केला जातो. मग खुलेआम लोकांचा खिसा रिकामा करणाऱ्या विमान कंपन्यांवरही तसाच भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार गुन्हा दाखल करायलाच हवा.

९८८१७१७८५९

## यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

# छद्म पुरोगामी हेच खरे अतिरेकी!

एखादा मस्तीखोर, मारामाऱ्या करणारा मुलगा जितका त्रासदायक नसतो जितके त्याची बाजू घेणारे असतात. एखादा गुंड, मवाली त्रासदायक नसतो जितके त्याला पाठीशी घालणारे असतात. त्याचप्रमाणे लोकांना मारणाऱ्या अतिरेक्यांपेक्षा भयावह कुणी असेल तर त्या अतिरेक्यांची बाजू घेणारे, त्यांना पाठिंबा देणारे आणि भटके हुए नौजवान म्हणणारे छद्म पुरोगामी आहेत. या छद्म पुरोगाम्यांचा केवळ भारतातच नव्हे तर जगभरात सुळसुळाट आहे. पहलगाममध्ये इस्लामी अतिरेक्यांनी निष्पाप हिंदूंचा बळी घेतला. धर्म विचारून फक्त हिंदू पुरुषांना मारलं. अशी बातमी झळकल्यावर लगेच हे पुरोगामी पुढे सरसावले आणि ''आतंकवादाला कोणताच धर्म नसतो. धर्म विचारून मारलं ही बातमी कोणी पेरली? स्थानिकांनी कशी हिंदूंना मदत केली. निवडणुका जवळ आल्या की असे हल्ले होतातच.'' असं म्हणत मूळ विषयाला बगल दिली. इस्लामी अतिरेक्यांवर टीका करण्याऐवजी यांनी मोदी-शाह यांच्यावर ताशेरे ओढले. याचं कारण आतंकवादाला धर्म नसतो हा नॅरेटिव्ह त्यांना पसरवायचा आहे आणि पुन्हा हे आतंकवादी हिंदूंना मारायला मोकळे. २६/११ च्या वेळी तर या लोकांनी हिंदू आतंकवादाची थियरी मांडली. तुकाराम ओंबळे यांनी बलिदान देऊन कसाबला पकडलं नसतं तर ते सगळे अतिरेकी हिंदू होते यावर शिक्कामोर्तब झाले असते. मात्र ओंबळे सिंह बनून आले आणि गड वाचवून गेले.

प्रत्येक देशातले सेक्युलर्स, पुरोगामी त्या त्या देशासाठी धोका आहेत. काही दिवसांपूर्वी चित्रपट दिग्दर्शक अनुराग कश्यप म्हणाला होता की, "I'll urinate on Brahmin." त्यानंतर त्याने माफी मागितली. म्हणे त्याला चीड अनावर झाली म्हणून तो अनवधानाने बोलून गेला. मग आता हिंदूंची हत्या झाली तेव्हा चीड नाही का आली? पुरोगाम्यांची 'वोक' संस्कृती नसलेल्या समस्या शोधून काढण्यात धन्य मानते. मात्र असलेल्या समस्यांकडे हे डोळेझाक करतात किंवा त्या समस्या या समस्या नसून वरदान आहेत, असं लोकांच्या मनावर बिंबवतात आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्यांना यात यश मिळतं. याचं कारण आपण मुळातून शोधून काढलं पाहिजे. जिहादी ही समस्या



जगभरात आहे आणि ही एक समस्या आहे हे कुणी स्वीकारायला तयार नाही. कारण ती समस्या म्हणून स्वीकारली तर एका विशिष्ट धर्माच्या विरोधात बोलावं लागेल आणि पुरोगाम्यांना ते मान्य नाही. याचं कारण पुरोगाम्यांना त्यांच्याबद्दल आत्मीयता आहे असे नाही. तर कोणत्याही पुरोगाम्याचे शेवटचे ध्येय असते ते त्या राष्ट्राची संस्कृती नष्ट करून राष्ट्र अस्थिर करणे. आणि राष्ट्र अस्थिर करण्यात त्यांना जिहाद्यांची मदत होते. लक्षात घ्या, कम्युनिस्ट विचारधारा ही निधर्मी विचारधारा आहे. नास्तिकवाद आहे. हिंदूंमध्ये नास्तिक होण्याचा मार्ग आहे. मात्र इस्लाममध्ये ती अनुमती नाही. मग कम्युनिस्ट जिहाद्यांची बाजू का मांडतात? यावर आपण विचार करायला हवा. जिहाद्यांना राष्ट्र नष्ट करून त्यांचा धर्म स्थापन करायचा आहे आणि कम्युनिस्टांनाही राष्ट्र नष्ट करायचे आहे, पण निधर्मी सत्ता स्थापन करायची आहे. राष्ट्र नष्ट करणे किंवा राष्ट्राची संस्कृती नष्ट करणे हा दोघांमधील कॉमन फॅक्टर आहे. दोघांचं गंतव्य वेगळं आहे, पण मार्ग एकच आहे. हीच तर खरी गंमत आहे.

म्हणूनच कोणताही अतिरेकी हल्ला झाला तर ते अतिरेक्यांच्या बाजूने बोलतात. आपल्याकडचे पुरोगामी सेव्ह गाझा म्हणून छाती बडवतात. त्यांची मोडस ऑपरेंडी बघा. रॉबर्ट वाड्रा म्हणाले की, मुसलमानांना दाबण्याचा प्रयत्न केला जातोय म्हणून अतिरेक्यांनी धर्म विचारून गोळ्या मारल्या. काही लोक म्हणाले की धर्म विचारून जय श्रीराम म्हणायला लावतात तशाप्रकारेच धर्म विचारून गोळ्या झाडल्या. म्हणजे क्रूर कृत्य केलं इस्लामी अतिरेक्यांनी, पण टीका कोणावर केली? तर हिंदूंवर. बंगालमध्ये स्थानिक मुस्लिमांनी हिंदूंवर अत्याचार केले, पण टीका ममता बॅनर्जी किंवा स्थानिक जिहाद्यांवर नाही केली तर मोदींवर केली. आताही जम्मू-काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्लांचं सरकार आहे, पण अब्दुल्लांवर टीका झाली का? ही त्यांची जबाबदारी होती असं कुणी म्हटलं का? नाही. टीका फक्त मोदींवर झाली. हा हल्ला निवडणुकीसाठी मोदींनीच घडवून आणला अशा प्रकारचं नॅरेटिव्ह सेट करण्यात आलं आणि काही महामूर्ख लोक यांना बळी पडतात व तसले संदेश फॉरवर्ड करत सुटतात. स्थानिक जिहाद्यांना वाचवण्यासाठी पुरोगामी कसे कामाला लागले पाहा. जखमी लोकांना स्थानिकांनी मदत केली, त्यांना घरी नेऊन खाऊ-पिऊ घातलं, त्यांचं संरक्षण केलं अशा बातम्या जाणीवपूर्वक पेरल्या गेल्या. काही न्यूज पोर्टलने तर कलमा म्हणजे काय यावर प्रबंध लिहिला. अतिरेक्यांनी कलमा पढायला सांगितला, पँट काढून सुंता झालाय की नाही हे तपासलं. यावर रान उठवायचं सोडून कलमा म्हणजे काय यावर हे बेटे निर्लज्जासारखे लेख लिहीत सुटलेत. फारुख दार या अतिरेक्याला सैन्याने समोर बांधून फिरवलं होतं. याचा संबंध पुरोगाम्यांनी सोशल मीडियावर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याशी जोडला आहे. म्हणे फारुख दारचा धर्म विचारून सैनिकांनी त्याला जीपसमोर बांधलं. आता मला सांगा, असे पुरोगामी शत्रू असताना आतंकवादी शत्रू असण्याची गरज नाही. मागे हेच लोक सर्जिकल स्ट्राईक खोटा म्हणून ओरडत होते. आता मोदींनी सिंधू जल करार स्थगित केला आहे. उद्या मोदींनी आणखी कठोर पावले उचलली तर हे लोक अतिरेक्यांसाठी धाय मोकलून रडतील. तसंही मोदींनी ''हे कृत्य करणाऱ्यांना, कट रचणाऱ्यांना आणि दहशतवाद्यांना त्यांच्या कल्पनेपलीकडे शिक्षा मिळेल'' असं भर सभेत घोषित करून टाकलं आहे. त्यामुळे काही महिन्यांत मोदींचं रौद्र स्वरूप आपल्याला पाहायला मिळेल. तेव्हाही हे पुरोगामी भारतीय सैन्यावर टीका करायला पुढे येतील. पुरोगामी हा शब्द आपण सुधारणावादी या अर्थाने वापरत असलो तरी छद्म पुरोगाम्यांनी पुरोगामी हा शब्द शिवी करून टाकली आहे. आपलं सैन्य अतिरेक्यांचा निपटारा नक्कीच करेल, पण या छद्म पुरोगाम्यांचा हैदोस कोण थांबवणार?

writerjayeshmestry@gmail.com

### स्ट्राईक नव्हे, आता नायनाटच हवा!

७ ऑक्टोबर २०२३ ला 'हमास'ने इस्रायलवर हल्ला केला आणि जग हादरले. इस्रायलने कोण पाठीशी आहे, याची वाट न पाहता थेट गाझा पट्टी उद्ध्वस्त केली. त्यांच्यासाठी राष्ट्रीय सुरक्षेपेक्षा महत्त्वाचं काहीच नाही. ९/११ नंतर अमेरिका अफगाणिस्तानात शिरली. ओसामा बिन लादेनला शोधून काढलं आणि त्याच्या बिऱ्हाडात घुसून संपवून टाकलं. हे पाहून एक प्रश्न समोर येतो की भारताबाबत हीच भूमिका जग का घेत नाही? २६/११ चा मुंबई हल्ला, उरी, पुलवामा आणि अलिकडचा पहलगाम अशा प्रत्येक हल्ल्यानंतर केवळ निषेधाचे निर्जीव शब्द आणि मग 'शांती चर्चा'च्या भ्रमजालात देशाला अडकवले जाते. पण दहशतवाद्यांच्या रक्तपिपासू वृत्तीला शब्द नव्हे, तर शस्त्रांचीच भाषा समजते. भारत किती संयम बाळगणार? किती जवानांचा बळी देणार? देशाच्या सीमेवर झेंडा फडकवताना आपल्या वीरांचे शव घरी परतावं, हा किती काळ चालणार? वेळ आली आहे निर्णय, कृती आणि दहशतवाद्यांच्या मुळावर घाव घालण्याची.

दहशतवाद्यांचा खात्मा यापुढे सीमा ओलांडून, त्यांच्या सुरक्षित आधारांना उद्ध्वस्त करूनच करावा लागेल. 'सर्जिकल स्ट्राईक' पुरे झाले आता गरज आहे 'डिस्ट्रक्शन'ची. या रक्तरंजित षडयंत्रामागचं खऱ्या मास्टर माईंड देशाचं- पाकिस्तानचं संपूर्ण उच्चाटन हेच एकमेव उत्तर आहे. जगाला आता दहशतवादाविरोधात भारताच्या निर्णायक कृतीचं दर्शन घडवायचं आहे. कारण संयमाचं उत्तर जर रक्तरंजित हल्ल्यांनी दिलं जात असेल, तर भारताने आता उत्तर कायमचे समजेल अशा भाषेत द्यावं.

**संजय चौधरी**/अमरावती

## वाचक पत्रे

### भारत हिंदू राष्ट्र घोषित करा

काश्मीरला गेलेल्या पर्यटकांवर पहलगाम येथे पाकिस्तानी दहशतवाद्यांनी हिंदू असल्याची खात्री करून केलेला गोळीबार निषेधार्ह आहे. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तान्यांवर केलेली कडक कारवाई योग्यच आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प जसे कोणाचाही दबाव न मानता 'जशास तसे' या आपल्या कारवाईवर ठाम राहिले तसेच भारताने देखील करावे. या जीवघेण्या हल्ल्याने देशातील सर्व हिंदू एक झाले आहेत. याचवेळी 'भारत हिंदू राष्ट्र' जाहीर करून मोदींनी देखील एक पाऊल पुढे टाकावे. हिंदूंनी आता धार्मिक कडवेपणाने वागणे गरजेचे आहे. तरच शत्रू राष्ट्र भारताला शांततेने जगू देईल.

**ॲड. बळवंत रानडे**/९८८१४७३५८०

### हिंदूंनो, जातीने नव्हे, धर्माने एकत्र या

जिथे मानवतेचा विजय व्हायला हवा, तिथे धर्माच्या आधारावर जीवनाचा निर्णय घेतला जात आहे, तीच खरी शोकांतिका आहे. पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्यात निष्पाप हिंदूंवर गोळीबार झाला आहे. रम्य, शांत परिसरात असं काही घडावं हे विचार करायला भाग पाडणारं आहे. हा फक्त माणसांवर हल्ला नव्हता, तर हा हल्ला होता विचारांवर, श्रद्धेवर आणि एका संपूर्ण धर्मावर. आपण म्हणतो की, आतंकवाद्यांचा कोणताच धर्म नसतो. पण गोळी झाडण्यापूर्वी



जर धर्म विचारला जात असेल, तर आपण डोळसपणे हे वाक्य किती वेळा उच्चारणार? भारत हे विविधतेचं प्रतीक असलं तरी, आज हिंदू समाजच स्वतःच्या देशात असुरक्षित का वाटून घेतो? आज नवविवाहित जोडीदारांना आपला जोडीदार गमवावा लागला. हिंदू धर्मीयांनाच का लक्ष्य करत आहे? याचे कारण काय? तर भारतात त्यांचे बहुमत आहे. म्हणून धर्मवाद होतोय का? म्हणून हिंदूंना या परिस्थितीचा सामना करावा लागत आहे का? आपल्या धर्मावर प्रेम करणं, त्याचा अभिमान बाळगणे हा दोष नाही. उलट, जेव्हा आपल्या सभ्यतेला, श्रद्धेला अस्तित्वाला वारंवार आव्हान दिले जाते, तेव्हा धर्माभिमान ही आपली ढाल बनते. जात-पात, प्रांत, भाषेच्या भिंती झुगारून देण्याची हीच वेळ आहे. मी अमुक जातीचा म्हणण्यापेक्षा 'मी हिंदू आहे' ही एकच ओळख बनवणे गरजेचे आहे.

जग काहीही बोलेल, पण आपण आपल्या धर्माचा अपमान, अत्याचार आणि निर्दोषांच्या हत्या यावर शांत राहणे हा गुन्हाच होईल. मुलांना धार्मिक शिक्षणासोबत, आत्मरक्षा, कायदेशीर माहिती देणे याचीही गरज आहे. तुमचा धर्म, तुमची संस्कृती, तुमची ओळख हे सर्व तुमच्या हातात आहे. हिंदू म्हणून जर तुम्ही अभिमान बाळगत नसाल, तर उद्या तुमची किंमत विचारली जाणार नाही, धर्म विचारला जाणार! धर्मांतर, लव्ह जिहाद आणि विभाजनकारक शक्तींना प्रत्युत्तर देण्याची हीच ती वेळ आहे विचाराने, शिक्षणाने आणि एकतेने. हिंदू म्हणून संघटित होण्याची. सर्व धर्मांची शिकवण आपल्या मुलांना द्या पण कोणी आपल्या धर्मावर बोट उचलले अन् अत्याचार करत असेल तर बोट छाटायची ताकद, हिंमत आपल्यात असायला हवी.

**राधा प्रमोद पिंपळापुरे**/उमरेड

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)


सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com




बीड येथे पंधरा ते वीस दिवसांनी नळाला पाणी येत असल्याने टँकरची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. (छाया कृष्णा शिंदे)

# मलकापूर येथे जनसेवानंद सुभाषबप्पा महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त सप्ताह

गेवराई (प्रतिनिधी)–जनसेवेसाठी ज्यांनी आपले जीवन समर्पित केले ते कलियुगातील महान संत श्रेष्ठ जनसेवानंद सुभाष बप्पा महाराज यांच्या सतराव्या पुण्यस्मरणार्थ मलकापूर येथे दि.५ मे २०२५ ते दि.११ मे २०२५ दरम्यान भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे . तरी सप्ताहास भाविक भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीक्षेत्र दत्त मंदिर संस्थान, मलकापूरचे मठाधिपती ह.भ.प. सद्गुरू एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.



कलियुगातील महान थोर संत श्रेष्ठ जनसेवानंद सुभाष महाराज यांच्या सतराव्या पुण्यस्मरणार्थ श्रीक्षेत्र मलकापूर, ता.कळंब जि.धाराशिव येथे भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह व श्री सिद्ध सुभाष बप्पा विजय ग्रंथ पारायण व गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे दि.५ मे २०२५ ते दि.११ मे २०२५ या कालावधी दरम्यान आयोजन करण्यात आले असून या भव्य दिव्य सप्ताहात एक हजार टाळकरी, २२ मृदंगाचार्य या सप्ताहाचे आकर्षण असणार आहेत. तसेच या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रम सकाळी ४ ते ७ काकडा भजन, ७ ते १० सिद्ध सुभाष बप्पा विजय ग्रंथ पारायण, १० ते १२ गाथा भजन ,१२ ते ३ विश्रांती व ४ ते ६ हरिपाठ नेतृत्व रघुनंदन महाराज पुजारी (संत गोरोबाकाका वारकरी संस्था) यांच्याकडे राहील तसेच रात्री ६ ते ८ भोजन , ९ ते ११ कीर्तन अशी या सप्ताहाचा दिनचर्या आहे. या सप्ताहात पुढीलप्रमाणे ख्यातनाम कीर्तनकार मंडळींची कीर्तनसेवा होणार आहे यामध्ये दि.५ मे रोजी ह.भ.प.समाधान महाराज शर्मा, दि. ६ मे ह.भ.प. पोपट महाराज कासारखेडकर, दि.७ मे ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे, दि.८ मे ह.भ.प. डॉ जयवंत महाराज बोधले, दि.९ मे ह.भ.प. बाळू महाराज गिरगांवकर, दि.१० मे ह.भ.प. रामराव महाराज ढोक, दि.११ मे ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे कीर्तन व ह.भ.प.एकनाथ महाराज लोमटे यांचे काला व पुण्यतिथीनिमित्त काल्याचे कीर्तन होईल व महाप्रसादाचे वाटप होणार आहे. तसेच दि.१२ मे २०२५ रोजी सकाळी ७ ते ९ वारीचे प्रवचन व त्यानंतर पौर्णिमेची महाआरती मलकापूर येथे होईल तरी सर्व भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री दत्त संस्थान, मलकापूरचे मठाधिपती ह.भ. प. सद्गुरु एकनाथ महाराज लोमटे यांनी केले आहे.

# पुण्यात २७ एप्रिलला राष्ट्रीय ओबीसी महासंघाची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ एप्रिल**

राष्ट्रीय ओबीसी महासंघाने सातत्याने धरणे, आंदोलने ,अन्नत्याग आंदोलने मोर्चे काढून सरकारवर दबाव वाढवून सरकार कडून विविध मागण्या मान्य करून घेतल्या व काही मागण्या प्रलंबित असून यावर विचार मंथन करणे तसेच महासंघाच्या संघटनात्मक बाबीवर चर्चा करण्यासाठी कार्यकारणी पदाधिकारी व सभासदगण यांची २७ एप्रिल २०२५ ला रोज रविवार रोजी श्रमिक पत्रकार संघ, सदाशिव पेठ, पुणे येथे सकाळी १० ते दुपारी १ वाजे पर्यंत,राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांचे अध्यक्षतेखाली अ ाणि राष्ट्रीय ओबिसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांच्या उपस्थितीत सभा आयोजित केली आहे. सभेत संघटनात्मक बाबीवर चर्चा आणि केंद्र व राज्य सरकारशी संबंधित प्रलंबित मागण्यांवर विचार विनिमय तसेच दिनांक ७ ऑगस्ट २०२५ ला राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे दहावे राष्ट्रीय महाअधिवेशन गोवा येथे सपन्न होणार आहे यावर चर्चा केली जाईल. सभेला राष्ट्रीय ओबीसी महासंघ, महिला महासंघ, किसान महासंघ, युवा/युवती महासंघ, विध्यार्थी महासंघ, कर्मचारी महासंघ, वकील महासंघ सर्व पदाधिकारी व सभासदगण वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुन दळे यांनी काढलेल्या प्रसिध्दी पत्रकातून केली आहे.




# महावितरणच्या गलधान कारभारामुळे जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ एप्रिल**

बीड तालुक्यातील लिंबागणेश उपकेंद्र येथील बोरखेड फिटरचे केबल जळाल्याने २ दिवसांपासून महाजनवाडी येथील ग्रामस्थ अंधारात असुन जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.वीज नसल्याने मुक्या जनावरांना पिण्यासाठी पाणी देता येत नसल्याने शेतकरी संतप्त झाले असुन सबस्टेशनमध्ये जनावरे आणायची का? असा संतप्त सवाल शेतकरी भिमराव सुरवसे यांनी केला आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी तातडीने वीज पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी केली आहे.

बोरखेड फिटरचे केबल लिंबागणेश येथील उपकेंद्रात जळाल्याने २ दिवसांपासून गावाला वीज पुरवठा खंडित आहे. माणसं उकाड्याने हैराण झाली आहेत. मुक्या जनावरांचा पाण्याचा प्रश्न आहे.२ दिवसांपासून लिंबागणेश उपकेंद्राचा चार्ज असणारे उप अभियंता अभिजित शिंदे यांना २ दिवसांपासून फोन लावतोय पण फोन उचलत नाहीत. लवकरात लवकर जळालेल्या केबलच्या ठिकाणी नविन केबल टाकुन वीजपुरवठा सुरळीत नाही केला तर आम्ही ग्रामस्थ रस्त्यावर उतरू असा महावितरणला इशारा देत असल्याचे महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी म्हणाले.

# गायींना गुंगीचे औषध देणाऱ्यांना तात्काळ अटक करून कारवाई करण्याच्या पोलिसांना सूचना

## परळीतील 'त्या' संतापजनक प्रकाराची ना.पंकजा मुंडेंनी घेतली दखल

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ एप्रिल**

गायींना गुंगीचे औषध देऊन त्यांची तस्करी करण्याचा प्रयत्न काही नागरिकांच्या सतर्कतेमुळे फसल्याचा प्रकार शहरात घडल्यानंतर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी याची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकारामागे जे कोणी असतील त्यांना तात्काळ अटक करावी अशा सूचना त्यांनी पोलिस प्रशासनाला दिल्या आहेत.

शहरातील स्नेहनगर भागात काल रात्री गायींना खाण्याच्या पदार्थांमधून औषध देण्याचा संतापजनक प्रकार घडला. गायींना बेशुद्ध करून त्यांची तस्करी करण्याचा अज्ञात चोरट्यांचा प्रयत्न होता असा संशय स्थानिक रहिवाशांना आला, त्यांनी सतर्कता दाखवून हा प्रयत्न हाणून पाडला. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना हा प्रकार समजताच त्यांनी तातडीने पोलिस अधीक्षक व स्थानिक पोलिस निरीक्षक यांना संपर्क साधून या प्रकारामागे जे कोणी असतील त्यांना तातडीने अटक करून कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. गुंगीचे औषध मिश्रित पदार्थ खाल्याने ज्या गायी बाधित झाल्या होत्या त्यावर त्वरेने उपचार करण्यास त्यांनी सांगितल्यानंतर पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी उपचार करून चार गायींना धोक्यात बाहेर काढले, एका गायीवर उपचार सुरू आहेत.

# परळी पंचायत समिती गटविकास अधिकारी म्हणून संजय केंद्रे यांनी स्वीकारला पदभार

## परळीतील पत्रकारांच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ एप्रिल**

परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी म्हणून संजय केंद्रे यांनी आज शुक्रवार दि.२५ एप्रिल रोजी पदभार स्वीकारला आहे. पदभार घेतल्या नंतर परळीतील पत्रकार बांधवाच्या वतीने , शाल, पुष्पगुछ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.



याबाबत माहिती अशी की, शिरूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय केंद्रे यांची परळी पंचायत समिती गटविकास अधिकारी म्हणून आज नियुक्ती झाली. गेल्या काही महिन्यापासून परळी पंचायत समिती गटविकास अधिकारी पद रिक्त होते. वडवणी पंचायत समिती गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांच्याकडे परळीचा प्रभारी पदभार सुपूर्द करण्यात आला होता. गत १ वर्षां नंतर पंचायत समितीस कायम स्वरूपी गटविकास अधिकारी मिळाले आहेत. परळी पंचायत समिती गटविकास अधिकारी म्हणून संजय केंद्रे यांनी आज दिनांक २५ एप्रिल रोजी पदभार घेतला. त्यानंतर परळीतील पत्रकार बांधवाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे, ज्येष्ठ नेते जिवराज ढाकणे, सहाय्यक प्रशासन अधिकारी निळकंठ दराडे, प्रविण रोडे, अजय बळवंत, माले साहेब, उपस्थित होते. स्तकार प्रसंगी व्हाईस ऑफ मीडियाचे तालुकाअध्यक्ष महादेव शिंदे, कार्याध्यक्ष श्रीराम लांडगे, दिव्य मराठी तालुका प्रतिनिधी धनंजय आढाव, सकाळचे प्रतिनिधी प्रविण फुटके, संघर्षनेताचे संपादक मोहन व्हावळे, संजीब रॉय, पत्रकार धिरज जगले, मराठवाडा साथीचे अनिल गायकवाड, कैलास डुमणे, महादेव गित्ते, बाळासाहेब मुजमुले, खांडेकर व इतर पत्रकार बांधव उपस्थितीत होते.

# जातीभेद व विषमता संपविण्याचे कार्य जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांनी केले–ष.ब्र.१०८ काशीनाथ शिवाचार्य महाराज पाथरीकर

**महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त परळीतील कल्याणकारी हनुमान मंदिरात पाच दिवसीय परमरहस्य पारायणास उत्साहात सुरुवात**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ एप्रिल**



जगात जातिभेद व विषमता संपविण्याचे कार्य करणारे जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त न्यू माणिकनगर, परळी येथील कल्याणकारी हनुमान मंदिरात पाच दिवसीय परमरहस्य पारायणाचा शुभारंभ आज भाविकांच्या उपस्थितीत झाला.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी ष.ब्र.१०८ काशीनाथ शिवाचार्य महाराज पाथरीकर यांच्या आशीर्वचनाने पारायणास प्रारंभ झाला. यावेळी त्यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या कार्यावर प्रकाश टाकताना सांगितले की, १२ व्या शतकात अनुभव मंडपाच्या माध्यमातून बसवेश्वरांनी जातीय विषमता व कर्मकांडाविरुद्ध लढा दिला आणि स्त्री–पुरुष समानतेचा आदर्श प्रस्थापित केला. त्यामुळे आजही असे महापुरुष आपल्यासाठी प्रेरणास्त्रोत ठरतात.

या कार्यक्रमास महाराष्ट्र वीरशैव सभा बीड जिल्हा अध्यक्ष दत्तापा इटके गुरुजी प्रमुख उपस्थित होते. श्रीगुरूंचे स्वागत आदर्श शिक्षक अशोक नावंदे यांनी सपत्नीक केले. अशोक नावंदे सरांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते.

भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा उत्सव दिनांक २६ एप्रिल २०२५ ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान संपन्न होणार आहे. दररोज सकाळी ८ ते ११ या वेळेत परमरहस्य पारायण, दुपारी महाप्रसाद व संध्याकाळी ४ वाजता भजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. समारोपाच्या दिवशी, बुधवार दि. ३० एप्रिल रोजी महात्मा बसवेश्वर यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कल्याणकारी हनुमान मंदिर महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समिती, न्यू माणिकनगर, परळी वै. परिश्रम घेत आहे.

# पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याचा निषेध करीत दीनदयाळ बँकेकडून शोकसभा

## दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांविषयी सहानुभूती व सहसंवेदना

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ एप्रिल**

जमू काश्मीरच्या पहलगाम मध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा निषेध करीत यामध्ये मृत्युमुखी पडलेल्यांना पर्यटकांना तसेच निवृत्त विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापिका मंगलताई चिक्षे (वय ८० वर्षे) यांचे शुक्रवारी दु:खद निधन झाल्यामुळे येथील दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने मुख्यालयात आयोजित शोकसभेत भावपूर्ण श्रद्धांजली अपर्ण करण्यात आली. यावेळी दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांविषयी सहानुभूती व सहसंवेदना व्यक्त करण्यात आल्या.

शुक्रवार, दिनांक २५ एप्रिल रोजी येथील दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या वतीने मुख्यालयात आयोजित शोकसभेत बोलताना बँकेचे अध्यक्ष अॅड.मकरंद पत्की यांनी सांगितले की, जम्मू काश्मीरच्या पहलगाम मध्ये बैसरन खोऱ्यात मंगळवार, दिनांक २२ एप्रिल रोजी पर्यटक आणि नागरिकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी आपण या ठिकाणी एकत्र जमलो आहोत. निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेत असलेल्या पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून पर्यटकांवर गोळीबार करण्यात आला. या दुर्दैवी घटनेत २८ पर्यटक व नागरिक ठार झाले. मृतांमध्ये ३ जण महाराष्ट्राचे रहिवासी आहेत. या भ्याड हल्ल्याबाबत जगातील तसेच भारतीय नागरिकांत तीव्र निषेधाची भावना आहे. दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांविषयी सहानुभूती व सहसंवेदना आहे. या हल्ल्यातील मृतांच्या नातेवाईकांच्या पाठीशी आज संपूर्ण देश ठामपणे उभा आहे. दहशतवाद्यांनी विकृत मानसिकता संपवावी असे आवाहन करून मृत पावलेल्या पर्यटक आणि नागरिकांच्या दुःखात दीनदयाळ बँक परिवार सहभागी आहे. या शब्दांत बँकेचे अध्यक्ष अॅड.मकरंद पत्की यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या. तर या प्रसंगी बँकेच्या संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर यांनी सामाजिक कार्यकर्ते तथा अंबाजोगाई येथील ज्ञान प्रबोधिनीचे सर्वेसर्वा प्रसाददादा चिक्षे यांच्या आई व निवृत्त विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापिका मंगलताई चिक्षे (वय ८० वर्षे) यांचे शुक्रवारी पुणे येथे दु:खद निधन झाल्याचे सांगून चिक्षे कुटुंबियांप्रति सहवेदना व्यक्त केल्या. आणि मंगलताई यांच्या प्रेरक कार्याविषयीच्या अनेक आठवणींना उजाळा दिला. चिक्षे कुटुंबियांच्या दुःखात दीनदयाळ बँक परिवार सहभागी आहे. या शब्दांत बँकेच्या माजी अध्यक्षा व विद्यमान संचालिका सौ.हेबाळकर यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या. यावेळी दीनदयाळ बँकेचे संचालक मकरंद कुलकर्णी सोनेसांगवीकर, संचालक जयकरण सुरेशकांबळे, संचालक अशोकराव लोमटे, दीनदयाळ बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर, वैधानिक लेखापरीक्षक जयंत जोशी (छत्रपती संभाजीनगर) यांची प्रमुख उपस्थिती होती. शोकसभेचे सुत्रसंचालन प्रतिभा गोस्वामी यांनी केले. उपस्थित सर्वांनी २ मिनिटे स्तब्ध व शांत उभे राहून भावपूर्ण श्रद्धांजली अपर्ण केली. यावेळी दीनदयाळ बँकेचे सभासद, खातेदार, ठेविदार, ग्राहक, बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारी वर्ग उपस्थित होता.




# परळी परिसरात नागापूर वाण प्रकल्पासारखा दुसरा तलाव निर्माण करावा

**उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडे चेतन सौंदळे यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२६ एप्रिल**

परळी तालुक्यातील पाणी टंचाईवर कायमची मात करण्यासाठी परळी परीसरातील भौगोलिक व नैसर्गिकरित्या अस्तित्वात असलेल्या डोंगर परीसरातील वाहून जाणारे पावसाचे पाणी अडवून नागापूर वाण प्रकल्पासारखा दुसरा पाण्याचा साठवण निर्माण करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते माजी नगरसेवक चेतन सौंदळे यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडे शनिवार दि.२६ एप्रिल रोजी परभणी येथे प्रत्यक्ष भेट घेऊन करण्यात आली.




प्रभू वैद्यनाथाची तसेच पाण्याची नगरी म्हणून ओळख असणा–या परळी शहरासाठी पूर्वी दररोज दोन वेळा नगर परीषदेमार्फत पाणी पुरवठा होत होता. २०१९ मध्ये परळी व परीसरातील गावांना पाणी पुरवठा करणा–या नागापूर येथील वाण प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात अपूरा पाऊस झाल्यामुळे परळीकरांच्या ईतिहासात पहील्यांदाच दहा दिवसा आड पाणी पुरवठा झाला,अनेकवेळा अपूरा पाऊस झाल्यास नागरिकांना तीव्र पाणी टंचाईस सामोरे जावे लागत आहे.

भविष्यातील वाढती लोकसंख्या,शहराचे विस्तारीकरण,उद्योग व निर्माण होणारे नवउद्योग,तसेच पिण्याच्या पाण्याची कायमची समस्या दुर करण्यासाठी व आजूबाजूच्या परीसरातील पर्यावरण जोपासण्यासाठी नागापूर येथील वाण प्रकल्पासारखा दुसरा पाण्याचा साठवण तलाव राज्य सरकारच्यावतीने निर्माण करण्याची मागणी चेतन सौंदळे यांनी केली आहे.

www.tarunbharat.net
तरुण भारत
छोटे उस्ताद
रविवार, दि. २७ एप्रिल २०२५

## तुम्हाला माहिती आहे का?

● प्राचीन भारत आणि रोम यांच्यातील संबंधाचा विचार करता सामान्य युगाच्या पहिल्या शतकात आढळतात. विशेषतः रोमन सम्राट ऑगस्टस (२७ ई.पू. - १४ ई.) यांच्या काळात हे संबंध अधिक ठळकपणे दिसून येतात. त्या काळापासून जागतिक व्यापारासाठी एक महत्त्वाचा व्यापारी देश अशी भारताची ओळख दिसून येते. दक्षिण भारतातील सातवाहन, चेर, चोल आणि पांड्य यांसारख्या साम्राज्यांनी आणि उत्तर-पश्चिम भारतातील कुषाण साम्राज्याने रोमसोबत व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध प्रस्थापित केले, या संपर्कामुळे दोन्ही देशांमधील संस्कृती ची देवाण-घेवाण घडून आली.

## अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

# नदी सुरय




पक्षिजगतात पक्ष्यांची नावंही काय काय असतात नं! जास्तीत जास्त वेळ गोड्या पाण्याजवळच आपला विसावा शोधणारा असा एक पक्षी आहे, जो जगात सुरय पक्ष्यांच्या १२ प्रजातीपैकी एक असलेला आपला भारतातला नदी सुरय नावाच्या पक्ष्याच्या अनेक जाती येथे आढळतात. पक्षी वर्गाच्या कॅरॅड्रिफॉर्मिस गणाच्या लॅरिडी कुलाच्या स्टर्निडी उपकुलातील पक्ष्यांना इंग्रजीत 'टर्न' असे म्हणतात. अर्थात मराठी जगतात नदी सुरय या पक्ष्याला 'नदी कुररी' असेही म्हणतात. भारतात ठळकपणे आढळून येणाऱ्या स्टर्ना ऑरंशिया ही सुरय पक्ष्याची जाती वास्तव्यास आहे. भारतासह पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, म्यानमार, थायलंड, चीन आणि व्हिएतनाम या देशांमध्येही हा पक्षी आपला परिवार सांभाळून आहे.

सामान्यपणे गोड्या पाण्याजवळ हा पक्षी आढळतो. असे असले तरी क्वचित वेळी खाडीजवळही नदी सुरय हा पक्षी अनेक पक्षिमित्रांनी पाहिल्याची नोंद आहे. नदी सुरय हा स्थानिक पक्षी आहे. अन्य पक्ष्यांप्रमाणे तो स्थलांतर करण्याच्या भानगडीत पडत नाही. नदी सुरय या पक्ष्याचे वर्णन करायचे झाल्यास शरीरयष्टीने सामान्य कबुतरापेक्षाही तो सडपातळ असतो. थोडा लांबुळका असलेला नदी सुरयच्या शरीराच्या पाठीकडचा भाग राखाडी असतो तर, पोटाकडचा भाग पांढरा असतो. शेपटी दुभंगलेली असून लांब असते. पंखही लांब व टोकदार असून पंखांचा विस्तार मोठा असतो. नदी सुरयची चोच लांब व पिवळी असते तर पाय तांबडे असतात. मादी नदी सुरयची विणीच्या काळात डोक्यावरची, मानेच्या मागच्या भागापर्यंतची पिसं काळ्या रंगाची होतात. त्यामुळे हे पक्षी डोक्यावर टोपी घातल्याप्रमाणे भासतात. तथापि, जसजशी थंडी सुरू होते तेव्हापासून हीच पिसे करड्या पांढऱ्या रंगाची होतात. नदी सुरय या पक्ष्यातील नर व मादी दिसायला सारखेच दिसतात. आपण त्यांना सहजासहजी ओळखू शकत नाही. हे पक्षी नद्यांच्या काठांवर, जलाशयांच्या प्रवाहातील वाळूत घरटी तयार करतात. जमीन खरवडून किंवा गवताखाली खड्डा तयार करून ते कपासारखे घरटे तयार करतात. नदी सुरय यांचे मुख्य खाद्य हे मासे असले तरी खेकडे आणि पाणकीटकही ते खातात. दिवसेंदिवस नद्यांमधील वाढत्या प्रदूषणामुळे नदी सुरय या पक्ष्यांची संख्याही कमी झाली आहे. पक्ष्यांना जीवनदान मिळण्यासाठी आणि पर्यावरणातील त्यांचे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी नदीचे प्रदूषण कमी करण्याची जबाबदारी मानवाने स्वीकारणे गरजेचे आहे.

# रामायणातील सायबेरिया

**रशियातील** मोठा देश म्हणजे सायबेरिया! याच्या जवळ पश्चिमेला उरल पर्वत, उत्तरेला आर्क्टिक महासागर, पूर्वेला प्रशांत महासागर व दक्षिणेला कझाकस्तान, चीन व मंगोलिया हे देश आहेत. मंगोलियन संस्कृतीतील रामायण हे आपल्याला माहिती आहेच. किष्किंधा कांडातील सर्ग ४३ मध्ये, सुग्रीव उत्तर दिशेच्या देशांची माहिती सांगतो आहे. यामध्ये तो तेथील वनस्पती, पशू-पक्षी, नद्या, डोंगर-पर्वत याबद्दल सांगता सांगता पुढे जातो आणि शेवटी तो सायबेरिया प्रदेशाजवळ येतो. आर्क्टिक महासागराबद्दल तो सांगतो,



तम् अतिक्रम्य शैलेन्द्रम् उत्तरः पय्सामब निधिः
तत्र सोम गिरिर् नाममध्ये हेममयो महान! (४-४३-५३)

(एक महान पर्वतरांग (शैलेन्द्रम्) पार केल्यावर उत्तरेकडे एक विशाल जलनिधी (पय्साम् निधिः) आहे म्हणजेच बर्फाच्छादित जलस्रोत किंवा समुद्र! त्या जलस्रोताच्या मध्यभागी एक सुवर्णमय पर्वत आहे, ज्याचे नाव 'सोमगिरी' असे आहे. या पर्वताचा उल्लेख 'हेममय' म्हणजेच सोन्यासारखा तेजस्वी किंवा खऱ्या अर्थाने सोन्याचा बनलेला, असा केला जातो.) भारतीय संस्कृतीने आधीपासून वैज्ञानिक आणि तत्वशुद्ध व तत्वसंगत आपले विचार मांडले आहेत. रामायणात जगाचा पहिला भौगोलिक नकाशा मांडला आहे. यात सर्वात आधी पृथ्वी गोल आहे हे सांगितले आहे. दुसरे असे की भारतीय लोकांचा आधीपासूनच जगातील इतर देशांशी संबंध येत होता त्यामुळेच त्यांनी इतक्या बारकाईने प्रदेश, व्यक्ती, पशू-पक्षी, निसर्ग इ. सगळ्या गोष्टींचे वर्णन केले आहे.

**(आकांक्षा टीम)**

## Word puzzle

Solve the questions using BODMAS rule.

1) 6 + 5 * 3 + ( 1 + 2 )
2) 10 / 2 + 2 - 4
3) 2 * 6 + ( 9 * 3 ) - 5
4) 35 + 24 / (14 - 8 )
5) 5 + 6 - 9

: Previous word puzzle answer :
1) Eagle 2) Hen 3) Crow 4) Duck 5) Peacock 6) Sparrow 7) Owl 8) Dove

## शब्द ओळखा...

सोबतच्या अष्टकोणात 'अ' या अक्षरापासून आरंभ होणारे शब्द संकेतानुसार तुम्हाला शोधावयाचे आहे




1 एकमेकांसमोर जाण्याची चढाओढ, स्पर्धा
2 पुस्तकातील विषयांची, प्रकरणाची आरंभी दिलेली सूची
3 ग्रंथाच्या शेवटी असलेला ग्रंथाचा सारांश
4 खुप मोठा आव आणून वेळ आली की हतबल होणे
5 याची वस्तू त्याला व त्याची वस्तू याला असा फेरफार, परस्पर देवघेव
6 ज्याचा चेहरा पाहून भीती वाटेल असा फार भयंकर, भीतिप्रद
7 मराठी सोबतच हिंदी चित्रपटांतही विविधांगी भूमिका साकारणारा लोकप्रिय अभिनेता
8 महाराष्ट्रात अत्यंत प्रसिद्ध असलेली श्री गणेशाची आठ जागृत स्थाने

मागील शब्दकोडे उत्तर :- आडवे शब्द – 2.सत्याग्रह 3.सलगी 4.सरस 7.समरस उभे शब्द – 1.सहवास 2सकस 5. सदनिका 6.समास

# गनिसा दीपा योगेश्वर दंधारे



संजय पेंडसे/९४२२४४३२९५

**बालमित्रांनो,** जोपर्यंत आपण श्रम करून थकत नाही तोपर्यंत देवही मदत करत नाही' इंग्रजीमध्ये याच अर्थाची एक प्रसिद्ध म्हण आहे. गॉड हेल्प्स देम हू हेल्प देमसेल्व्ज!

आजची आपली वंडर गर्ल गनिसा ही बारा वर्षांची असून, माउंट लिटेरा झी स्कूल बेस येथे सहाव्या वर्गात शिकते. अभ्यासाशिवाय अनेक गोष्टींमध्ये ती पुढाकार घेते आणि यशाकरता सतत श्रम करते. अर्थात यामध्ये तिच्या आई-वडिलांच्या प्रोत्साहनाचा मोठा वाटा आहे. गनिसा गाणं म्हणते, नृत्य करते, पोवाडा गाते, शिवगर्जना करते आणि कुठेही स्पर्धा असो ती हमखास सहभागी होऊन स्वतःचं अस्तित्व सिद्ध करते. तिने आजवर पाच गडकिल्ले आईवडिलांच्या मदतीने सर केले आणि त्या ठिकाणी शिवाजी महाराजांच्या संकल्पनेतून तिने प्रोत्साहन व मार्गदर्शन घेतले. उमेश बारापत्रे या संगीत शिक्षकांकडे गनीस संगीताचे धडे घेतेय. तिने नृत्याचा सराव डॉ. तमन्ना असाती यांच्याकडे करते. शाळेत नेहमीच टॉपर असलेली गनीसा खासदार महोत्सव, भारत विकास परिषदेची स्पर्धा किंवा इतर कोणत्याही स्थानिक स्पर्धांमध्ये हमखास सहभागी होऊन यश मिळवते. मुख्य म्हणजे अभ्यासाशिवाय ती माहिती समजावून सांगते, हा तिचा छंद आहे. नसरीन या हिंदी शिकवणाऱ्या शिक्षिका आणि अश्विनी या विज्ञान शिक्षिका तिला आवडतात. त्याचप्रमाणे निमिश, त्रिशांग, सुहानी हे तिचे जिवलग मित्र आहेत. सतत काहीतरी करण्याची जिद्द असलेली गनीसाला तिच्या श्रम करण्याच्या स्वभावामध्ये अर्थात देवही मदत करत असावा. काही अडचण आली तर त्यावर मात करून यश मिळवण्याच्या तिच्या प्रयत्नांत तरुण भारतचा छोटे उस्ताद नेहमीच तिच्या पाठीशी आहे, याची तिने खात्री बाळगावी.

## प्रश्नसंच - ९



### तरुण भारतचा अभिनव उपक्रम ज्ञानांजली!

**संतश्रेष्ठ** गजानन महाराज यांच्या चरित्राविषयी सविस्तर जाणून घेण्यासाठी श्रीगजानन महाराज अध्ययन समूह, नागपूरच्या सहकार्याने तरुण भारतच्या वतीने, 'ज्ञानांजली' हा अभिनव उपक्रम सुरू आहे. श्री गजानन विजय या ग्रंथावर आधारीत दहा प्रश्न दर शनिवारी आकांक्षा पुरवणीत प्रसिद्ध केले जातील. अचूक उत्तर निवडण्यासाठी चार पर्यायही दिले जातील. ज्ञानांजलीतील सर्व १० प्रश्नांची अचूक उत्तरं देणाऱ्या भाग्यवंत भक्तांची नामावली पुढच्या आकांक्षामध्ये प्रकाशित करू. ही प्रश्नावली तुम्हाला गूगल फॉर्म स्वरूपातच सोडवायची आहे. प्रिंट किंवा हस्तलिखीत स्वरुपात दै.तरुण भारत कार्यालयाकडे ती पाठवू नये. आपली ज्ञानसेवा श्रींच्या चरणी रुजू करण्याची ही सुवर्णसंधी आहे. प्रत्येक शनिवारी गूगल फॉर्म मिळविण्यासाठी 'तरुण भारत नागपूर' या आमच्या व्हॉट्स ॲप चॅनेलला फॉलो करा. अधिक माहितीसाठी सुरेखा देशपांडे ९८२२४४४२४५ या क्रमांकावर संपर्क करा. जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

१) **'तू मुळचाच मूढमती' असे कोण म्हणाले?**
अ) दासगणू महाराज ब) बाळाभाऊ
क) गजानन महाराज ड) नरसिंग महाराज

२) **साळूबाईंची शाखा कोणती होती ?**
अ) कण्व ब) माध्यंजन क) कऱ्हाडे ड) कोकणस्थ

३) **प्रदोषकाळी जो शिव आराधना करेल तो भाग्यवंत, असे कुठे सांगितले आहे ?**
अ) गणेशपुराण ब) शिवपुराण क) स्कंधपुराण ड) विष्णुपुराण

४) **आग्यामोहोळ कोणत्या वृक्षावर होते ?**
अ) आंबा ब) चिंच क) कडुलिंब ड) वड

५) **नरसिंह सरस्वतींचा शिष्य कोण ?**
अ) पटवर्धन ब) टिळक क) कोल्हटकर ड) खापर्डे

६) **पुंडलिक भोकरे हा कोणाचा मुलगा होता ?**
अ) पेंटय्या ब) केरपुंजा क) उकीर्डा ड) दगड्या

७) **श्रीदासगणू महाराजांना ग्रंथ लिहिण्याची विनंती कोणी केली ?**
अ) रामचंद्र पाटील ब) हरी पाटील क) कृष्णा पाटील ड) बंकटलाल

८) **नारायण कोण होते ?**
अ) कुणबी ब) माळी क) तेली ड) ब्राह्मण

९) **चिंचोलीच्या माधवाला यमलोक दाखवून मुक्त केला? हे कोणत्या अध्यायात आहे?**
अ) चवथा ब) पाचवा क) सहावा ड) सातवा

१०) **'मुमुक्षुला दावा पंथ, संतचरण सेवेचा' असे दासगणू महाराजांनी कोणत्या अध्यायात म्हटले आहे ?**
अ) १९ ब)१६ क) ६ ड) ४

### प्रश्नसंच क्र.८ चे भाग्यवान विजेते

**एकूण ४७४ जणांनी उत्तरे दिलीत, त्यापैकी खालील माऊलीभक्तांनी पैकीच्या पैकी गुण प्राप्त केले. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.** अंजली भानेगावकर, अतुल देवगडे, सोहम जोशी, रवींद्र टोंगळे, मीना खेडेकर, शुभांगी सूर्यवंशी, अतुल चोरघडे, रवींद्र धांडे, भाग्यश्री शर्मा, शोभा कुळकर्णी, संजय काळे, शर्वरी परब, प्रतिभा बुरकुले, नीरजा धामणगांवकर, योगिता अभ्यंकर, सुवर्णा जोशी, कुंजलता सरनाईक, प्रदीप कुळकर्णी, अरूण सूर्यवंशी, जयश्री शिरबावीकर, प्रवीण कोदंडे, प्रवीण खेडेकर, प्रतिभा पाटील, लता कुयरे, अलका देशमुख, अनुराधा आपटे, नीता कुळकर्णी, ज्योती नगरकर, स्वाती राजहंस, स्वरूपा पडसलगीकर, वत्सला डिवरे, दीपा मलगी, मंजुश्री भागडे, सीमा धर्माधिकारी, प्रसाद कावळे, अपर्णा जोशी, साक्षी पांडे, मेघल भार्गव, प्रतिमा गोरे, सुनिता कुळकर्णी, अथर्व पिंगळे, प्रदीप कारेकर, मंगेश मालपे, शिवशक्ती साखरे, स्वाती देशपांडे, रश्मी भालेराव, शीतल भट, सुरेखा कोकजे, उज्वला फिरके आणि जयश्री डोरले!

### मागच्या ज्ञानांजलीतील प्रश्नावलीची उत्तरे!


१) जठार वकिलाला २) खंडू गजानन महाराजांना ३) दासगणू महाराज लोकांना ४) गजानन महाराज व्रजभूषणाला ५) दासगणू महाराज लोकांना ६) गजानन महाराज गोपाळ बुटींना ७) पुंडलिक भागी ठाकरणीला ८) टिळक लोकांना ९) गजानन महाराज भास्करास १०) पीतांबर गजानन महाराजांना

## रत्नाकर

डॉ. अरुंधती वैद्य/ ९४२०३९७५५९

**आपला देश हा नररत्नांची खाण आहे. त्यांना भूषविण्यासाठी प्रदान केला जाणारा सर्वोच्च नागरी पुरस्कार म्हणजे भारतरत्न! या सदरातून आपण या भारतरत्नांची संघर्षगाथा आणि त्यांची कारकीर्द जाणून घेणार आहोत. या सदराची सुरुवात करतोय आपल्या 'सचिन'वरील लेखाने!**

# खोडकर सचिन!



मुलांनो, २४ एप्रिल हा आपल्या लाडक्या 'तेंडल्या'चा म्हणजे सचिन तेंडुलकरचा जन्मदिवस! क्रिकेट आवडणाऱ्या मुलांसाठी तर सचिन तेंडुलकर देव आहे, हो ना! लहानपणी सचिन तुमच्यासारखाच किंवा तुमच्यापेक्षा थोडा जास्त खोडकर मुलगा होता. सचिनच्या आई-वडिलांचे घर होते चौथ्या मजल्यावर! त्या घराला ग्रील लावलेली एक छोटी बाल्कनी होती. छोटा सचिन उंचीने लहानसा! त्यामुळे, त्याला खाली काय चाललंय ते दिसत नसे. सचिनला खाली काय चाललंय, हे बघण्याची उत्सुकता फार! ग्रीलमधून एका ठिकाणी डोके तेवढे बाहेर काढून, खाली बघता येत असे. एकदा तर गंमतच झाली. सचिनने ग्रीलमधून डोके बाहेर काढले पण, नंतर त्याला ते आत घेता येईना. तब्बल अर्धा तास सचिन तिथे अडकून पडला. सगळ्यांनी खूप प्रयत्न केले पण, डोके काही निघेना. मग, डोक्यावर खूप तेल ओतले आणि केव्हातरी एकदाचे डोके निघाले. असा उपद्व्यापी होता सचिन ! सचिन खोडकर असला तरी शाळेत जाण्याचा त्याला कधी कंटाळा येत नसे पण, तुम्हाला आवडतात तशाच त्यालाही उन्हाळ्याच्या सुट्या फार आवडायच्या. पण मुलांनो, सुट्या लागल्या की, तो तुमच्यासारखा घरात टीव्ही बघत नाही बसायचा. उन्हाची पर्वा न करता, दिवसभर घराबाहेर खेळत राहायचा. तो आणि त्याचे मित्र सतत खोड्या करत राहायचे. तुम्ही ज्याला 'काड्या करणे' म्हणता ना तशा 'काड्या करणे' सचिनला आणि त्याच्या मित्रमंडळीला फार आवडायचे. उन्हाळ्यात शेजाऱ्यांच्या झाडाच्या चोरून कैऱ्या तोडणे हा तर यांचा आवडता उद्योग होता. लहानपणी खोडकरपणामुळे सचिनला सतत कुठे ना कुठे जखमा व्हायच्या. कुठेतरी खरचटायचे. घरच्या वडीलधाऱ्यांना हे कळलं तर आपलं खेळणं बंद होईल, आपल्याला बोलणी खावी लागतील, या भीतीने सचिन आपल्या जखमा लपवून ठेवायचा. मुलांनो, मात्र दुःख सहन करण्याच्या या सवयीने त्याला मोठेपणी क्रिकेट खेळताना झालेल्या अनेक जखमा आणि वेदना सहन करण्याची ताकद मिळवून दिली. सचिन बारा वर्षांचा असताना, एकदा मुंबईच्या शिवाजी पार्क मैदानावर क्रिकेटची मॅच खेळायला गेला. सचिन टीमचा कॅप्टन होता. मॅच खेळताना यष्टीरक्षक जखमी झाला. त्याच्या जागी उभं रहायला दुसरा कोणी तयार झाला नाही. सचिनला यष्टीरक्षणाचा काही अनुभव नव्हता पण, त्यालाच शेवटी यष्टीरक्षक म्हणून उभं राहावं लागलं. पुढच्या क्षणी सचिनजवळ अतिशय वेगाने आलेला चेंडू त्याला पकडता आला नाही. तो चेंडू त्याच्या डोळ्याच्या वर अतिशय जोराने आदळला. जखम खूप खोल होती आणि खूप रक्तही वाहू लागले. अशा जखमी अवस्थेत घरी कसं जायचं? टॅक्सीने घरी जाण्याएवढे पैसे त्याच्याजवळ नसायचे. मग, सचिनने त्याच्या एका मित्राला सायकलवर बसवून घरी घेऊन जाण्याची विनंती केली. मित्र तयार झालाही पण, रस्ता चढावाचा शिवाय, सचिन जवळ क्रिकेटची अवजड किटबॅग! मित्राला सायकल काही पेलवेना. शेवटी तशा अवस्थेत सचिन पायी चालू लागला. मुलांनो, भविष्यात खेळताना होणाऱ्या जखमांसाठी सचिन तेंडुलकर असा तावून-सुलाखून तयार झाला. आपण आपल्या देशाचं प्रतिनिधीत्व करतो आहोत, याचा सचिनला विलक्षण अभिमान होता.त्यामुळेच तो विविध शारीरिक दुखापती, शस्त्रक्रिया, कधी पदरी पडलेलं प्रचंड अपयश, त्यामुळे प्रसारमाध्यमांनी केलेली टीका या सगळ्यांवर मात करत, क्रिकेटविश्वात विक्रमामागून विक्रम करीत दीर्घकाळ खेळू शकला.

दोस्तांनो, अशा या तुमच्या लाडक्या 'तेंडल्या','सच्ची'ला त्याच्या येणाऱ्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन त्याचं अभिष्टचिंतन करू या!

# बंटीची बंडखोरी



(भाग ४८)

प्रीती वडनेरकर /९८२३९९४७९२

'बंटी, उद्या आपल्याला पहाटे लौकर प्रतापगडासाठी निघावं लागेल. लक्षात आहे नं?' बाबांनी विचारलं. 'बाबा, माझ्या लहानपणी आपण महाबळेश्वरला गेलो असताना प्रतापगडला गेलो होतो. तिथून खूप जवळ आहे नं?' बंटीला लहानपणीची धूसर आठवण होती. 'तिथून फक्त २५ किलोमीटर्सवर आहे प्रतापगड! आपण आता कोल्हापूरला आहोत त्यामुळे लांब आहे. तुझ्या दोस्तांना सांग. फोनवर अलार्म लावून घ्या,' बाबांनी सांगितलं. आंघोळी वगैरे आटोपून सारे पहाटे पाचलाच कारमध्ये बसले. पहाटेचं वारं साऱ्यांना सुखद गारवा देत होतं. 'काका, अफजलखानाचा वध इथपासून पुढचं माहीत आहे. पण, तो कोण होता? आणि शिवाजी महाराजांशी त्याची दुश्मनी का होती? महाराजांना मारायला तो का टपला होता? त्याबद्दल सांगा नं,' शिरीषनं बंटीच्या बाबांना विनवलं.

'म्हणजे थोडक्यात, पार्श्वभूमी सांगा...असंच म्हणाचंय नं तुला शिरीष? आम्हालासुद्धा उत्सुकता आहे, ऐकायची,' स्वानंद म्हणाला. 'थांबा थोडं. पुढे एक चहाची टपरी दिसते आहे. तिथे चहा घेऊ या म्हणजे तरतरी येईल,' आईनं सांगितलं. 'ड्रायव्हर दादा, चहाच्या टपरीजवळ थांबवा. आपण सगळेच चहा घेऊ. चहा म्हणजे आमच्या आईचा वीक पॉईंट आहे,' बंटीनं आईच्या सूचनेचं समर्थन केलं. चहा घेतल्यावर खरोखरच तरतरी आली आणि साऱ्यांची झोप पार पळून गेली. 'त्यावेळी अफजलखान विजापूरच्या आदिलशहाच्या दरबारात सरदार होता. जवळपास सात फूट उंचीचा हट्टाकट्टा अफजलखान अतिशय शूर होता. आपल्या पराक्रमाने त्याने आदिलशहाचे साम्राज्य वाढवायला मदतच केली होती. शिवाजी महाराजांचे थोरले बंधू संभाजीराजे यांचा कटकारस्थान करून वध करणारा हाच अफजल खान!

आदिलशहाच्या मृत्युनंतर त्याच्या बडी बेगमने सारा राज्यकारभार आपल्या हाती घेतला. त्यावेळी शिवाजी महाराजांनी कोवळ्या वयात अनेक गडकिल्ले जिंकून हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेला सुरूवात केली होती. त्यांना मुघलांना नेस्तनाबूत करायचं होतं,' बाबा सांगत होते. 'पण, त्यावेळी शहाजी राजे कुठे होते? कैदेत होते का?' बंटीनं विचारलं.'शहाजी राजे कर्नाटकात होते. आदिलशाही हादरली होती. एवढासा कोवळा शिवाजी, सगळ्या मोगलांना जेरीस आणतो आहे असं पाहून बडी बेगमनं, राजांना पकडण्यासाठी इनाम जाहीर केलं. पण, कोणीच पुढे येईना. बडी बेगमने आपल्या सरदारांना डिवचलं. अशात, अफजलखान पुढे सरसावला. तोपर्यंत एकही लढाई तो हरला नव्हता. त्याने शिवाजीराजांना 'जिंदा या मुर्दा' पकडून दरबारात हाजीर करण्याचा विडा उचलला.' 'बापरे केवढा आत्मविश्वास! बाबा, हे मुघल खरंच अति प्रौढी मिरवणारे होते नाही का? त्यांना, महाराजांच्या गनिमी काव्याची कल्पनाच नव्हती. 'शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ' असते, याची जाणीव नव्हती,' बंटीनं आपलं मत मांडलं. बंटी ग्रुप अक्षरशः भारावून गेला. 'हो नं...हो हो' साऱ्यांनी बंटीच्या मताशी सहमती दाखवली.

'त्यावेळी महाराजांचा मुक्काम प्रतापगडावर होता. भोवताली जावळीचं घनदाट जंगल होतं. खानाला वाईचा परिसर स्वतःचा एरिया वाटत होता. म्हणून त्याच्या खाशा स्वाऱ्या तिथे डेरेदाखल झाल्या. हत्ती, घोडे, पायदळ असं प्रचंड पाठबळ त्याच्याजवळ होतं,' बाबांना मध्येच थांबवत बंटी म्हणाला,'बाबा, तुम्ही जरा दम खा. पाणी प्या. केव्हाचे सांगताहात!' बंटीनं झाकण उघडून बाबांच्या हातात बाटली दिली. बाबांच्या घशाला कोरड पडली होती. त्यांनी घटाघटा पाणी संपवलं. 'आता यापुढचं मी सांगते बाळांनो! चालेल?' आईनं विचारलं. 'अर्थातच! आई तू सुद्धा बाबांसारखी इतिहासप्रेमी आहेसच. तू सांग आता,' बंटी म्हणाला.

'गडाजवळ पोहचेपर्यंत मी सांगते. हं... तर खानाजवळचं प्रचंड सैन्य, हत्ती, घोडे, उंट सारं वाईमध्येच होतं. महाराजांनी खानाला वाईत येऊन भेटायला भीती वाटल्याचं सोंग घेतलं. प्रतापगडाच्या तळाशी भेट घ्यायचं ठरलं. शाही शामियाना उभारला. उत्तमोत्तम कारागिरीच्या वस्तू ठेवल्या गेल्या. उंची नजराणे भेट दिले. खानाबरोबर सय्यद बंडा हा अंगरक्षक आणि राजांबरोबर जिवा महाला हा अंगरक्षक होता. महाराजांनी अंगरख्याच्या आत चिलखत आणि जिरेटोपाच्या आत लोखंडी टोप घातला होता. अफजलखानाच्या शाही शामियान्यात महाराज पोहचले. राक्षसी अफजलखानानं महाराजांना मिठी मारली. आपल्या कंबरेला लटकवलेली कट्यार काढून त्याने महाराजांच्या पाठीवर सपासप वार केले. महाराजांनी अंगरख्याच्या आत चिलखत घातलं असल्यानं खानाचे वार वाया गेले. महाराजांनी लपवलेली वाघनखी आणि कृपणाचा वार केला आणि खानाचा अक्षरशः कोथळा काढला. खान कोसळला पण सय्यद बंडा महाराजांवर चालून गेला. पण, जिवा महालाने त्याला तलवारीने प्रत्युत्तर दिलं. अफजलखानाच्या वधाची बातमी वाऱ्यासारखी पसरली. महाराजांच्या मावळ्यांनी खानाच्या सैन्याला नामोहरम केलं. प्रतापगड अबाधित राहिला. गडावर आनंदी आनंद झाला. शहाजीराजे बेहद्द खुष झाले.'

बंटी ग्रुपनं टाळ्यांच्या कडकडाट केला.'वा, आईबाबा! तुम्ही दोघांनी प्रतापगडचा इतिहास आमच्यापुढे जिवंत उभा केलात. किती रंगून गेलो होतो आम्ही! आई, तुझं वर्णन संपायला आणि आपण प्रतापगडाच्या पायथ्याशी पोहचायला एकच गाठ पडली. थँक्स अ लॉट!' बंटी ग्रुप आणि आईबाबा सारे कारमधून खाली उतरले. नेहमीप्रमाणे गाईड केला. किल्ल्याच्या दिशेनं सारे चालू लागले. 'मुलांनो, तुम्ही सांगितलं की, तुमच्या आईबाबांनी अफजलखानाचा इतिहास, पार्श्वभूमी आणि वधाचं संपूर्ण वर्णन करून सांगितलं. त्यामुळे, मी परत तेच ते सांगत बसत नाही,' गाईडदादा म्हणाला.

'दादा, तुम्ही आता आम्हाला गडाचं महत्व, महत्वाची ठिकाणं याबद्दल सांगा आणि दाखवा,' बंटी चढता चढता म्हणाला.

'आता आपण गडाच्या दक्षिणेच्या टेहळणी बुरूजाखालून चाललो आहोत. तटबंदीत लपलेल्या पश्चिमाभिमुख महाद्वारात येऊन पोहचलो आहोत,' गाईडदादा सांगत होते.

बंटीनं विचारलं,'पण गाईडदादा तटबंदीत हे महाद्वार का लपवलं असेल?' 'शत्रूला कळू नये, किल्ल्यावर कसं आणि कुठून जायचं ते!' गाईडदादा म्हणाला.

'दादा, महाराजांच्या प्रत्येक गडाचे दरवाजे सूर्यास्तानंतर बंद होत असत आणि सूर्योदयापूर्वी उघडत असत, हे खरं आहे का?' बंटीला उत्सुकता होती.

'आजही तोच शिरस्ता चालू आहे?'

'हो अगदी बरोबर! चला आता उजव्या बाजूला, चिलखती बांधणीच्या बुरूजाकडे जाऊ. इथलया पायऱ्या दिसताहेत नं, त्या भवानी मंदीर आणि पलिकडे असलेल्या, महाराजांच्या पूजेतील स्फटिकाच्या शिवलिंग मंदिराकडे जातात. उजव्या हाताला, समर्थ रामदास स्वामींनी स्थापलेली हनुमानाची मूर्ती दिसते. आता किल्ल्याचं मुख्य प्रवेशद्वार ओलांडले आहे. या बुरूजावर चढा,' गाईडदादा म्हणाला. बंटी ग्रुप आणि मंडळी, बुरूजावर चढले. 'इथून या पर्वतरांगा दिसताहेत. त्या प्रत्येक पर्वताचं वेगवेगळं महत्व आहे. आता खाली या. इकडे राजमाता जिजाईंच्या वाड्याचे अवशेष आहेत. उजवीकडे बाग दिसते आहे? त्या बागेच्या मधोमध, महाराजांचा अश्वारूढ पुतळा आहे. तो पहा.'

सारे पुतळ्याजवळ नतमस्तक झाले.'या पुतळ्याच्या जागीच महाराजांचा वाडा होता. किल्ल्याला महाद्वाराखेरीज गजपहाऱ्याचा दिंडी दरवाजा आहे. त्याच्याजवळ रेडका बुरूज, यशवंत बुरूज असे बुरूज आहेत.'

'एवढे बुरूज कशासाठी होते दादा?' बंटीनं प्रश्न केला. 'टेहळणी करण्यासाठी त्यांचा वापर केला जात होता. इथे तोफा ठेवण्यात येत असत. शत्रूवर या तोफांतून दारूगोळ्याचा मारा केला जात असे.' 'मंडळी या किल्ल्याला, शौर्य किल्ला किंवा वीरता किल्लाही म्हटलं जातं. आता आपण मुख्य ठिकाणं पाहिली. या वाटेनं तुम्ही कार पार्किंगकडे जाऊ शकाल!' गाईडदादा म्हणाले. 'धन्यवाद दादा, छान माहिती सांगितली तुम्ही!' बंटी ग्रुप एका सुरात म्हणाला. बंटीच्या आईबाबांनीसुद्धा त्यांचे आभार मानले. 'चला खाली... नाहीतर सूर्यास्तानंतर दरवाजे बंद व्हायचे. हिरकणी बुरूजाची गोष्ट माहीत आहे नं?' बाबांनी विचारलं. सारे जण हसले आणि मार्गस्थ झाले.

## बेटर हाफ


**सोनाली ठेंगडी / ७७५५९३८८२२**


# हसता हुआ नुरानी चेहरा...



एखाद्या व्यक्तीचे नाव घेतल्यावर आपल्या डोळ्यासमोर तिचा चेहरा येतो. जशी आपल्याला ती व्यक्ती भेटते तिच्या स्वभावधर्मानुसार चेहरा लक्षात राहतो. तसा मनोरंजन जगतात एक चेहरा फक्त आणि फक्त हसतानाच दिसतो. तुम्ही फक्त नाव उच्चारा, डोळ्यासमोर येणारा चेहरा हसराच असतो. ती व्यक्ती म्हणजे अभिनेत्री रेणुका शहाणे. हसून तिचे गाल दुखत नाहीत का, असा प्रश्न मला बरेचदा पडतो. मात्र, हसणे किंवा हसरा चेहरा असणे कायमच सुखावह असते, हे नक्की.

रेणुका जितकी हसऱ्या चेहऱ्याने वावरते तितक्याच धीर गंभीरपणे तिचा नवरा वागतो, बोलतो. तो म्हणजे आशुतोष राणा. अनेकांचा आवडता अभिनेता असणारा आशुतोष हिंदी चित्रपटसृष्टीत खलनायक म्हणून लोकप्रिय झाला. मात्र, तो आता चरित्र भूमिकाही उत्तम साकारतो आहे. कारण तो मुळातच एक सर्वोत्तम अभिनेता आणि त्याहूनही उत्तम व्यक्ती आहे. कलाविश्वात लोकप्रियता मिळवण्यासाठी कोणाच्याही वरदहस्ताची गरज नसते हे अनेकजण सिद्ध करून जातात. त्याचप्रमाणे या चित्रपटसृष्टीत अभिनय क्षेत्रात नावलौकिक मिळवण्यासाठी प्रत्येक अभिनेत्याला मुख्य भूमिकेचीच गरज असते असे नाही. कारण, कधीकधी नकारात्मक भूमिकाही एखाद्या कलाकाराला बरीच लोकप्रियता मिळवून देते. अशीच लोकप्रियता मिळविली ती अभिनेता अशुतोष राणाने. 'संघर्ष'सारख्या अत्यंत थरारक चित्रपटातल्या तेवढ्याच भीतीदायक अभिनयामुळे त्याने सर्वांच्याच मनात वेगळीच जागा निर्माण केली. विशेष म्हणजे आशुतोषने घरातील दोन खास व्यक्तींच्या सांगण्यामुळे कलाविश्वात पदार्पण केलं आणि आज लोकप्रिय कलाकारांपैकी एक झाला. मध्यप्रदेशमधील गाडरवाडा येथे जन्मलेला आशुतोष राणा याने आपल्या आजी- आजोबांच्या सांगण्यावरूनच अभिनय क्षेत्रात करिअर करण्याचा निर्णय घेतला होता. गावात होणाऱ्या रामलीलामध्ये तो नेहमीच रावणाची भूमिका साकारायचा. यावेळी त्याची भूमिका पाहून त्याच्या आजी-आजोबांना कायम त्याने अभिनय करावा असं वाटायचं. रामलीलामध्ये रावणाची भूमिका साकारण्यापासून ते अगदी चित्रपटसृष्टीत खलनायकी भूमिकांमध्ये जीव ओतणारा अभिनेता म्हणून आशुतोष ओळखला जातो. दिल्लीच्या 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'मधून त्याने अभिनयाचे रितसर शिक्षण घेतले. त्यानंतर मुंबईत आल्यावर त्याने अभिनेता म्हणून आपली वाटचाल करण्यास सुरुवात केली. 'स्वाभिमान' मालिकेपासून त्याने आपल्या करिअरला सुरुवात केली. आशुतोष राणाला खऱ्या अर्थाने लोकप्रियता मिळाली ती म्हणजे १९९८ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दुश्मन' या चित्रपटामुळे. या चित्रपटासाठी त्याला 'फिल्मफेअर' आणि 'स्क्रीन वीकली'चा सर्वोत्कृष्ट खलनायकचा पुरस्कार मिळाला होता.

### अफाट वाचन असणारा कलावंत

हिंदी सोबतच विविधभाषी चित्रपटांमध्येही त्याने उल्लेखनीय व्यक्तिरेखा साकारल्या आहेत. त्याने आतापर्यंत हिंदीसह तामिळ, तेलुगू, कन्नड,मल्याळम, पंजाबी अशा अनेक भाषांमध्ये काम केलं आहे. अभिनयाचा भक्कम पाया असणाऱ्या आशुतोषला वाचनाचीही फार आवड आहे. विविध प्रकारचे साहित्य वाचण्याकडे त्याचा कल असतो. हिंदी चित्रपटसृष्टीत वाचन करणारा आणि शुद्ध हिंदीत बोलणारा, कविता, दोहे अगदी तोंडपाठ असणारा कलाकार शोधूनही सापडणार नाही. आशुतोषमध्ये हे सर्व गुण आहेत. त्याचे बोलणे, त्याचे हिंदीचे उच्चार, त्याचे कविता म्हणणे, विविध दाखले देत धार्मिक विषयावर बोलणे हे सारेच मोहून टाकणारे आहे. अशा या आशुतोषचा जीव घटस्फोटितेवर जडला.

हंसल मेहता यांच्या एका सिनेमाच्या ट्रायलवेळी आशुतोष राणा राजेश्वरी सचदेवसोबत आले होते. राजेश्वरी आणि रेणुका शहाणे या जुन्या मैत्रिणी आहेत. येथे बऱ्याच दिवसांनी राजेश्वरीशी भेट झाल्याने आशुतोष यांच्याकडे रेणुकाचे लक्षच गेले नव्हते. त्यावेळी राजेश्वरीनेच या दोघांची ओळख करुन दिली होती. त्यावेळी रेणुका यांनी आशुतोषचा 'दुश्मन' सिनेमा पाहिला नव्हता. त्यामुळे त्याला ती ओळखू शकली नाही. या पहिल्या भेटीला तिने मुळीच सिरिअसली घेतले नव्हते. त्या भेटीनंतर दोघे संपर्कात नव्हते. मात्र, १७ ऑक्टोबर १९९८ रोजी आशुतोषने रेणुकाला दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी फोन केला. त्यानंतर त्यांचे वरचेवर फोन सुरू झाले. एरवी इतरांशी फारशा गप्पा न मारणाऱ्या रेणुकाची आशुतोष यांच्याशी वेव्ह लेंथ जुळू लागली. ओळख झाल्यानंतर दोन महिन्यांनी म्हणजे ३१ डिसेंबर १९९८ रोजी या दोघांची भेट झाली.

### गुरुजींनी सांगितले, हीच योग्य मुलगी

आशुतोषचा त्याच्या गुरुंवर खूप विश्वास आहे. त्यांना तो दादाजी म्हणतो. त्यांच्या म्हणण्यावरूनच आशुतोष यांनी अभिनयात करिअरचा विचार केला. याच दादाजींनी ''ही मुलगी तुला तुझ्यासाठी योग्य आहे, असे सांगितले होते. एक दिवस आशुतोषने रेणुकाला लग्नाची मागणी घातली. खूप विचार करून रेणुकाने आशुतोषला होकार दिला.

आशुतोषचे कुटुंब मध्यप्रदेशातील एका छोट्या गावातील आहे. आशुतोषसोबत लग्नाचा निर्णय घेतल्याने रेणुकाचे वडील आनंदी होते. मात्र, तिच्या आईला थोडे दडपण आले होते. त्याचे कारण म्हणजे दोन्ही कुटुंबातील परंपरा, रीतीरिवाज खूप वेगळे आहेत. शिवाय आशुतोषचे कुटुंब बारा जणांचे आहे. मात्र, रेणुकाने त्यांची समजूत घातल्यानंतर त्यासुद्धा या लग्नाला तयार झाल्या. दोन वर्षे रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर २००१ मध्ये दोघांनी लग्नाचा निर्णय घेतला.

### छोट्याशा गावात झाले लग्न

२५ मे २००१ ही दोघांच्या लग्नाची तारीख निश्चित करण्यात आली. लग्न आशुतोषच्या गावी होणार असे ठरले. गावी गेल्यानंतरचा अनुभव खूप विचित्र होता, असे रेणुकाने एका मुलाखतीत सांगितले होते. त्यावेळी झाले असे की, रेणुका आपल्या कुटुंबासोबत जेव्हा स्टेशनवर उतरली तेव्हा तिथे हजार-दीड हजाराचा जमाव होता. एखाद्या पक्षाचा राजकीय मेळावा असावा, असंच काहीसं दृश्य तिथे निर्माण झालं होतं. ज्या हॉटेलमध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती त्या हॉटेलचे उद्घाटनही रेणुकाच्या हस्ते झाले. लाईट नसल्याने अंधारातच रेणुकाला मेकअप करावा लागला. लग्नात इतकी गर्दी होती की, रेणुकाचे नातेवाईक इतकेच नाही तर आई-वडीलसुद्धा मंडपापर्यंत पोहोचूच शकले नाहीत. त्यामुळे रेणुकाच्या नणंदेने तिचे कन्यादान केले. लग्नानंतर रेणुकाला आशुतोष यांच्या कुटुंबाशी ॲडजस्ट करायला बराच वेळ लागला. राणांच्या घरी मोठ्यांसमोर येताना स्त्रीने डोक्यावरून पदर घ्यायची पद्धत आहे. स्वयंपाक करतानासुद्धा तसंच राहावं लागतं. त्यामुळे गावी गेले की त्यांना त्या वातावरणात जुळवून घेणे कठीण व्हायचे. अगदी मुंबईतील त्यांच्या घरी गावातील पाहुणे आले की डोक्यावर पदर हा घ्यावाच लागायचा. आजही सासरे, मोठे दीर घरी असले की रेणुका डोक्यावर पदर घेते.

आशुतोष आणि रेणुका यांच्या लग्नाला आता १९ वर्षे झाली आहेत. ते दोन मुलांचे आईवडील आहेत. शौर्यमन आणि सत्येंद्र ही त्यांच्या दोन्ही मुलांची नावे आहेत. मुलांच्या जन्मानंतर त्यांच्या संगोपनाकडे लक्ष देण्यासाठी रेणुकाने अभिनयापासून काही काळाचा ब्रेक घेतला. मुलांच्या जन्मानंतर पाच वर्षांनी म्हणजे २००८ मध्ये रेणुकाने दिग्दर्शन क्षेत्रात पाऊल ठेवले. दोन दशकांहून अधिक काळाचा त्यांचा संसार आजही सुरळीत सुरू आहे. याचे एकमेव कारण म्हणजे दोघेही एकमेकांवर जितके प्रेम करतात तितकाच एकमेकांचा आदरही करतात. आजही आशुतोष बायकोला 'रेणुकाजी' म्हणतो. संस्कारांचा गाभा दोघांनीही जपला आहे आणि म्हणूनच एकमेकांच्या साथीने संसार रथात बसून सुखकर प्रवास सुरू आहे.

**नजारें तो बहुत है दुनिया में देखने के लिए**
**कोई हमें देखने वाला चाहिए**
**सबक सिखना तो जरूरी है जीने के लिए**
**कोई साथ में जीने वाला चाहिए**
**नाराज होना तो हक है हमारा**
**बस कोई मनाने वाला चाहिए।**

## रानभाज्यांच्या जगात


**संगीता ठलाल/७८२१८१६४८५**


# बहुगुणी भिसी !

तलाव, बोडी, जंगल, शेत किंवा घराभोवतीची मोकळी जागा अशा सर्वच ठिकाणी बहुसंख्येने गुणकारी वनस्पती, फुलं-फळं सापडतात. ही झाडं निसर्गाच्या सान्निध्यात राहून वाढल्यामुळे त्यावर कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी केली जात नाही आणि खतपाणीसुद्धा घातले जात नाही, कोणी त्याची लागवडसुद्धा करत नाही. दिवसेंदिवस बदलती जीवनशैली आणि वाढत्या पाश्चिमात्यीकरणामुळे माणसाचे विचार बदलले आणि या गुणकारी वनस्पतीचा विसर पडला. खाद्यपदार्थही बदलले आहेत, सोबतच अनेक आजारसुद्धा बळावले. अशीच गुणकारी व बहुगुणी वनस्पतीला झाडीबोलीत 'भिसी' किंवा 'भिस्या' म्हणतात. या भिसीची मुळं मोजक्याच ठिकाणी विशेषत: तलावात आणि बोडीत मिळतात.



या बहुगुणी भिसी विषयी थोडक्यात जाणून घेऊ या. भिसी फक्त मार्च, एप्रिल आणि मे महिन्यातच मिळते. कारण, ही मुळं पाण्यात अगदी गुडघाभर खोल जागेत असतात. उन्हाळ्यात जेव्हा तलावाचे किंवा बोडीचे पाणी आटते तेव्हाच या मुळांना खणून काढतात. हे कंद आठवडी बाजारात वीस किंवा तीस रुपयाला पाव या दराने मिळतात. ग्रामीण भागातील लोक या भिसी कंदांना चांगलेच ओळखतात. या कंदांची भाजी सर्व भाज्यांपेक्षा चविष्ट असते. भिसीची पानं हिरवीगार आणि गोलाकार असतात. ही पानं पाण्यावर तरंगतात. खोलवर जामिनीत रुजलेल्या त्याच्या वेलाला लहान-मोठे कंद असतात. त्या कंदांवर काठीसारखी दिसणारी मुळं असतात, त्यालाच भिसी म्हणतात. तर, कोणी भिसीकांदेही म्हणतात. भिसीची मुळं काढण्यासाठी तलावात किंवा बोडीत जावे लागते. अंदाजाने कुदळाने किंवा टिकासने आटलेल्या जागेत खोदतात. भिसीची ही मुळं लांबलचक असतात आणि त्यांचे हातभर लांब असे तुकडे करून पाण्याने धुवून घेतात. त्यांचा रंग पांढरा असतो. त्यांची भाजी बनवताना आधी त्यावरची साल काढून घेतात. भेंडीच्या चकत्या जशा करतो तसे त्या मुळांचे गोलाकार आणि पातळ तुकडे करतात. आतून ते

> **ग्रामीण भागातील लोक या भिसी कंदांना चांगलेच ओळखतात. या कंदांची भाजी सर्व भाज्यांपेक्षा चविष्ट असते. भिसीची पानं हिरवीगार आणि गोलाकार असतात. ही पानं पाण्यावर तरंगतात. खोलवर जामिनीत रुजलेल्या त्याच्या वेलाला लहान-मोठे कंद असतात.**

मूळ भेंडीसारखं पोकळ असतात. भिसी हलकेसे कडक असल्याने पंधरा मिनिटे तेलात परतवून थोडे नरमल्यावर, पातेल्यात थोडे तेल घालून बारीक कांदे आणि जिरं-मोहरीची कडक फोडणी देतात. त्यात चार हिरव्या मिरच्या, आलं-लसणाचा ठेचा घालून, छान परतून घेतात. मग, थोडा गरम मसाला, तिखट, हळद, मीठ, एक बारीक चिरलेला टोमॅटो व थोडं पाणी घालून छान दणदणीत वाफ काढून घ्या. नंतर त्यात हे भिसीचे तुकडे त्या मिश्रणात घालून घेतले जाते. भिसी भाजीचा सुगंध दरवळतो आणि त्यामुळे तोंडाला पाणी सुटते. भात किंवा चपातीसोबत ही भाजी आवडीने खाल्ली जाते. हे भिसीमुळं, भिसीकांदे पाण्यातील असल्यामुळे शरीरात थंडावा निर्माण करतात. त्याच्यात अनेक जीवनसत्व असल्याने आरोग्यासाठी लाभदायक ठरते. निसर्गाची विशेष देणगी असलेले हे भिसीकांदे इतर वनस्पतीपेक्षा वेगळी आहे.

# शिक्षित म्हणजेच सुशिक्षित?

'शिक्षण' या शब्दाची खोली जितकं जावं तितकं अधिकाधिक खोल घेऊन जाणारी. शिक्षण हा तीन अक्षरी शब्द आपल्या जीवनप्रणालीचा महाभाग! दिवसभरात या शब्दाची कितीतरी आवर्तनं होतात. कलियुगात म्हणावं की काय, पण शिक्षणाची खोली उथळ झाली. शिक्षणाने नव्हे उच्चशिक्षणाने सारं जग मुठीत आल्यासारखं वाटलं. हे वाटत असताना खूप काही हातून निसटत चाललंय. ज्ञान, कौशल्य, मूल्य, विश्वास, ऊर्जा, शिस्त, चारित्र्य, आत्मविश्वासाची पातळी, अर्थार्जन, सुधारित जीवनशैली आणि राष्ट?ीयत्व या सगळ्या शब्दांना अस्तित्व देणारा शब्द म्हणजे शिक्षण!

शिक्षणातून सर्वांगिण विकास हा मूलभूत अर्थ आम्ही चुरगाळून टाकला. वयाच्या तिसऱ्या वर्षांपासूनच या उच्चशिक्षणाचा श्रीगणेशा होतो. ब्रॅण्डेड शिक्षण, लाखोंचं डोनेशन, ट्युशन क्लासेस, छंदवर्ग, उन्हाळी शिबिरं हे सगळं करून, मार्कलिस्ट वजा कागदावर ९५% च्या पुढचा आकडा दिसला की, शिक्षणाचं फलित झालं. पहिला नंबर आला तर यश, नाहीतर अपयश! हेच पालक स्वतःसहित पाल्यांच्याही मनावर बिंबवतात. वारंवार यशापयशाची जाणीव त्याला करून देतात.

शिक्षण कशासाठी? मार्कांसाठी! मार्क्स कशासाठी? नोकरीसाठी! नोकरी कशासाठी? पैशासाठी! शिक्षणाचं फायनल आऊटपुट म्हणजे भरभक्कम नोटा! त्या जर अपेक्षित प्रमाणात मिळाल्या नाहीत तर मग हत्या, आत्महत्या, मायबापाची हत्या,




**वेदश्री देशपांडे-मोहरील/९८२२२११३३५**


शिक्षकाची हत्या... एकूण शिक्षणाचीच हत्या! शिक्षण=पैसा या बिनडोक समीकरणाने तीन अक्षरी शब्दातले सगळे अर्थ बेचिराख केलेत. प्रत्येक पालकाचं अंतिम ध्येय एकच! पाल्याचं उच्चशिक्षण! त्यासाठी कर्ज घेणं, शेती विकणं, सोनं गहाण टाकणं, स्वतःचं जीवन संपवणं हे सगळं अनिवार्यच!

शिक्षणातून बाहेर पडलं की, नोकरी मिळते आणि पैसा हातात येतो. पक्षी पिंजऱ्यातून उडालेला असतोच. मित्र-मैत्रीण, फ्रेशर्स पार्टी, अंगप्रदर्शन करणारे कपडे घालण्याची सक्ती अर्थात तरच पार्टीला परवानगी, हॉट ड्रींक्स, सिगारेटचे झुरके, बॉयफ्रेंडसोबत हिडीस प्रदर्शन, उन्माद वाढवणारे सेल्फी, वीकेण्डला बाटल्यांचा खच! हे आहेत आजच्या शिक्षणाचे मानदंड आणि मूल्य! मोबाईल व्यसनात बुडालेल्यांनी हे सगळं प्रदर्शन मांडलं की, त्यातून मिळणारी नशा काही औरच!

आपल्याला जे मिळालं नाही ते सगळं मुलांना मिळावं हा उच्चशिक्षित विचार पालकांचा असतो. मुलांचे असे फोटो सोशल मिडीयावर शेअर करताना त्यांचाही चेहरा उजळून निघतो. कालानुरूप बदललंच पाहिजे या अविर्भावात सगळ्या मर्यादांचं सीमोल्लंघन केलेलं असतं. मुलांची क्षमता, आर्थिक क्षमता, छंद, आवडी याला ओळखून साधारण शाळेत प्रवेश घेतला, अभियांत्रिकी, मेडीकलला कुठलाही आटापिटा न करता, दुसरं क्षेत्र निवडलं तर मुलांच्या भविष्याची चिंता नसलेले कंजूस आणि बेजबाबदार पालक म्हणजे अशिक्षितपणाचं लक्षण ठरतं. मुलींनी अंगभर कपडे घालणं, त्यांना बॉयफ्रेंड नसणं, पार्टीमध्ये सहभागी न होणं आजच्या शिक्षणाच्या नॉर्म्समध्ये बसल्या नाहीत तर आजीबाई-काकूबाई ठरवून एकाकी पाडतात. या सो कॉल्ड् शिक्षणाने आपण घडतोय की बिघडतोय?

पूर्वी विवाह वधुवरांचे व्हायचे. दोन विचार, दोन कुटुंब जोडल्या जायची. या उच्चशिक्षित जगात विवाह नाही तर वेडींग्ज होतात तेही प्रोफेशनल इव्हेंट्स! लग्न जमवताना पॅकेज नावाचा ग्रह सगळ्यात मोठा! प्रोफेशन आणि पॅकेजच्या कुंडलीचे गुण जुळवताना वयाने तिशी-पस्तीशीचा आकडा पार केलेला असतो. शिक्षण घेतलेल्या मुलींचे ताराबळ चंद्रबळ बलवान झालेत. स्वातंत्र्याचे सगळे उंबरठे पार करून, स्वैराचाराच्या घरात प्रवेश मिळवलेला असतो. मुलगा नागपूरसारख्या ग्रामीण भागातला नकोच. पुणे, मुंबई, बंगळुरू, हैदराबाद इथेच नोकरी करणारा असावा. परदेशात असल्यास विशेष प्राधान्य! मुलींचे शिक्षित आई-वडील वाटेल तेव्हा येतील. फोनवरून मुलीच्या अटी मान्य होताहेत की नाही, याचा आढावा घेतील. त्यात चुकून काही कमी-जास्त असेल तर रोज तिला धडे शिकवतील. हा प्रोटोकॉल पुढे गेला तरच गाडी पुढे सरकते.

विवाहाला एक संस्कार समजून त्याच्या रितीभाती पाळणं म्हणजे बुरसटलेले विचार! ढोल-ताशा, डीजे-बँड या सगळ्यांवर वाटेल तेव्हा वाटेल तसा डान्स, गाणी, पार्लर, मेकअप, फोटो हे सर्वात मोठे विधी यथासांग पार पडले की, लग्न पूर्ण झाल्याचं समाधान मिळतं. संसार नावाच्या पुस्तकी शब्दाला सुरुवात होते. लग्नाआधीचे तासन्तास होणारे संवाद अचानक मुके होतात. सकाळी ६ ते रात्री ९ वाजेपर्यंत पॅकेज मिळवण्यासाठी द्यावा लागणारा वेळ, मग करोडोंचा फ्लॅट, आलिशान फर्निचर, महागडी चारचाकी असं सगळं झालं की, शिक्षणातून अर्थार्जन हे मूल्य विकसित झाल्याची भावना येते. हे मिळवताना कुटुंब, सण समारंभ, नातेवाईक, समाज वजा झालेले असतात.


भौतिक सुखसोयीच्या संसारात आम्ही बिझी! वेल सेटल्ड् झाल्याशिवाय अपत्याचा विचारही नको. हे होताना कुटुंबसंस्था विस्कळीत झालेल्या असतात. अशा लोकांसाठी लग्न हे भातुकलीचा खेळ! आज लग्न उद्या घटस्फोट, आदल्या रात्री लग्न मोडणं, दुसऱ्या दिवशी तिसऱ्याशी अफेअर असे खेळ सहज खेळले जातात. प्रेमप्रकरणाचा असाही एक अविष्कार? शिक्षणाचा असाही दुरुपयोग होऊ शकतो?

मी आणि माझं या सर्वनामशिवाय एकाही वाक्याची पूर्तता होत नसते. आत्मस्तुती इतकी ऐकवतात की, त्या स्तुतीलासुद्धा कंटाळा येईल. दुसऱ्याचं ओठापर्यंत आलेलं कौतुक बाहेर पडू न देण्याचा हे लोक कसोशीने प्रयत्न करतात. आता फक्त एकतर्फी बोलणंच उरलं. अहंकाराला जन्म घालणाऱ्यांचं ज्ञानही विष व्हायला लागतं. उच्चशिक्षित लोक बुद्धीने व्यवहाराची गणितं सोडवतात. भावनांची गणितं सोडवायला संवेदनशील मन त्यांच्याजवळ नसतं. अशिक्षित, अडाणी समजल्या जाणाऱ्या लोकांमध्येच ते सापडण्याची शाश्वती असते. आम्ही आधुनिक अंगठेबहाद्दर झालो आहोत का?

## आठवणींच्या पारावर


**मो. बा. देशपांडे/८३२९१९३५४२**


# मराठी घरात 'मराठी' का नाही?



त्या दिवशी आमचे स्नेही मधुकरराव त्यांच्या चार वर्षांचा गोड नातू प्रयांशला घेऊन आले. मधुकररावांचे मुलगा-सून काही वर्षे न्यूयॉर्कला असताना, तिथे प्रयांशचा जन्म झाला होता. मी त्याचा गालगुच्चा घेत विचारलं,'नाव काय बाळ तुझं?'

पण, तो आजोबांकडे बघत होता. धड इंग्रजी नाही, धड मराठी नाही अशी त्याची अवस्था बघून मी विचारलं,'अरे...हा कोणत्या भाषेत बोलतो?' 'ते सगळं मिक्स आहे!' आजोबा कौतुकमिश्रित नजरेने म्हणाले. 'असं म्हणून कसं चालायचं रे बाबा! घर मराठी पण, घरात मराठी नाही, अशी स्थिती का? जन्मापासून राहणे मराठी मुलुखात, घर महाराष्ट्रात मग, घरात मराठीचे वावडे का? मराठी मुलगा जर मराठीत बोलू शकत नाही, यात चूक कुणाची ? इंग्रजी माध्यमाचा आग्रह का? यावर सर्वात मोठा युक्तिवाद म्हणजे काही फॅकल्टीत पुढील उच्च शिक्षण हे मराठी भाषेत उपलब्ध नाही, हा होय.

जन्मानंतर कानावर पडणारी भाषा आणि अनुवांशिक तत्वाने येणारी भाषा यात महदंतर आहे. भावभावना, उच्चार आणि विचारांना आकार आणि वळण मिळते ते मातृभाषेतूनच! शिक्षणाचा श्रीगणेशा झाल्यावर माध्यमिक शिक्षणात तो दुसरी भाषा शिकू शकतो. उच्च शिक्षणात गरजेनुरूप इतर फ्रेंच, जर्मन इत्यादी भाषा शिकून तो बहुभाषिक होण्यात काही अडचण नाही. पण, सुरुवात जी भाषा जेनेटिक्समधून आली त्या भाषेत होणेच उचित आहे. आपल्याला वाटते मुले लहान आहेत पण, ती परिपूर्ण असतात. ते अजून बोलू लागले नसले तरी विचार करण्याच्या प्रक्रियेत असतात. त्यांचे निर्णय ते आपल्या परीने घेत असतात. फक्त मोठ्यांनी स्वतःच्या परिभाषेतील नियम बालकांवर लादल्याने त्यांची मानसिक, भावनिक आणि बौद्धिक कुचंबणा होऊ शकते, हे सत्य नाकारून चालणार नाही. यावर, प्रगत राष्ट्रात विचार होईल आणि मग उशिरा आम्ही त्याचे अनुकरण करणार काय? आता मुलांच्या इयत्ता दुसरीपर्यंत परीक्षा नको, रँकींग नको, त्यांना मैदानात खेळू द्या, दप्तराचे ओझे मर्यादित असावे इत्यादी बाबींवर स्वतंत्र विचार आपल्याही शिक्षण संस्था करू शकतातच की!

खाजगी शाळा आपल्या शाळेचे गुणांकन वर ठेवण्यासाठी मुलांच्या कोमल मेंदूवर माहितीचा भडीमार करून दडपण आणत आहेत, हे कोण बघेल? त्या शाळा कोणते सिलॅबस आखतात, ते लहानग्यांसाठी कितपत सहनीय आहे? याची पडताळणी करणारी एखादी सक्षम संस्था अस्तित्वात आहे का? सवंगडी हवेत, मातीत खेळणे बागडणे हवे, मुलांना उगाच संघर्षात लोटू नये, स्कूल बस पकडायची आहे, ट्युशनला जायचंय, ड्रेस-युनिफॉर्म कोड पाळायचा आहे, अमुक होमवर्क झालंच पाहिजे, इतके टक्के मिळायलाच हवेत, फक्त इंग्रजीतूनच बोलायचे आहे, अशा सक्तींना शरण जाऊन आया आणि बापडे मुलांना त्यांना जमेल तसे स्वतःच्या तुटपुंज्या इंग्रजीतून बोलत स्वतःचे हसे करून घेतात. पाल्याची मानसिक प्रक्रियेत काही बाधा निर्माण होऊन, व्यक्तिमत्त्व सदोष होऊ शकते. हे दुभंगलेलं व्यक्तिमत्व नंतर विचित्र मानसिक त्रासांना बळी पडू शकतं. याचा दूरगामी विचार प्राधान्याने होणे गरजेचे नाही का?

एकुलता एक बिचारा लहान मुलगा! त्याने दोन वर्षांच्या आत एबीसीडी, पाढे पाठ केले पाहिजेत. तुमच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर अपेक्षेप्रमाणे दिलेच पाहिजे. त्याला अनेक भाषेतील समानार्थी शब्दांची जाण असलीच पाहिजे, हा अट्टाहास का? अवांतर वाचन, कलागुण शिकणे आणि सर्वात म्हणजे सर्व सुविधा हातातोंडाशी पुरवून त्याला आपण मानसिक अपंगत्व तर आणत नाही ना, याचाही विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. लहान मुलांचे रक्षण आणि निकोप संगोपन ही जर मोठ्यांची जबाबदारी आहे तर, या मानसशास्त्रीय कारणाकडे डोळेझाक का होतेय? साधा प्रश्न आहे की, मराठी घरात मराठी का नाही?

पूर्वी सहाव्या वर्षी शाळेत पहिल्या इयत्तेत प्रवेश होत असे. आता केजी वन, केजी टू ही दोन वर्षे यामुळे बालक चार वर्षांचा असतानाच शाळेची पायरी चढू लागला. त्यात नर्सरी, प्री नर्सरी हे सर्व कमावत्या पालकांच्या सोयीसाठी शिक्षण संस्थांनी केलेल्या फायदेशीर योजना आहेत. पण यात लहानग्यांची गळचेपी तर होत नाहीये ना? याचा विचार कोण करील? हे भयावह आहे. कळतं सगळ्यांना आहे पण, वळत नाही. याचा विचार आता झाला नाही तर आपण चुकीच्या वाटेने जातोय, हे लक्षात येईपर्यंत बराच उशीर झाला असेल.

जगात अनेक भाषा अस्तित्वात असून, दोन भाषांतील फरक लक्षात यायच्या आधीच आपण मुलांना दोन भाषा शिकवू लागतो. जो अभ्यासक्रम पूर्वी इयत्ता पाचवीत होता, तो आता दुसऱ्या वर्गात आहे. बदलते बालमानस हे मोठे आव्हान आहे. मुलांचे लक्ष त्वरित वेधायचे असेल तर, पालकांनी मुलांच्या पातळीवर यावे लागते. त्यासाठी, पालक निवांत आहेत असे त्याला जाणवले तरच बाळ त्याच्या पद्धतीने तुमच्याशी बोलू लागेल. आमच्या ओळखीचा एक तामिळ बालक! वडिलांची नोकरी मराठी मुलखात असल्यामुळे सवंगडी मराठी बोलणारे, घरी तामिळ, शाळेत इंग्रजी माध्यम! त्याला ज्या भाषेतून विचारणा होते, त्या भाषेत तो उत्तर देतो, असं त्याचे पालक खूप अभिमानाने सांगतात. पण, त्याच्या मेंदूतील शब्दसंग्रह किती गुंतागुंतीचा झाला असेल? याचा विचार हे सुज्ञ आणि सुशिक्षित पालक करू शकतील का? उच्च शिक्षण मराठी माध्यमात जोपर्यंत मिळणार नाही तोवर कॉन्व्हेंटला पर्याय नाही.

जगातील विविध भाषांबाबत बाळ अनभिज्ञ असतो. पण, जेनेटिकली बीजस्वरुपात अनेक गुण सोबत घेऊन आलेले असते. याअर्थी मातृभाषेशी त्याची ओळख असते. त्यातूनच संभाषणाला प्रारंभ झाला तर ती ओळख दृढ होऊन बालक आत्मविश्वासाने शब्दवैभव आणि वाक्यरचना करू लागतो. अर्थात ही नैसर्गिक क्रिया असून यासाठी विशेष काहीच प्रयत्न करण्याची गरज नसतेच मुळी !

इंग्रजी भाषा शिकल्याने पुढे जगात वावरणे सुलभ होईल या अज्ञानमूलक जाणीवेने ते प्रयत्नपूर्वक इंग्रजी शिकण्यावरच भर देतात. पण, येथेच त्याच्याजवळील बीजभाषेशी त्याचे शब्द जुळत नाहीत. एकाच अर्थाचे विविध भाषांतील शब्द त्याच्यावर लादण्याच्या प्रयत्नात बालक गोंधळात पडतो. सर्वात भयंकर म्हणजे हे तो बोलून स्पष्ट करू शकत नाही. परिणामी धड इंग्रजी येत नाही आणि धड मातृभाषा तो बोलू शकत नाही. हिंदी बोलता येते पण, लिहिता येत नाही. वैद्यकीय अभ्यासकांच्या मते, बाळ सहा वर्षांचा झाल्यावर बोटांनी लेखणी घट्ट धरू शकतो. म्हणून पूर्वसुरींनी शाळेत घालण्याचे वय ६ वर्षे ठरवले. बालमानसशास्त्रानुसार जन्मानंतर कानावर पडणारी भाषा हे अनुवंशिक तत्त्वाने येणारी असल्याने विशेष वेगवान ठरते. इथेच भावना आणि विचारांना आकार आणि वळण मिळतं.

विकासाच्या प्रक्रियेतून बालक जाताना भाषा हे एक प्रमुख माध्यम असते आणि मातृभाषा तिथे नैसर्गिकपणे आणि सहज काम करून जाते. उदा. देवनागरी लिपीतील परभाषीय वाचन आपण करू शकतो पण, स्वभाषेइतके ते प्रभावी होऊ शकत नाही. जी भाषा बाळाची आई, आजी, पणजी, खापर पणजी बोलत होती तीच भाषा सहज-सुलभ असते अन्यथा 'भाषिक कोंडी' या भयंकर प्रकाराला सामोरे जावे लागेल. परभाषा शिकणे किंवा बहुभाषिक होणे यात गैर काही नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर इतकी वर्षे उलटूनही अजून इंग्रजीच्या कुबड्या आपण सोडत नसू तर ते परावलंबी पराभूत मानसिकतेचे प्रवाह पतिताचे लक्षण आहे. शिक्षणासाठी मूल पहिले पाऊल टाकते तेव्हा समाजाशी त्या विणीचा टाका मातृभाषा घालत असते. चला एक दिलाने मायमराठीला पुनर्वैभव प्राप्त करून देवू या.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत जाहीर होताच
# अनेकांना लागले गावचा कारभारी होण्याचे डोहाळे

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि.२६ एप्रिल-**

नायगांव तालुक्यातील एकूण ८० ग्रामपंचायती असुन्. येणाऱ्या काही कार्यकाळामध्ये ऐंशी गावाच्या कारभार्याचा कार्य. काळ संपुष्टात येत असून.पुढील ई. स.२०२५ ते २०३० या कालावधीसाठी बिलोलीतील उप विभागीय अधिकारी क्रांती डोंबेच्या उपस्थिती मध्ये तालूका दंडाधिकारी धम्मप्रिया गायकवाड यांनी शुक्रवारी तालुक्यातील सर्व कारभाऱ्याचे जात निहाय आरक्षणाची सोडत जाहीर केली.



जिल्ह्यातील एकुण तालुक्या पैकी सर्वात ज्यास्त भुक्षेत्रफळाने व गावांची संख्या आसलेल्या व ऐंशी ग्रामपंचायतीचा नायगांव तालुका असुन या सर्व गांव कारभाऱ्याचा कालावधी जवळ जवळ संपुष्टात येत असुन. त्या अनुषंगाने मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९६४ चे नियम २ (अ)(२) अन्वये ई. स. २०२५- २०३० मध्ये होणा-या तालुक्यातील ऐंशी ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका लक्षात घेवून दि.२५/०४/२०२५ रोज शुक्रवारी येथील तहसील कार्यालयाच्या प्रांगणात बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी तथा नियंत्रण अधिकारी क्रांती डोंबे व नायब तहसीलदार सतिश कुलकर्णी यांच्या उपस्थितीमध्ये तहसीलदार तथा प्राधिकृत अधिकारी धम्मप्रिया गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील ऐंशी ग्रामपंचायतीचे गांव कारभाऱ्याचे जात निहाय आरक्षण सोडतीची प्रक्रिया ही शांततेच्या वातावरणामध्ये पार पडली आहे.

या वेळी अनुसूचित जाती पुरुषासाठी तलबीड, राजगड नगर, कोठाळा, पिंपळगाव, मुस्तपूर, गोदमगांव, सोमठाणा, खंडगांव, अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी मुगांव/मुगांवतांडा, कहाळा बु., वजांरवाडी, चारवाडी, टाकळी त.ब., धुप्पा, मरवाळी तांडा, खैरगांव, निळे गव्हाण, अनुसुचित जमातीतील(पुरुष) मरवाळी, कोपरा, रातोळी, अनुसूचित जमाती महिलांसाठी, होटाळा, रुई खुर्द, तर ना.मा.प्र परडवाडी, कुंटुंर, टाकळी बु, ईकळीमाळ, केदार वडगांव, सावरखेड, इज्जतगांव बु, औराळा, मनुर त.ब, ना.मा.प्र. महिला सातेगांव, धनंज, ईकळीमोर, शेळगांव छत्री, हिप्परगा जाने,पळसगांव ,टाकळगांव, सुजलेगांव, बरबडा, राहेर, नरसी, खुला प्रवर्गासाठी टाकळी त.मा.धानोरा त मा.,घुंगराळा,कहाळा खुर्द, सालेगांव कु, कांडाळा,मोकासदरा,कोकलेगांव, कोलंबी, गडगा, पाटोदा त. ब.,मांजरम, कृष्णूर, कार्ला त.मा., माहेगाव, हंगरगा,लालवंडी,तकबीड,बेट कबिलोली, सांगवी,डोंगरगाव, खुला प्रवर्ग महिलांसाठी, हुस्सा,नरंगल,मांडणी नावंदी, वजीरगाव, रानसुगांव, अंचोली, अंतरगाव, बेंद्री, टेंभुर्णी, कुंचेली, गोळेगाव, आलुवडगांव, नायगांव वाडी, शेळगांव गौरी, रुई बु,देगाव, मेळगांव, भोपाळा, बळेगांव, दरेगाव ई.जाती निहाय नायगांव तालुक्यातील ऐंशी ग्रामपंचायतीचे आरक्षण सोडत जाहीर झाले असुन यावेळी अनेक पुढाऱ्यांनी गांवचा कारभारी होण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून होते. परंतु शुक्रवारी जाहीर झालेल्या आरक्षण सोडतीमुळे अनेकांचा हिरमोड झाला. तर भारतीय संविधानाच्या चौकटीत राहून काल जाहीर झालेल्या या आरक्षण सोडतीमुळे समाजातील मागास प्रवर्गातील पुरुष व महिला प्रवर्गाला गावचा कारभारी होऊन गांवचा विकास करण्याची एक सुवर्णसंधी मिळाली आहे या आरक्षण सोडतीच्या प्रक्रियेवेळी मदतीला कार्यालयातील साईनाथ भंडारे, राजेश्वर आलमवाड, अशोक भालेराव, दिगांबर गिरी आदि कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने उद्या हदगाव बंद

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि.२६ एप्रिल-**

पहलगाम येथे घडलेल्या अमानवीय हल्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने दिनांक २८ एप्रिल ( सोमवारी ) रोजी हदगाव शहरासह पूर्ण तालुका बंदची हाक देण्यात आली असून सदरील बंदला व्यापारी संघटना सहभागी होत असल्याचे सुद्धा कळविण्यात आले. सदर बंदचे निवेदन प्रशासनास देण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. यावेळी भाजपाचे जिल्हाउपाध्यक्ष सुरेश सारडा, भाजपा तालुकाध्यक्ष बाला पाटील, तालुका सरचिटणीस उमाकांत भोरे ,रूपादेवी पाटील, चंद्रकांत पवार,किशन कांबळे, विलास महाजन यांचे सदरील निवेदनावर स्वाक्षरी आहेत.

पहलगाम येथे झालेल्या भ्याड आतंकवादी हल्ल्याने संपूर्ण देश हादरला आहे. या हल्ल्यात निष्पाप नागरी ,पर्यटक यांनी आपले जीव गमावले आहेत .या घटनेचा निषेध म्हणून सर्व नागरिक ,व्यापारी, सामाजिक संघटना, राजकीय पक्ष या दहशतवादी हल्ल्याच्या विरोधात एकजुटीने आवाज उठवण्यासाठी आणि या हल्ल्यात मृत झालेले नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी हदगाव शहर व तालुका सकल हिंदू समाज यांच्या वतीने बंदचे आव्हान देण्यात आले असून हे बंद शांतता पूर्ण होणार आहे. तरी सर्व दुकाने, बाजार ,खाजगी कार्यालय, शैक्षणिक संस्था या दिवशी बंद राहतील तर यातून अत्यावश्यक सेवांना वगळण्यात आल्याचे सुद्धा कळविण्यात आले.



## माध्यमिक आश्रमशाळा वाघाळाची मान्यता रद्द

**नांदेड, दि.२६ एप्रिल-**

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविण्यात येत असलेल्या माताजी शिक्षण संस्था नांदेड वाघाळा संचलित माध्यमिक आश्रमशाळा वाघाळा ता. जि. नांदेड या आश्रमशाळेची मान्यता २१ एप्रिल २०२५ रोजी रद्य करण्यात आली आहे. याबाबत संचालक इतर मागास बहुजन कल्याण पुणे यांनी पत्र निर्गमित केले आहे. या आश्रमशाळेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नये. असे आवाहन करण्यात आले आहे.

# विद्यापीठाच्या गोंधळामुळे परीक्षार्थीही गोंधळात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.२६ एप्रिल-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने प्रश्नपत्रिका तसेच परीक्षेच्या वेळापत्रकात गोंधळ घातल्याने शुक्रवारी परीक्षार्थींचा चांगलाच गोंधळ उडाला. वेळापत्रकावर तीन तासाचा वेळ आणि प्रश्नपत्रिका वरही तीन तासाचा वेळ परंतु परीक्षा केंद्रावर मात्र दोन तासातच पेपर घेण्यात आल्याने विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त करत विद्यापीठाच्या गोंधळी कारभाराची चौकशी करावी अशी मागणी करत या प्रकारास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित केला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध केंद्रावर सुरू असून याच दरम्यान पत्रकारिता पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शुक्रवारी पब्लिकेशन एथिक्स हा पेपर दोन ते पाच या वेळेत घेण्यात येणार असल्याचे वेळापत्रकावर नमुद करण्यात आले होते. तर प्रश्नपत्रिकेच्या उजव्या बाजूस तीन तास आणि डाव्या बाजूस दोन तास असे छपाई करण्यात आल्याने परीक्षार्थी गोंधळात पडले. परंतु वेळापत्रकावर तीन तास असल्याने परीक्षार्थी निश्चितपणे पेपर सोडवत असतानाच दोन तास झाल्यानंतर परीक्षा केंद्रावरील प्रमुखांनी दोन तासातच पेपर परत घेतल्याने परीक्षार्थ्यांनी मात्र संताप व्यक्त केला. त्यातच पेपर ४० गुणांचा दाखवुन त्यात देखील ४५ गुण असल्याचे नमुद केल्याने परीक्षार्थ्यांचा चांगलाच गोंधळ उडाला. या सर्व प्रकाराची चौकशी करावी तसेच हा गोंधळ घालणाऱ्या परीक्षा विभागातील संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे परीक्षार्थ्यांनी विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रकांकडे केली आहे.

या निवेदनावर रंजना बहादुरे, बुद्धमाला हिंगोले, अनिल वगर, दिलसुखराज बहादुरे, आशिष थोरात, सिद्धांत वाघमारे, आदीत्य कुंठें, शितल धुताडे, प्रतिक्षा चवणे, वर्षा भुताळे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### विझडमच्या शिरपेचात आणखी दोन मौल्यवान मुकूट मणी

**धर्माबाद** -तालुक्यातील प्रसिद्ध आणि उपक्रमशील शाळा 'विझडम डिजी कॉन्सेप्ट स्कूल आणि ज्युनियर कॉलेज', या शाळेला उत्कृष्ट शाळा पुरस्कार आणि याच शाळेचे कृतीशील प्राचार्य औसाजी चंद्रभान जाधव यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. हे दोन्ही पुरस्कार 'महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टी असोसिएशन' अर्थात MEST या प्रतिष्ठित व अधिकृत संघटनेमार्फत राज्यस्तरीय अधिवेशनात, ठाणे (मुंबई) येथे प्रदान करण्यात आले आहेत. अनेक बाबींचे मूल्यमापन करून या सगळ्या निकषांस पात्र ठरलेल्या विझडम शाळेला 'उत्कृष्ट शाळा पुरस्कार' आणि या शाळेच्या प्राचार्यांना 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' MEST चे व्यवस्थापकीय अध्यक्ष डॉ.संजयराव तायेडे पाटील, तसेच चएडढ चे राज्यस्तरीय पदाधिकारी यांच्या हस्ते प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या शाळेचे प्रतिभासंपन्न प्राचार्य औसाजी चंद्रभान जाधव यांनी मोठ्या विनम्रतेने या दोन्ही पुरस्कारांचे श्रेय त्यांच्या शाळेतील समर्पित भावनेने काम करणाऱ्या पात्र शिक्षकांना दिले आहे. अशा पुरस्कारांची नवीन परंपराच या शाळेने निर्माण केल्याचे पाहायला मिळते आहे, कारण मागील शैक्षणिक वर्षात दिनांक १९ एप्रिल, २०२४ रोजी 'असोसिएशन ऑफ इंग्लिश मिडीयम स्कूल' EMS या संघटनेतर्फे 'विद्यारत्न-२०२४ पुरस्कार' या पुरस्काराने शाळेच्या प्राचार्यांना सन्मानित केले आहे. यासोबतच यंदाच्या वर्षी 'शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य' यांच्या तर्फे घेण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा' या राज्यस्तरीय स्पर्धेत तालुका प्रथम पुरस्कार प्राप्त झाले आहे. आणि आता 'उत्कृष्ट शाळा पुरस्कार' तसेच 'उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार' याही पुरस्कारांची मानकरी विझडम शाळा ठरली आहे.

### डॉ. प्रसाद केंद्रेकर यांनी स्वीकारला पदभार

**कंधार** -डॉ. प्रसाद केंद्रेकर यांची कंधारच्या तालुका आरोग्य अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांनी शुक्रवारी,



२५ एप्रिल रोजी काळी ११ वाजता कंधारच्या तालुका आरोग्य अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. डॉ.प्रसाद केंद्रेकर हे एमबीबीएस एमडी अर्थो असून यापूर्वी पाथरी येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्य केले व डब्ल्यूएचओ मध्ये क्षयरोग समुपदेशक म्हणून काम केले आहे. डॉ प्रसाद केंद्रेकर यांचा बारुळ चे वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश दुलेवाड यांनी शाल हार नारळ देऊन स्वागत केले तसेच तालुका आरोग्य आधिकरी कार्यालयातील आरोग्य सहाय्यक व्यंकटी शेळके , तालुका समूह संघटक सुशील आलेगावकर ,लेखापाल राम प्रेमलवाड यांनी शाल पुष्पहार घालून स्वागत केले यावेळी कृष्टरोग तत्रंज्ञ एकनाथ पठाडे, आरोग्य सहायाक बालाजी कल्हाळे, बीएनओ. जी .एस.मलवाडे, आरोग्य सहाय्यिका ए.एस.इंगोले, लसीकरण नियंत्रक बालाजी काकडे , क्षयरोग सुपरवायझर सचिन मुंडे, प्रयोगशाळा सहाय्यक पोले ,आरोग्य सेविका मुसळे, सेविका बी. एम.कंठेवाड , प्रयोगशाळा त्रतज्ञ आशिष कुरुडे , आरोग्य सेवक अविनाश भांड अधिक कर्मचारी उपस्थित होते.

### सोनखेड आता सीसीटीव्हीच्या नजरेत

**सोनखेड** -सोनखेड गावामध्ये पोलीस ठाण्याच्या वतीने एकंदरीत वीस सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले आहेत. गावातील घडलेल्या



छोट्या-मोठ्या चोऱ्या व त्याचा न लागलेल्या तपास यामुळे त्यावर उपाययोजना राबविण्यासाठी सोनखेड पोलिसांच्या वतीने मध्यवर्ती बस स्थानक,बाजार मैदान,शेवडी रोड दगडगाव रोड,मंदिर,मशिदीकडे,बौद्ध विहाराकडे जाणारे गावातील प्रमुख रस्ते यासह अन्य ठिकाणी एकंदरीत २० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले आहेत त्यामुळे निश्चितच गुन्हेगारावर वचक राहणार आहे हे कॅमेरे चार मेगाफीक्सलचे असून ते पूर्णतः स्वयंचलित आहेत तर यामध्ये ऑडिओ रेकॉर्डिंग सुद्धा स्टोरेज केली जाणार आहे आणि याचा डीव्हीआर व स्क्रीन हे सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पांडुरंग माने यांच्या कक्षामध्ये बसविण्यात आले आहे. यामुळे सोनखेडच्या प्रत्येक रस्त्यावर, मंदिर, मज्जीद, बुद्धविहार व गावात येणारे जाणाऱ्या रस्त्यावर सोनखेड पोलीसांची करडी नजर असणार आहे

# थायलंडमध्येही महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचा आगाज

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.२६ एप्रिल-**

येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरु संघनायक भदंत पंयाबोधी थेरो यांनी थायलंड येथील जागतिक संघदानम कार्यक्रमात बिहार राज्यातील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचा आगाज केला. भिक्खू संघाचे भारतातील देशव्यापी सुरू असलेले आंदोलन आणि जगातील तमाम बौद्ध राष्ट्र तथा भिक्खू संघाने घ्यावयाचा पुढाकार याबाबत जागतिक परिषदेत भदंत पंयाबोधी थेरो यांनी थायलंड येथे जमलेल्या हजारो भिक्खू संघास या मुक्ती आंदोलनाची माहिती दिली.

बोधगया येथील ब्राह्मणाच्या ताब्यात असलेले महाबोधी विहार हे मुक्त करून ते बौध्दांच्या ताब्यात द्या अशी मागणी पुढे येत आहे. बिहार राज्यातील पाटना बोधगया येथील महाबोधी विहारात गेले अनेक वर्ष झाले ब्राह्मण व्यवस्थापन आहे. ब्राह्मणाच्या ताब्यात असलेले महाबोधी विहार हे मुक्त करून ते बौध्दांच्या ताब्यात द्या, यासाठी देशभर भन्तेजींच्या नेतृत्वात महाविहार मुक्तीसाठी आंदोलने सुरु आहेत. पन्नास हजार बौद्ध भिकूंच्या उपस्थितीमध्ये थायलंड येथील हा कार्यक्रम संपन्न झाला. श्रीलंका, म्यानमार, बांगलादेश, भूतान, तैवान, कंबोडिया, चायना, कोरिया, हॉलंड, अमेरिका अशा देश विदेशामधून आलेल्या मेडिटेशन सेंटर येथे भव्य महासंघदान कार्यक्रम भदंत धम्मजयो महाथेरो यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्ताने संपन्न झाला. भदंत पंयाबोधी थेरो यांनी विविध देशातून आलेल्या बौद्ध भिकूंशी महाबोधी महाविहाराच्या संबंधिताने संवाद साधून त्यांच्याशी भारतातील महाबोधी महाविहार मुक्तीविषयी आणि बौद्ध भिक्षूंच्या ताब्यात महाविहार देण्याबाबतच्या आंदोलनाची माहिती दिली. जगातील बौध्दराष्ट्रांनी भारताकडे लक्ष देणे गरजेचे आहे असे सुद्धा त्यांनी सांगितले. पंयाबोधी यांच्या विनंतीवरून डॉ. पोरंचाई महास्थवीर थायलंड यांनी सुद्धा महाबोधी महाविहाराचा विषय यावेळी मांडला. जगभरातील भिक्खू संघांनी बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनास पाठिंबा देऊन पुढाकार घ्यावा. भारतीय बौद्धांना सर्वोतोपरी मदत करुन पुढील आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहनही यावेळी पंयाबोधी थेरो यांनी केले आहे.

# सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.२६ एप्रिल-**

तालूक्यातील ६६ ग्राम पंचायतीचे सरपंच पदाचे आरक्षण सोडत दि.२५ रोजी उपविभागीय कार्यालयात नियंत्रण अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रविण मेंगशेट्टी प्राधिकृत अधिकारी तथा तहसीलदार विनोद गूंडमवार पो.नि.अजित कूंभार आदिंच्या उपस्थितीत स.न.२०२५-२०३० या वर्षाकरिता पुढिल प्रमाणे सरपंच पदाचे आरक्षण सोडत पध्दतीने घोषीत करण्यात आले. अनू.जाती सर्वसाधारण पाळज बल्लाळ दिवशी मातूळ रहाटी(बू)अनू.जाती महिला सोमठाणा प.भो.हाळदा जाकापूर धानोरा सावरगाव (माळ)अनू.जमाती सर्व साधारण बोरवाडी गारगोटवाडी भूरभूशी नागापूर वाकद ताटकळवाडी गारगोटवाडी(पा.) अनू.जमाती महिला धावरी(बू.)रिठ्ठा जामदरी आमदरी समंदरवाडी डोरली नारवट ना.मा.प्र. सर्वसाधारण रावणगाव बटाळा/किन्हाळा जांभळी सायाळ नामाप्र महिला लामकाणी ईळेगाव धारजनी डौर नांदा म्है.प.सर्वसाधारण चिंचाळा प.भो.बोरगाव भोसी पिंपळढव पाकी लगळूद किनी खरबी हाडोळी कोळखाव(खू.)खडकी मोघाळी महागाव हस्सापूर देवठाणा बेंद्री सर्वसाधारण महिला कोळगाव (बू.)नांदा(बू.) रायखोड कांडली थेरबन चिदगीरी पांडूरणा सोनारी धावरी(खू.)रेणापूर कामनगाव सावरगाव(मेट)नांदा(खू.)पोमनाळा बेंबर दिवशी (बू.)आमठाणा आदि गावांचे आरक्षण घोषित करण्यात आले यावेळी सर्व राजकिय पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'दिशा' बैठकीत गाजला बारडच्या अस्वच्छतेचा प्रश्न

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.२६ एप्रिल-**

केंद्र सरकारच्या दिशा समितीच्या बैठकीत अध्यक्ष खा. रवींद्र चव्हाण यांनी बारड येथील अस्वच्छतेचा प्रश्न फैलावर घेत अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या निष्क्रिय ग्रामसेवकाची तातडीने बदली करण्याची मागणी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्याकडे केली. खा. रवींद्र चव्हाण यांची आक्रमक भूमिका बघताच संबंधित गंभीर प्रश्नावर कावली यांनी ठोस कारवाईचा दुजोरा दिला.



जिल्ह्यातील केंद्र सरकारच्या विविध योजना संदर्भात दिशा समिती आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. दिशा समितीचे अध्यक्ष खा. रवींद्र चव्हाण अध्यक्षस्थानी होते. सह अध्यक्ष खासदार शिवाजी काळगे, खा. नागेश पाटील आष्टीकर, खा. अशोक चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, खा. अजित गोपचडे, आ. श्रीजया चव्हाण, आ. भीमराव केराम, आ. राजेश पवार आ. आनंद बोंढारकर यांच्या सह आदींची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत केंद्र सरकारच्या विविध योजनेत प्रामुख्याने पाणीपुरवठा योजना, आरोग्य विषयक प्रश्न, शैक्षणिक आढावा तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छतेचा प्रश्न याविषयी चर्चा करण्यात आली.

या बैठकीत अशा समितीचे अध्यक्ष खा. रवींद्र चव्हाण यांनी अस्वच्छतेचा प्रश्न फैलावर घेतला. बारड ता. मुदखेड येथील विविध नगरामधील अस्वच्छता, तुंबलेल्या गटारांचा प्रश्न, याविषयी खा रवींद्र चव्हाण आक्रमक झाले. खा. चव्हाण यांनी बारड येथील ग्रामसेवक गेल्या गेल्या आठ वर्षापासून कार्यरत असून निष्क्रिय ठरलेल्या ग्रामसेवकाची तातडीने बदली करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांना दिले आहेत. स्वच्छतेच्या प्रश्नावर जिल्हा प्रशासनाला खा. रविंद्र चव्हाण यांनी धारेवर धरताच योग्य कारवाईचे संकेत दिले. यासोबतच खा. रवींद्र चव्हाण यांनी बारडच्या प्रस्तावित १३२ केव्ही केंद्राची लवकरात लवकर उभारणी करावी अशा सूचनाही महावितरण अधिकाऱ्यांना दिल्या.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्ञानाची गंगा घरोघरी पोहचवली: प्रवीण चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि.२६ एप्रिल-**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती सोहळा ढाकणी येथे दि. २४ एप्रिल रोजी साजरी करण्यात आली. यावेळी जयंती सोहळ्याचे उद्घाटन प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले.



महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सोहळ्याच्या उदघाटन प्रसंगी उदघाटनीय भाषानात ज्ञानाचीगंगा घरोघरी पोहचविल्या मुळे आज समाजाला एक दिशा मिळाली असल्याचे सांगितले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष जीवन घोगरे पाटील स्वागताध्यक्ष म्हणून भीम कायदा संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा जयंती सोहळ्याचे आयोजक विलासदादा गजभारे, सोनखेड ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक पांडूरंग माने यांच्या हस्ते सर्व प्रथम पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण तर पं.स.चे माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले व मान्यवरांच्या हस्ते विहारात जाऊन गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले व उद्घाटक भाषणात प्रवीण पाटील चिखलीकर यांनी डॉ बाबासाहेबांनी दिलेल्या आदर्शवादी जीवन कसे जगावे यावर प्रकाश टाकला व विहारासाठी १० लक्ष रुपयांचा निधी लवकरच मंजूर करून देऊ असे सांगितले व नंतर मान्यवरांची भाषणे झाली यात वक्त्या सुजाता आढाव यांनी लहान मुलांना विविध प्रकारचे उदाहरण देऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले या कार्यक्रमास फुले-शाहू-आंबेडकर चळवळीचे ज्येष्ठ नेते पी. एस. गवळे, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल्ला, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे भारत काकडे, लोहा नपाचे माजी विरोधी पक्षनेता पंचशील कांबळे, राष्ट्रवादीचे दक्षिण विधानसभा अध्यक्ष दत्ता पाटील तळणीकर, प्रमुख वक्ते म्हणून केंद्रीय शिक्षीका सुजाता आढाव, राष्ट्रवादीचेशहर सरचिटणीस एकनाथ वाघमारे, राष्ट्रवादीचे संघटक सचिव डॉ. उत्तम सोनकांबळे व प्रमुख पाहुणे म्हणून कृउबाचे माजी संचालक मधुकर डाकोरे,सामाजिक कार्यकर्ते सम्राट आढाव, प्रदीप हनुमंते, राष्ट्रवादीचे शहर सरचिटणीस शंकर धिर्डीकर,माजी मुख्याध्यापक गोविंद टरके, रतन सर्जे,के.पी. ऐडके, शाहीर गौतम पवार, सुरेश गजभारे, डी.के. कांबळे,अशोक चिंतोरे,राजू लांडगे, युवा उद्योजक माधव डोम्पले, प्रसेनजित वाघमारे, प्रा. शशिकांत आर.जे.वाघमारे,हाटकर, दलितमित्र माधव आंबटवार, आकाश सोनकांबळे, बालाजी गायकवाड, बा.रा. वाघमारे, व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेचे अध्यक्ष संभाजी सोनकांबळे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे अॅड. संघरत्न गायकवाड आदींची उपस्थिती होती.

# बितनाळ येथे बुधवारी जयंती सोहळा

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.२६ एप्रिल-**

तालुक्यातील मौजे बितनाळ येथे डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ जयंती सोहळा दि ३० एप्रील रोजी साजरी करण्यात येणार आहे तर बुद्ध आणि भिम गिताचा जंगी शानदार मुकाबला दि १ मे २०२५ रोजी होणार आहे .





दि ३० एप्रील रोजी सकाळी ९:३० वाजता पहिल्या सत्रात पंचशिल ध्वजाचे ध्वजारोहन सरपंच सुभद्राबाई मारोती उमाटे यांच्या हस्ते संपन्न होईल आणि पुजापाठ प्रदिप जोंधळे भातीय (बौद्ध महासभा अध्यक्ष उमरी ) व करुणा खंडेलोटे ( सामाजिक कार्यकर्त्या ) या कार्यक्रमाचे अध्यक्ष जी. पी. मिसाळे धर्माबादकर ( पत्रकार ) तर प्रमुख मार्गदर्शक जिल्हा सत्र न्यायालय नांदेड चे अॅड. विजय गोणारकर यांचे मार्गदर्शन लाभणार आहे .

दि १ मे २०२५ रोजी च्या कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल गायकांबळे नायगावकर तर बुद्धवंदना प्रा बि एम वाघमारे नांदेड , प्रमुख मार्गदर्शक ड राहुल एंगडे , पी एस भद्रे ( सहय्यक सब इंस्पेक्टर ) त्या नंतर सायंकाळी ९:०० वाजता बितनाळ एम एस ई बी ऑफीस च्या खुल्या मैदानावर बुध्द आणि भिम गिताचा बहारदार कार्यक्रम होणार आहे प्रख्यात गायक सुरज अतिश मुंबई यांचा संच व सपनाताई खरात अकोला संच यांचा गायनाचा जंगी सामना रंगणार आहे या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन सहशिक्षक शरद शिवनखेडकर हे करणार असुन आभार प्रदर्शन कवि एन व्ही डोंगरे व भिमयंती मंडळाचे अध्यक्ष अशोक जाधव हे करतील

या १३४ व्या भिम जयंती सोहळ्यास व बुद्ध - भिम गिताच्या बहारदार कार्यक्रमस हजारोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा शाखा बितनाळ व भिमजंयती उत्सव समिती चे अध्यक्षक अशोक जाधव , प्रशांत शेळके , यशवंत शेवाळे , किशोर लोखंडे , रवि तुरेराव , राजू डोंगरे , सुरज डोंगरे , सुभेदार डोंगरे , सोनू लोखंडे , बुद्धतेज डोंगरे यांनी केले आहे .